
CMYK
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | मंगळवार, ६ जानेवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३०७। पाने १२ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विचारपुष्प




आपल्या कार्यकर्त्यांनी दररोज नित्यनेमाने संघस्थानावर आले पाहिजे आणि प्रार्थना केली पाहिजे. नेहमीच सभ्यतापूर्ण व्यवहार केला पाहिजे आणि सद्भावनेने वागले पाहिजे. सोई-सुविधांची वाट पाहत बसू नये. साधने कमी असली तरी श्रमाच्या जोरावर जास्तीत जास्त काम करण्याची इच्छाशक्ती निर्माण करून मनोबल वाढवले पाहिजे.

**- लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

### महत्त्वाचे

**अमेरिकेच्या हल्ल्यामुळे बाजारात चिंता**

**मुंबई** : अमेरिकेने व्हेनेझुएलावर केलेल्या लष्करी कारवाई केली असून सोबतच भारतावरही अतिरिक्त टॅरिफ



लावण्याचा इशारा दिला आहे. या दोन कारणांमुळे देशांतर्गत बाजारात मंदीचे सावट पसरले. मुंबई बाजारातील निर्देशांक ३२२ अंकांनी कोसळून ८५,४४० वर बंद झाला तर निफ्टी ७८ अंकांनी खाली येत २६,२५० वर स्थिरावला.

# भारताला अस्थिर करण्याचा ‘आयएसआय’चा कट

## • गुप्तचर यंत्रणांचा खळबळजनक अहवाल • हेरगिरीचे जाळे वाढविण्याचा प्रयत्न

◆ **नवी दिल्ली, ५ जानेवारी**

पाकिस्तानची कुटील आणि पाताळयंत्री गुप्तचर यंत्रणा इंटर सर्व्हिस इंटेलिजन्स अर्थात् आयएसआयने भारतात अस्थिरता निर्माण करण्याचा कट रचल्याचा खळबळजनक इशारा गुप्तचर यंत्रणांनी अहवालातून दिला आहे. या पृष्ठभूमीवर देशाच्या सुरक्षा दलांना सतर्क राहण्यासाठी सावध केले पाहिजे, अशी सूचनाही त्यांनी केली.

अलिकडच्या काळात हेरगिरीचे अनेक प्रयत्न हाणून पाडण्यात आले असले, तरी पाकिस्तानच्या आयएसआय समर्थित हस्तक आपले जाळे विस्तारण्यासाठी देशात अजूनही सक्रिय आहेत. याशिवाय आयएसआयचे एजंट भारताच्या विरोधात अपप्रचाराची मोठी मोहीम चालवण्यातही गुंतले आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली.

आयएसआय सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत देशात निदर्शने घडवून आणण्यासाठी काही व्यक्ती आणि संघटनांना सामील करून घेण्याचा कटही रचत असल्याचा



दावा सूत्रांनी केला. शत्रू देशाने भारतात अशांतता निर्माण करण्यासाठी आणि शक्य तितक्या देशांतर्गत दहशतवादी कारवायांद्वारे भारताला कमकुवत करण्यासाठी रचलेल्या मोठ्या कटाचा भाग आहे. आपला सहभाग दिसणार नाही, याची काळजी पाकिस्तान घेत असल्याचे गुप्तचर सूत्रांनी सांगितले.

खोट्या बातम्या पसरवणे, आंदोलने भडकवणे आणि गुप्तहेरांचे अधिक खोलवर जाळे निर्माण करणे हा एका मोठ्या योजनेचा भाग आहे आणि यामध्ये फरिदाबादेत उघडकीस आल्याप्रमाणे स्थानिक दहशतवादी गट स्थापन करण्याचाही समावेश आहे, असे सूत्रांनी सांगितले.

सध्या सीमेच्या पलीकडून दहशतवाद्यांना पाठवण्याची कोणतीही योजना सध्या पाकिस्तानने आखलेली नाही. ‘ऑपरेशन सिंदूर’नंतर त्यांच्या बहुतांश दहशतवादी सुविधा बंद पडल्या आहेत आणि पुढील घुसखोरी करणे त्यांना कठीण जात आहे, असे या गुप्तचर अहवालात म्हटल्याची माहिती सूत्रांनी दिली.

सशस्त्र दले नागरिकांच्या नजरेत कमकुवत दिसावीत, असे आयएसआयला वाटते. आयएसआय प्रत्येक आंदोलनात घुसखोरी करण्याचा प्रयत्न करेल. या माध्यमातून आंदोलन चिघळेल आणि हिंसक रूप धारण करेल, असे प्रयत्न आहेत. यापूर्वीही आयएसआयने असे प्रयत्न केले होते. पण, आता खूप मोठ्या प्रमाणात काहीतरी करण्याचा डाव आहे, असे सूत्रांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

### बांगलादेश-नेपाळप्रमाणे आंदोलनाचा प्रयत्न

पाकिस्तान बांगलादेश आणि नेपाळच्या धर्तीवर काहीतरी घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहे. या माध्यमातून देशभरात निदर्शने होतील, सत्ता परिवर्तनाची मागणी केली जाईल आणि भारतीय सशस्त्र दलांवरील लोकांचा विश्वास उडावा यासाठी बदनाम करण्यासाठी एक मोहीम सुरू करण्यात आली, असे सूत्रांनी सांगितले. ■

### ईशान्येतील हल्ल्यांसाठी बांगलादेशचा वापर

भारतात रचलेल्या कटाव्यतिरिक्त आयएसआय सध्या बांगलादेशावरही भर देत आहे. ईशान्येतील राज्यांवर हल्ले करण्यासाठी पाकिस्तानला लाँच पॅड उभारायचे आहेत, अशी माहिती सूत्राने दिली. आयएसआयने आखलेल्या कटांपैकी हेरगिरीचे जाळे विणणे आणि अपप्रचाराची मोहीम चालवणे या दोन सर्वात धोकादायक योजना आहेत. ■

### हनी ट्रॅपचा डावपेचही वापरणार

हेरगिरीचे जाळे उभारण्यासाठी हनी ट्रॅप हा मुख्य डावपेच असला तरी, सरकारच्या विरोधातील लोक, आर्थिक अडचणीचा सामना करणारे, वैयक्तिक समस्या असेलल्यांना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न आयएसआयचा प्रयत्न आहे. यासाटी आयएसआय मोठा पैसा ओतण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सूत्रांनी सांगितले. ■

### भाजपाने २२ कार्यकर्त्यांना केले निलंबित

छ. संभाजीनगर : पक्षविरोधी कारवाया केल्याने भाजपाने महापालिका निवडणुकीपूर्वी २२ कार्यकर्त्यांना पक्षातून काढून टाकले. छ. संभाजीनगर महापालिकेत भाजपा ९३ जागा लढवत आहे आणि काही पक्ष कार्यकर्ते उमेदवारीवरून नाराज होते. पक्षाने बैठक घेऊन २२ कार्यकर्त्यांचे सदस्यत्व निलंबित करण्याचा निर्णय घेतला, असे भाजपाचे जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी प्रसारमाध्यमांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.



बिहारमधील गोपालगंज जिल्ह्यात ‘विराट रामायण’ धार्मिक स्थळाची उभारणी केली जात आहे. या परिसरात जगातील सर्वात मोठे शिवलिंग स्थापन केले जाणार आहे. हे विशाल शिवलिंग तामिळनाडू येथून आणले जात आहे

# महापालिका निवडणुकीतील ७० बिनविरोध उमेदवारांविरुध्द मनसे उच्च न्यायालयात


**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. ५ जानेवारी :**

राज्यातील २९ महापालिका निवडणुकांमध्येही बिनविरोध ठरविण्यात आलेल्या ७० जागाच्या निर्णयाच्या विरोधात मनसे व काँग्रेसने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. विरोधी उमेदवारांना विविध दबावाखाली अर्ज मागे घेण्यास भाग पाडले असल्याने त्या ठिकाणचा निर्णय रद्द करून पुन्हा निवडणुका घेण्यात यावा, अशी मागणी ठाण्यातील मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी याचिकेत केली आहे.

कल्याण डोंबिवली आणि ठाण्यात बिनविरोध निवडणुका ह्या धमक्या, पैशाचे आमिष देऊन करण्यात आल्याचे आरोप करत काही पुरावेही दिले आहेत. पालिकेच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदान होणार आहे. मात्र त्यासाठी अर्ज माघारी घेण्याच्या २ जानेवारीपर्यंतच्या अंतिम मुदतीत विविध महापालिकेतून एकूण ७० ठिकाणी केवळ एकच उमेदवार रिंगणात राहिला असून तेथून अन्य सर्व उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहेत. बिनविरोध उमेदवारामध्ये सर्वाधिक. ४४ भाजप, २२ ठिकाणी शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे २ उमेदवारांचा समावेश




आहे. सत्ताधारी महायुतीच्या उमेदवारांनी साम, दाम, दंड भेदाचा वापर करून विरोधकांना अर्ज मागे घेण्यास भाग पाडले असल्याची शक्यता याचिकेत व्यक्त केली आहे. याप्रकरणाची चौकशी व्हावी, ती पूर्ण होईपर्यंत बिनविरोध निवडणुकीचे निकाल जाहीर न करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला देण्यात द्यावेत, अशी मागणी करण्यात आली. निकालापूर्वी याचिका बोर्डावर घेण्याची विनंती करण्यात आली आहे.






# सोलापूर महापालिका निवडणूक २०२६ : अपक्ष उमेदवार

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रभाग १ अ. (अनुसुचित जाती)** | **प्रभाग ५ ड.सर्वसाधारण** | जुनेद अल्लोळी | शशिकला कसपटे | साबेरा शेख | राजशेखर येमूल | **प्रभाग २२ अ .अनुसुचित जाती** | श्रीशैल रणखांबे |
| विजय गादेकर | राजू अलुरे | **प्रभाग ९ ब. सर्वसाधारण महिला** | पूजा चव्हाण | **प्रभाग १६ क.सर्वसाधारण महिला** | इस्माइल शेख | मधुकर आठवले | सातलिंग स्वामी |
| देविदास चिंचोळकर | श्रीकांत मोरे | सावित्री पलाटी | मंदिरा साळुंके | नसिफा पठाण | आशम फुलमामडी | **प्रभाग २२ ब. ओबीसी महिला** | **प्रभाग २४ क. ओबीसी महिला** |
| **प्रभाग १ ब.ओबिसी महिला** | **प्रभाग ६ अ.अनुसुचीत जाती महिला** | **प्रभाग ९ ड.सर्वसाधारण** | **प्रभाग १२ ड.सर्वसाधारण** | **प्रभाग १६ ड.सर्वसाधारण** | **प्रभाग १९ अ .ओबीसी महिला** | अपर्णा माने | रश्मी गायकवाड |
| श्वेता कवठे | मंगल बंगाळे | आकाश इंगळे | आनंद धोत्रे | मोहन घुले | नरस्सया बिल्ला | विद्या माने | शैलजा राठोड |
| **प्रभाग १ क.सर्वसाधारण महिला** | किर्ती शिंदे | अशोक कलशेट्टी | **प्रभाग १३ ड.सर्वसाधारण** | आर्यन पठाण | **प्रभाग १९ ब .ओबीसी** | **प्रभाग २२क. सर्वसाधारण महिला** | **प्रभाग २४ क. सर्वसाधारण महिला** |
| छाया चव्हाण | **प्रभाग ६ ब.ओबीसी** | रवी पात्रे | प्रशांत जमादार | लियाकत पठाण | जयराम सुंचू | सुरभी गायकवाड | बनसिद्ध काटकर |
| सुकन्या तांबे | सलिम नदाफ | शिवराज बिराजदार | निरंजन बोध्दुल | **प्रभाग १७ अ.अनुसुचित जाती महिला** | **प्रभाग १९ क .सर्वसाधारण महिला** | **प्रभाग २२ ड. सर्वसाधारण** | विरेश चडचणकर |
| प्रभाकर गुत्तरगी | अंकुश राठोड | अरविंद शिंदे | अशोक माचण | वैशाली दुपारगुडे | अनुराधा फुलपाटी | अनिल जाधव | विजय चोळ्ळे |
| ओंकार जाधव | **प्रभाग ६ क.सर्वसाधारण महिला** | **प्रभाग १० अ.ओबीसी महिला** | गणेश म्हेत्रे | आशा लोकेकर | छाया अलकुंटे | बालाजी जाधव | विनायक पवार |
| अमरनाथ बिराजदार | राधिका गुळ्ळोळे | अरूणा कोंडले | **प्रभाग १४ क.सर्वसाधारण महिला** | **प्रभाग १७ ब.ओबीसी** | **प्रभाग १९ ड. सर्वसाधारण** | वसंत जाधव | बसवराज बगले |
| **प्रभाग २ क.सर्वसाधारण महिला** | सुनीता दळवी | रूचिरा मासम | फातिमा दिना | अवाहिद नदाफ | राहुल गंधुरे | शितल गायकवाड | श्रुती बंड |
| हमिदा पटेल | **प्रभाग ६ ड.सर्वसाधारण** | **प्रभाग १० ब.सर्वसाधारण महिला** | **प्रभाग १४ ड.सर्वसाधारण** | समर्थ मोटे | **प्रभाग २० अ .ओबीसी महिला** | सरफराज शेख | **प्रभाग २५ ब . ओबीसी** |
| **प्रभाग २ ड. सर्वसाधारण** | एकनाथ गेजगे | लक्ष्मीबाई बाबरे | चाँदसाब मुजावर | **प्रभाग १७ क.सर्वसाधारण महिला** | तस्लिम शेख | **प्रभाग २३ अ. अनुसुचित जाती** | चंद्रकांत नवत्रे |
| जयश्री भोसले | मनोजकुमार तम्मेवार | **प्रभाग १० क. सर्वसाधारण** | म. रफिक मोहोळकर | सना कागदी | **प्रभाग २० ड. सर्वसाधारण** | नवनाथ भजनावळे | सिद्धेश्वर माळी |
| **प्रभाग ३ अ.ओबिसी** | बाबू पोथगुळी | विठ्ठल कोठा | सद्दाम शाब्दी | मिराबाई बुऱ्हाणपुरे | प्रदिप बाळशंकर | भारत हत्तीकट्टी | अब्दुल मुल्ला |
| दशरथ जमादार | शार्दुल साबळे | **प्रभाग १० ड.सर्वसाधारण** | आफशान शेख | आशाबी शेख | शाकीर सगरी | **प्रभाग २३ ब .ओबीसी महिला** | **प्रभाग २५ क. सर्वसाधारण महिला** |
| **प्रभाग ३ ड.सर्वसाधारण** | इरफान शेख | विजयकुमार अंकम | मोहम्मद शेख | **प्रभाग १७ ड.सर्वसाधारण** | नय्युम सालार | सकियाबानो बिराजदार | शारदा बिराजदार |
| शहानवाज कंपली | **प्रभाग ७ अ.ओबीसी** | विजय इप्पाकाय | **प्रभाग १५ अ.अनुसुचित महिला** | मुझ्झमिन कुरेशी | **प्रभाग २१ ब. ओबीसी** | मेनका राठोड | अर्चना साळुंके |
| **प्रभाग ४ ब.ओबीसी** | सूरज बंडगर | **प्रभाग ११ ब.सर्वसाधारण महिला** | आशा फुलेवार | रिझवान कुरेशी | राजकुमार भोसले | **प्रभाग २३क. सर्वसाधारण महिला** | **प्रभाग २६ अ. अनु. जाती महिला** |
| केदार म्हमाणे | **प्रभाग ७ क.सर्वसाधारण महिला** | जैतुन शेख | **प्रभाग १५ क.सर्वसाधारण** | शंकर गुंगेवाले | संजय म्हेत्रे | रूपाली चोळ्ळे | निशिगंधा भडकुंबे |
| **प्रभाग ४ क.सर्वसाधारण** | मंजूषा मुडके | **प्रभाग ११ ब.सर्वसाधारण महिला** | शिवराज तलाठी | सूरज जगधने | श्रद्धेश पाटील | **प्रभाग २३ ड . सर्वसाधारण** | **प्रभाग २६ ब. अनुसुचित जमाती** |
| शुभम गायकवाड | **प्रभाग ८ ब. सर्वसाधारण महिला** | सोनाली मगर | **प्रभाग १६ अ.अनुसुचित जाती** | अजय दिड्डी | **प्रभाग २१ क .सर्वसाधारण महिला** | वैभव राऊत | राजेश काळे |
| राकेश घाडगे | बालमनी कस्सा | महानंदा हेग्गे | केतन कसबे | अविनाश बाडीवाले | ललिता मनसावले | हरी चव्हाण | अरूण मोरे |
| **प्रभाग ५ अ.अनुसुचित जाती** | सुप्रिया विभुते | **प्रभाग ११ ड.सर्वसाधारण** | मल्लिकार्जुन कांबळे | दीपक भंडारे | अॅड. शर्वरी रानडे | विजय चोळ्ळे | **प्रभाग २६ क. सर्वसाधारण** |
| नागनाथ क्षीरसागर | फिरोजाबी शेख | इम्तियाज यादगिर | अनिल खरटमल | अकील सय्यद | बिल्कीस सय्यद | बादशाह शफी | प्रिया परदेशी |
| **प्रभाग ५ ब.ओबीसी महिला** | **प्रभाग ८ क.सर्वसाधारण महिला** | **प्रभाग १२ अ.ओबीसी** | विशाल लोंढे | **प्रभाग १८ ब.सर्वसाधारण महिला** | **प्रभाग २१ ड. सर्वसाधारण महिला** | **प्रभाग २४ अ. अनुसुचित जाती** | प्रेम राठोड |
| शीतल झाडगे | सीमा धुळम | काशिनाथ झाडबुके | अशोक वाघमारे | निर्मला तट्टे | अमितकुमार अजनाळकर | अभिषेक कटकधोंड | श्रीशैल हिरेमठ |
| **प्रभाग ५ क.सर्वसाधारण महिला** | **प्रभाग ८ ड.सर्वसाधारण** | **प्रभाग १२ ब.सर्वसाधारण महिला** | **प्रभाग १६ ब.ओबीसी महिला** | **प्रभाग १८ क.सर्वसाधारण** | हणमंता कोठे | संगिता जाधव | |
| सरस्वती सुरवसे | हेमंतकुमार अडकी | रेणुका अंजनाळकर | अॅड. बेनझीर शेख | भीमशंकर कोळी | संतोष भोसले | विपूल थोरे | |

## राज्य सरकारी कर्मचारी संघटनेच्या सरचिटणीसपदी गणेश बकशेट्टी

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. दि. ५ जानेवारी -**

मुंबई पोलीस आयुक्तालयात कार्यरत असलेले गणेश बकशेट्टी यांची राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या मुंबई जिल्हा शाखा असलेल्या आणि ७४ खाते संघटनांची फेडरेशन असलेल्या बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटनेच्या सरचिटणीस पदावर बिनविरोध निवड झाली आहे.



मुंबईत शनिवारी झालेल्या संघटनेच्या सर्व साधारण सभेत त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. यावेळी संघटनेच्या अध्यक्ष पदावर निलेश मोरे आणि कोषाध्यक्ष पदावर कविता ठोंबरे यांची निवड करण्यात आली. तसेच अविनाश दौंड आणि मिलिंद सरदेशमुख यांची प्रमुख सल्लागार पदी निवड झाली आहे

बकशेट्टी हे मुंबई पोलीस आयुक्तालयात सहाय्यक अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत. गेली २५ वर्षापासून संघटनेच्या कार्यात सक्रिय आहेत. विविध पदे यशस्वीपणे सांभाळताना त्यांनी कर्मचारी वर्गाचे अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. गणेश बकशेट्टी हे मूळचे सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथील आहेत. महानगराबरोबरच ग्रामीण भागातील गरजूना मदत करण्यासाठी ते नेहमी तत्पर असतात.

## कोर्टाच्या कर्मचाऱ्यांना निवडणूक ड्युटी लावणे मुंबई महापालिका आयुक्तांना पडले महागात !

### हायकोर्टात ३ तास हजेरीनंतर सुनावणी तीन आठवडे तहकूब

**तभा वृत्तसेवा। जमीर काझी**
**मुंबई, दि. ५ जानेवारी -**

बृहन्मुंबई महापालिका निवडणुकीच्या कामात न्यायालयाच्या कर्मचाऱ्यांना चुकून इलेक्शन ड्युटी लावणे महापालिका आयुक्त आणि मुंबई जिल्हा प्रमुख निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांना चांगलेच महागात पडले आहे.याबाबत दाखल याचिकेवर सोमवारी उच्च न्यायालयात ३ तास उपस्थित राहून माफीनामा सादर केला. मात्र न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने चूक मान्य करण्यास नकार देत सुनावणी तीन आठवड्यांकरिता तहकूब केली आहे.

ऐरवी ज्यांच्या दालनाबाहेर लोक भेटीची वाट पाहत असतात, त्या महापालिका आयक्तांना सोमवारी या सुनावणीकरिता कोर्टात वाट पाहावी लागली. त्यासाठी आयुक्त भूषण गगराणी हे स्वतः सकाळी अकराच्या सुमारास हजर राहिले. मात्र इतर प्रकरणांच्या सुनावणीत बराच वेळ गेल्याने या याचिकेची सुनावणी सुरू होण्यास बराच अवधी गेला.त्यानंतर कोर्टाने दिलेल्या सुचनेनुसार भूषण गगराणी यांनी निवडणूक ड्युटीच्या यापूर्वीची आदेशाबाबत कल्पना नसल्याने नजरचुकीने हा आदेश जारी केल्याची चूक कबूल करीत वैयक्तिक प्रतिज्ञापत्र वकिलामार्फत सादर केले. मात्र कोर्टाने आयुक्तंना कोणताही दिलासा न देता या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने तीन आठवड्यांकरिता तहकूब केली.

**काय आहे प्रकरण?**

जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम करणाऱ्या महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी मुंबईतील सर्व कनिष्ठ न्यायालयातील कर्मचाऱ्यांना निवडणूक ड्युटीवर रुजू होण्याचे आदेश २२ डिसेंबरला सर्व कनिष्ठ न्यायालयात पाठवले होते. त्यापत्रावर मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांनी आक्षेप घेत महापालिका आयुक्त आणि मुंबई शहर जिल्हाधिकाऱ्यांना हायकोर्टानं कनिष्ठ न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या संदर्भात यापूर्वीच प्रशासकीय निर्णय घेत न्यायालयाच्या कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्यातून सूट देण्याची विनंती केली होती. मात्र पालिका आयुक्तांनी २९ डिसेंबर रोजी मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांना पत्र पाठवून कनिष्ठ न्यायालयातील कर्मचाऱ्यांना सूट देण्याची विनंती फेटाळून लावली होती.मात्र त्याची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेत 'सुमोटो 'याचिका दाखल करून घेत त्याच दिवशी रात्री ८ वाजता मुख्य न्यायमूर्तींच्या मलबार हिल येथील शासकीय निवासस्थानी दुसऱ्या न्यायमूर्तींना पाचरण करून एक विशेष खंडपीठ स्थापन केले होते. या सुनावणीत पालिका आयुक्तांच्या अधिकार क्षेत्रावर न्यायालयानं थेट बोट ठेवत याबाबत स्पष्टीकरण मागितलं. त्यावर पालिका आयुक्तांनी काढलेलं हे पत्र मागे घेऊ देण्याची विनंती महापालिकेच्या वकिलांनी केली होती. परंतु न्यायालयाने ती फेटाळून लावत जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहणाऱ्या पालिका आयुक्तांना न्यायालयीन कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्यावर रुजू होण्याचे आदेश कोणत्या अधिकार क्षेत्रात घेतले?, याबाबत वैयक्तिक प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सोमवारी हायकोर्टात मुख्य

हायकोर्टाचे निर्देश काय?- सप्टेंबर २००८ मध्ये घेतलेल्या निर्णयाचा दाखला देत पालिका आयुक्तांना त्यांनी २२ डिसेंबरला न्यायालयीन कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या कामावर बोलावणं पाठवत जारी केलेल्या पत्रावर तूर्तास कोणतीही कारवाई न करण्याचे हायकोर्टाचे निर्देश कायम आहेत. पालिका आयुक्तांना हायकोर्टानं धारेवर धरत कोणत्या अधिकारात ही नोटीस काढलीत?, असा थेट सवाल केलाय. त्या रात्रीच्या सुनावणीत राज्य निवडणूक आयोगाच्या उपसचिवांनी या सुनावणीत व्हिडीओ कॉन्फरन्सिंगमार्फत उपस्थित राहत खंडपीठाला माहिती दिली होती की, निवडणूक आयोग कधीही न्यायालयीन कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्यासाठी पाचारण करत नाही

## शालन शिंदेच्या पोलिस कोठडीची मागणी फेटाळली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी -**

जोशी गल्ली, रविवार पेठ परिसरात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या वादातून मनसे विद्यार्थी शहर प्रमुख बाळासाहेब पांडुरंग सरवदे याची तलवार व कोयत्याने वार करून निर्घृण हत्या केल्या प्रकरणी माजी नगरसेविका आणि भाजपाची विद्यमान उमेदवार शालन शिंदे हिने घटनेवेळी वापरलेल्या चटणीचा तपास करण्यासाठी दोन दिवस पोलीस कोठडी वाढवून मिळण्याची पोलिसांची मागणी केलेली होती. परंतु शालन शिंदेतर्फे युक्तिवाद करताना अँड संतोष न्हावकर यांनी घटनेनंतर ताबडतोब आलेल्या रासायनिक पृथकरण पथकाने फॉरेन्सिक करताना घटनास्थळावरून जप्त केलेल्या पुराव्यामध्ये कोठेही चटणी जप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे शालन शिंदे यांनी चटणी फेकल्याचा फिर्यादीचा आरोपच खोटा असल्याचे दिसून येते त्यामुळे त्यासाठी पोलीस कस्टडी देण्याची मागणी मान्य करता येणार नाही असा युक्तिवाद केला. तो मान्य करून न्यायालयाने पोलिसांची पोलीस कोठडीची मागणी फेटाळून शालन शिंदेची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली.



बाळासाहेब सरवदे खून प्रकरण

याबाबत हकिकत अशी की, मयताचे भाऊ बाजीराव पांडुरंग सरवदे (वय २५, रा. जोशी गल्ली, रविवार पेठ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपींनी निवडणुकीत उभे राहू नये म्हणून धमकी दिली होती अपक्ष अर्ज मागे घ्या, नाहीतर तुम्हाला जिवंत सोडणार नाही, अशी उघड धमकी देण्यात आल्याचा आरोप आहे. दि.२ जानेवारी रोजी दुपारी १ ते सायंकाळी ४.४५ च्या दरम्यान हनुमान मंदिराजवळ आरोपींनी वाद घालून बाळासाहेब सरवदे यांच्या डोळ्यांत चटणी टाकून त्यांना काहीही दिसू नये अशी स्थिती निर्माण केली. त्यानंतर काही आरोपींनी त्यांचे हात पकडले, तर काही आरोपींनी तलवार व कोयत्याने छातीवर वार करून त्यांना गंभीर जखमी केले उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी जेल रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेप्रकरणी दि.३/१/२६ रोजी अमर शंकर शिंदे,शालन शंकर शिंदे,अतिश शंकर शिंदे,तानाजी बापू शिंदे या चार आरोपींना अटक करून न्यायालयात हजर केले होते त्यावेळी शालन शंकर शिंदे यांना २ दिवसाची तर इतर तीन आरोपींना ४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. शालन शंकर शिंदे हिची पोलीस कोठडी आज संपणार असल्याने पोलिसांनी आज पुन्हा न्यायालयात हजर करून दोन दिवस वाढीव पोलीस कोठडीची मागणी केली होती परंतु मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (मर्ढेकर सो) यांनी न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

यात आरोपी तर्फे अँड. संतोष न्हावकर, अँड. राहुल रूपनर, अँड. मीरा पाटील, अँड. सोहेल शेख यांनी तर सरकार पक्षातर्फे अँड.तुषार लिमण यांनी काम पाहिले.

## आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचे पत्रकारितेतील योगदान

**६ जानेवारी हा दिवस राज्य मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी सन १८३२ मध्ये आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण सुरू केले. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. समाजाला दिशा देणे, सत्याचा शोध घेणे आणि समाजहितासाठी आवाज उठवणे ही पत्रकारांची जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर आचार्य जांभेकरांचे पत्रकारितेमधील योगदान आणि आजच्या पत्रकारांनी पाळावयाची नैतिकता यांचा विचार करणे आवश्यक ठरते.**

**निमित्त**
**सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी**

मराठी पत्रकारितेची सुरुवात: ६ जानेवारी १८३२ मध्ये त्यांनी दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्राने समाजजागृतीचे कार्य केले. दर्पण'च्या पहिल्या अंकात इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांमध्ये माहिती दिली जात असे. यामुळे इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी व भावना समजून घेता आल्या. 'दर्पण'ने समाजातील अज्ञान, दारिद्र्य, भाकड समजुती यांविरुद्ध आवाज उठवला आणि लोकांना जागरूक केले. या वृत्तपत्राने साडे आठ वर्षे कार्य केले आणि १८४० मध्ये त्याचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. त्याच वर्षी त्यांनी दिग्दर्शन हे वृत्तपत्रही सुरू केले होते. मराठीतील पहिले वृत्तपत्र दर्पण सुरू करून त्या माध्यमातून एतद्देशिय समाजाला प्रबोधित करण्याच्या केलेल्या कार्यामुळे त्यांना दर्पणकार म्हणून संबोधले जाते. जांभेकरांनी पत्रकारितेद्वारे शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. अंधश्रद्धा, अज्ञान आणि सामाजिक कुप्रथांविरुद्ध त्यांनी लेखन केले. ब्रिटिश काळात त्यांनी लोकांना स्वातंत्र्य, न्याय आणि समानतेची जाणीव करून त्यांच्यामध्ये राष्ट्रीय चेतना जागृत केली. पत्रकारितेला त्यांनी सामाजिक परिवर्तनाचे साधन बनवले. त्यांच्या लेखनात सत्य, विवेक आणि समाजहित यांचा आग्रह होता. त्यामुळेच त्यांना मराठी पत्रकारितेचे जनक ही उपाधी मिळाली.



आजचा पत्रकार दिन हा केवळ स्मरणाचा दिवस नाही, तर आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आचार्य जांभेकर यांचे कार्य आजही प्रासंगिक आहे. त्यांच्या विचारधारेला आधुनिक पत्रकारिता आणि माध्यम क्षेत्रात महत्त्व आहे. त्यांच्या कार्यामुळे पत्रकारितेत एक नैतिक आधार तयार झाला, जो आजही पत्रकारितेचा आधारभूत आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा पत्रकारितेतील वारसा आणि कार्य महत्त्वाचे आहे. त्यांनी पत्रकारितेला समाजजागृतीचे साधन बनवले.

आजच्या पत्रकारांनी त्यांच्या आदर्शांचा विचार करून सत्यनिष्ठा, निष्पक्षता आणि समाजहित यांचा आग्रह धरावा. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे, हा स्तंभ मजबूत राहणे, हे पत्रकारांच्या नैतिकतेवर अवलंबून आहे.

### आजच्या पत्रकारांनी घ्यावयाची काळजी

आजच्या काळात पत्रकारिता अधिक व्यापक झाली आहे. छापील माध्यमांबरोबरच दूरदर्शन, रेडिओ, डिजिटल पोर्टल्स आणि सोशल मीडिया हे नवे माध्यम उपलब्ध झाले आहेत. या बदलत्या परिस्थितीत पत्रकारांनी काही बाबींची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे: सत्यता आणि पडताळणी: बातमी देताना तथ्यांची पडताळणी करणे अत्यावश्यक आहे. अप्रमाणित माहिती किंवा अफवा पसरवणे टाळावे. निष्पक्षता: कोणत्याही राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक दबावाला बळी न पडता निष्पक्ष वृत्तांकन करणे ही पत्रकाराची जबाबदारी आहे. लोकहिताचा विचार: बातमी ही केवळ सनसनाटी निर्माण करण्यासाठी नसून समाजहितासाठी असावी. भाषेची शुद्धता: पत्रकारितेत वापरली जाणारी भाषा स्पष्ट, सोपी आणि शुद्ध असावी. चुकीची भाषा जनमानसात गोंधळ निर्माण करू शकते. गोपनीयतेचा आदर: व्यक्तीगत गोपनीयता आणि संवेदनशील माहिती यांचा आदर राखणे आवश्यक आहे. नवमाध्यमांचा जबाबदार वापर: सोशल मीडिया हे प्रभावी साधन आहे, परंतु त्याचा वापर करताना नैतिकता आणि जबाबदारी पाळणे गरजेचे आहे.

पत्रकारितेची नैतिकता ही तिच्या विश्वासार्हतेचा पाया आहे. सत्यनिष्ठा: पत्रकाराने सत्याला प्राधान्य द्यावे. स्वतंत्रता: कोणत्याही दबावाखाली न येता स्वतंत्रपणे बातमी देणे. उत्तरदायित्व: समाजाप्रती उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून कार्य करणे. संवेदनशीलता: सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक बाबींमध्ये संवेदनशीलता राखणे. लोकशाही मूल्यांचे संरक्षण: पत्रकारितेने लोकशाही मजबूत करावी, जनतेला माहितीपूर्ण करावे.

# मोहोळच्या नगराध्यक्षपदी सिध्दी वस्त्रे विराजमान

## पदयात्रेसह वाजत-गाजत घेतला पदभार



**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.५ जानेवारी-**

मोहोळ नगर परिषदेच्या निवडणुकीमधील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार २२ वर्षीय कु. सिद्धी वस्त्रे यांच्या विजयानंतर त्यांनी गवत्या मारुती चौक येथून मोहोळ नगरपरिषदेपर्यंत भव्य पदयात्रा काढत वाजत गाजत नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला.

सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या मोहोळ नगर परिषदेमध्ये प्रामुख्याने भाजप आणि शिवसेनेमध्ये झालेल्या लढतीमध्ये मोठ्या आरोप प्रत्यारोपानंतर नगराध्यक्षपदी भाजपाच्या शितल क्षीरसागर यांचा पराभव करून २२ वर्षीय सिद्धी वस्त्रे यांनी विजय प्राप्त केला. माजी आमदार राजन पाटील व माजी आमदार यशवंत माने यांच्या भाजप प्रवेशानंतर ही पहिलीच निवडणूक असल्याने या निवडणुकीला महत्त्व प्राप्त झाले होते.

दरम्यान सोमवारी दि.५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजताच्या दरम्यान नगराध्यक्ष सिद्धी वस्त्रे यांनी गवत्या मारुती चौक येथून मोठ्या पदयात्रेद्वारे वाजत गाजत येऊन मोहोळ नगर परिषदेमध्ये नगराध्यक्षा पदाचा पदभार स्वीकारला. प्रसंगी बोलताना नूतन नगराध्यक्ष सिद्धी वस्त्रे म्हणाल्या की आज पदभार घेण्याचा आनंद होत आहे. जनतेने ही मला संधी दिली,त्याबद्दल जनतेचे आभार व्यक्त करते. जनतेने सेवा करण्याची संधी दिली आहे. संधीचं सोनं करण्याचा प्रयत्न राहील. विरोधक हा निवडणुकीपुरता होता. यापुढे विरोधक हा राहणार नाही. विकास कामावर लक्ष देण्याचा प्रयत्न राहील.प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी हातात झाडू घेऊन मेन रोड मान्यवरांनी स्वच्छ करत स्वच्छ मोहोळ सुंदर मोहोळ घोषणाही दिल्या. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, ज्येष्ठ नेते पद्माकर देशमुख, माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर, शिंदे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चरणराज चवरे, अतुल क्षीरसागर, नगरसेवक चेतन देशमुख, अजय कुर्डे, लखन कोळी, नगरसेविका सपना आष्टुळ, साखराबाई बरकडे, राणी गोडसे, सर्फराज सय्यद, गणेश गावडेसह मान्यवर उपस्थित होते.

# सूत्रे घेताच मोहोळच्या नगराध्यक्षा सिध्दी वस्त्रेंच्या निवडीला आव्हान

## सोमेश क्षीरसागर यांनी केली जात पडताळणी विभागाकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.५ जानेवारी-**

मोहोळ नगरपरिषदेच्या निवडणुकीत सिध्दी राजू वस्त्रे ह्या नगराध्यक्षा म्हणून निवडून आल्या. दरम्यान, त्यांनी आजरोजी नगराध्यक्षपदाची सुत्रे स्वीकारताच त्यांच्या या निवडीला आव्हान देण्यात आले. सोमेश क्षीरसागर यांनी जात पडताळणी विभागाकडे तक्रार केली आहे. शीतल सुशील क्षीरसागर यांनी मोहोळ नगरपरिषदेची नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवली होती. पण त्यांचा पराभव झाला.

थेट नगराध्यक्षपदी निवडून आलेल्या सिद्धी राजू वस्त्रे यांची जात ही हिंदू बेडा जंगम नसून त्या फक्त हिंदू जंगम आहेत, असे तक्रारदार सोमेश क्षीसागर यांचे मत आहे. याबाबत सिद्धी वस्त्रे यांचे वडील राजू विश्वनाथ वस्त्रे यांचा शाळेचा दाखला जोडण्यात आला आहे. राजू विश्वनाथ वस्त्रे यांचा शाळेचा दाखला हा १९६९ सालातील आहे. सिद्धी वस्त्रे यांचा शाळेचा दाखला हा २००३ सालातील आहे.

सिध्दी वस्त्रे यांचे वडील राजू विश्वनाथ वस्त्रे यांचा १० ऑक्टोबर १९७८ रोजीचा विनाक्रमांकाचा जातीचा दाखला जोडण्यात आलेला आहे. त्याचे जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी कोणतेही कागदपत्रे रेकॉर्ड जोडली नाहीत. कोणती जात वडीलांकडून मुलांना प्राप्त होत असते. त्याअनुषंगाने सर्वात जुना पुरावा हा त्यांचा सिध्द करण्यासाठी उपयोग होणे आवश्यक असते. सिध्दी वस्त्रे यांचे आजोबा विश्वनाथ वस्त्रे सुशिक्षितच होते. हयात असताना त्यांनी पत्रकारिता केली आहे. त्यांचा जन्म १९२८ सालातील असून त्यांचा शाळा सोडल्याचा दाखला यावर जातीचा उल्लेख हा हिंदू जंगम असा करण्यात आलेला आहे. त्यांचा मुलगा राजू वस्त्रे यांच्या शाळेच्या दाखल्यावर बेडा जंगम चा उल्लेख आलेला आहे. तोच मुळात बेकायदेशीर आहे. त्यांची मुलगी सिध्दी वस्त्रे यांच्या रेकॉर्डवरही हिंदू बेडा जंगम अशी नोंद आहे.



सिध्दी राजू वस्त्रे यांचा वडिलांचा किंवा आजोबाचा कोणत्याही प्रकारे जातीचा दाखला वैध झालेला नाही. त्यामुळे बेडा जंगम असा उल्लेख असला तरी ते बेडा जंगम होऊ शकत नाहीत. निवडणूक अधिकाऱ्यांची शिफारस घेऊन जीआर सादर केलेला आहे. त्यामध्ये वंशावळचे प्रमाणपत्र दिलेले आहे. त्यात सिध्दी वस्त्रे यांचे चुलते दीपक गोपीनाथ वस्त्रे यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र असल्याचे नमूद करण्यात आले आहे. दीपक वस्त्रे यांचा जातीचा दाखला हा २९/७/२०१३ रोजी सादर केलेला असून २२/८/२०१३ रोजी त्यावर न्याय निर्णय झाल्याचे दिसून येईल. दीपक विश्वनाथ वस्त्रे यांना कोणत्याही दक्षता पथकाशिवाय किंवा कोणत्याही चौकशी शिवाय तोच पुराव्यावर जात वैधता प्रमाणपत्र अदा करण्यात आलेले आहे. समितीची दिशाभूल करत स्वतच्या चुलत्याच्या जात वैधता प्रमाणपत्रावरून स्वतःचे वैधता प्रमाणपत्र मागण्यासाठी घाई करण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

सिद्धी वस्त्रे यांचे चुलते दीपक विश्वनाथ वस्त्रे यांचा मुलगा दिग्विजय आणि किशोर दीपक वस्त्रे यांचेकडे हिंदू जंगम जातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी देखील हिंदू जंगम जातीची जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र स्वीकारलेली आहे. त्याचा लाभ देखील घेतलेला आहे. त्यामुळे त्यांना अनुसूचित जातीचा लाभ घेता येणार नाही.

सिद्धी राजू वस्त्रे यांचे कुटुंब ही हिंदू जंगम समाजाचे असून ते वीरभद्रेश्वरांचे मानकरी पुजारी आहेत. वीरभद्रेश्वर हे लिंगायत समाजातील उच्चवर्णियांचे कुलदैवत असून त्यांच्या लग्न समारंभामध्ये जंगम स्वामी कडून लग्न लावली जातात. सध्या त्यांचे कुटंब वीरभद्रेश्वर मंदिराच्या लगतच राहतात. त्यामुळे त्यांचे कुटुंबीय बेडा जंगम असू शकत नाही असे त्यांच्या तक्रारीत म्हटले आहे.

बेडा जंगम जातीच्या व्यक्ती अनुसूचित जातीच्या लोकवस्तीमध्ये वास्तव्यास असून अनुसूचित जातीतील लोकांची दहनविधी करणे, मढी ओढणे ही बेडा जंगम जातीची प्रमुख कामे आहेत. परंतु वस्त्रे कुटुंब हे वीरभद्रेश्वरांचे मानकरी आहेत. फक्त वडिलांच्या शालेय नोंदणीमध्ये मिळणारी असल्याचा गैरफायदा घेऊन बेडा जंगम जातीचे प्रमाणपत्र काढलेले होते. ते वैधकरणासाठी सादर करण्यात आलेले आहे. वस्त्रे कुटुंब हे हिंदू जंगम असून त्यांनी हिंदू बेडा जंगम या जातीचा दाखला पूर्णपणे चुकीच्या कागदपत्रावर मिळवलेला आहे. त्यांच्याकडे बेडा जंगम असल्याचा कोणताही कागदपत्रे पुरावा नाही. त्यांची संपूर्ण मदार ही त्यांचे आजोबा विश्वनाथ वस्त्रे यांच्या दाखल्यावर होती. विश्वनाथ वस्त्रे यांचा १९२८ चा शालेय नोंदणीचा दाखला त्यामध्ये स्पष्टपणे हिंदू जंगम अशी नोंद आहे. सर्वात शेवटचा संविधान पूर्वकाळातील महत्त्वाचा शालेय रेकॉर्ड पडताळले असता वस्त्रे यांची जात ही हिंदु जंगम असल्याचे सिध्द होते, असेही या तक्रारीत म्हटले आहे.

# २५ हजारांची लाच मागितली; कृषी सहाय्यकाविरुद्ध गुन्हा

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अक्कलकोट येथे येथे केली कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.५ जानेवारी-**

अक्कलकोट तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील कृषी सहाय्यक लक्ष्मीकांत अशोक सवळी वय ३९ यांच्याविरुद्ध शासकीय कामासाठी २५ हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशन गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तक्रारदार शेतकऱ्याने आपल्या शेतात फळबाग लागवड करण्याच्या उद्देशाने कृषी सहाय्यक सवळी यांची भेट घेतली होती. त्यांच्या सल्लयानुसार तक्रारदाराने आंबा फळबाग लागवड करण्याचे ठरवले होते. शासनाकडून फळबाग लागवडीसाठी टप्प्याटप्प्याने अनुदान मिळत असल्याने, कृषी सहाय्यकांच्या सूचनेनुसार महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जॉबकार्डधारक मजुरांकडून खड्डे खोदून घेण्यात आले होते. यानंतर सदर खड्ड्यांचे मजुरी बिल, रोपे खरेदी, लागवड व अनुदानाचे काम करून देण्यासाठी कृषी सहाय्यक सवळी यांनी तक्रारदाराकडे २५ हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त झाली.

यातील पहिला हप्ता म्हणून १५ हजार रुपये तत्काळ देण्याची व उर्वरित १० हजार रुपये नंतर देण्याची मागणी करण्यात आली होती. दि. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता लाच मागणी स्पष्ट झाल्याने दि. १० डिसेंबर २०२५ रोजी सापळा रचण्यात आला. या प्रकरणी कृषी सहाय्यक सवळी यांनी लोकसेवक या नात्याने सार्वजनिक कर्तव्य बजावण्यासाठी गैरफायदा मिळविण्याचा प्रयत्न केल्याने त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक अजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक प्रशांत चौगुले यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक रविंद्र लांभाते, तपास अधिकारी शैलेश पवार तसेच पोलीस अंमलदार सायबण्णा कोळी, शिरीषकुमार सोनवणे, संतोष नरोटे, गजानन किणगी व राहुल गायकवाड यांच्या पथकाने केली.

# मुख्यमंत्री फडणवीसांचा प्रचाराचा धडाका

**मुंबई, ५ जानेवारी**

राज्यातील महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराने अगदी सुरुवातीपासून वेग धरल्याचे चित्र आहे. महायुतीतील भाजप व शिवसेनेनेचे प्रमुख नेते संपूर्ण ताकदीने प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. साधारणपणे प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात राजकीय पक्षांचे प्रमुख नेते प्रचाराला निघतात मात्र ही निवडणूक सर्वच पक्षांनी गांभीर्याने घेतल्याचे दिसते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी अगदी सुरुवातीपासून राज्यभर प्रचारदौरा सुरू केला आहे. विदर्भातील अमरावती, चंद्रपूर पाठोपाठ त्यांनी मराठवाड्यातील नांदेड, परभणी व जालना येथे प्रचारसभा घेतल्या. यावेळी त्यांनी विरोधकांचा चांगला समाचार घेतला.



गत काळात अनेक नेत्यांचा विकास झाला पण लोकांचा विकास झाला नसल्याची टीका फडणवीसांनी परभणीत केली. परभणीचे नागरिक खूप भोळे आहेत. जगात जर्मनी अन भारतात परभणी, असे म्हणतात. पण काय अवस्था आहे परभणीची! स्वात्रंत्र्याच्या ७० वर्षानंतरही येथील राजकारण्यांना शहराचा विसर पडला असल्याचेही ते म्हणाले. लाडकी बहीण योजना बंद होणार नसून आता लाडक्या बहिणींना लखपती दीदी करयायचे असल्याचे त्यांनी सांगितले. परभणीच्या विकासाच्या आड जो येईल त्याला नेस्तनाबूत करू, असा सज्जड दम देखील यावेळी विरोधकांना दिला.

**पुण्यात विजय संकल्प**

मुख्यमंत्र्यांची सायंकाळी पुण्यात विजय संकल्प सभा पार पडली. पुणे हे वेगाने वाढणारे शहर असून महाराष्ट्राचे 'ग्रोथ इंजिन' आहे. पुण्यातील जलप्रदुषणाची समस्या लक्षात घेता सत्तेत येताच ११०० एमएलडी क्षमतेचे १२ एसटीपी प्लांट येथे सुरू केले. येथील जलप्रदुषण थांबविले असून रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट सुरू केले आहे. यामुळे नदीकिनारे देखणे होतील तसेच पूरनियंत्रणास मोठी मदत होणार असल्याचे फडणवीस म्हणाले.

# सोमनाथ मंदिर भारताच्या अदम्य आत्म्याचे प्रतीक

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

**नवी दिल्ली, ५ जानेवारी**

विदेशी आक्रमकांनी वारंवार हल्ले केल्यानंतर पुनर्बांधणी करण्यात आलेले गुजरातमधील सोमनाथ मंदिर हे भारतीय संस्कृतीच्या अदम्य भावनेचे प्रतीक आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी केले.

सोमनाथपेक्षा आपल्या संस्कृतीच्या अजिंक्य आत्मशक्तीचे दुसरे उत्तम उदाहरण असू शकत नाही, जे अनेक अडचणी आणि संघर्षांवर मात करून दिमाखाने उभे आहे, असे नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ मंदिरावर झालेल्या पहिल्या हल्ल्याला हजार वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त लिहिलेल्या एका ब्लॉगपोस्टमध्ये नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

१९५१ मध्ये मंदिराच्या उद्घाटनावेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना कोणताही उत्साह वाटला नाही, असे मोदी यांनी त्यांच्यावर टीका करताना म्हटले. २०२६ मध्ये सोमनाथ मंदिरावर झालेल्या पहिल्या हल्ल्याला हजार वर्षे पूर्ण होतील आणि त्यानंतर वारंवार हल्ले होऊनही हे मंदिर आजही डौलाने उभे आहे. कारण सोमनाथची कथा ही भारतमातेच्या त्या असंख्य सुपुत्रांच्या अतूट धैर्याची गाथा आहे, ज्यांनी आपली संस्कृती आणि सभ्यतेचे रक्षण केले, असे मोदी म्हणाले.



तोच उत्साह राष्ट्रातही दिसून येत आहे, जे शतकानुशतकांच्या आक्रमणांवर आणि वसाहतवादी लुटीवर मात करून जागतिक विकासाच्या सर्वांत उज्ज्वल केंद्रांपैकी एक म्हणून उदयास आले आहे. आपल्या मूल्यप्रणाली आणि आपल्या लोकांच्या दृढनिश्चयामुळेच आज भारत जगाच्या आकर्षणाचे केंद्र बनला आहे. जग भारताकडे आशा आणि सकारात्मकतेने पाहत आहे. त्यांना आपल्या नावीन्यपूर्ण तरुणांमध्ये गुंतवणूक करायची आहे, असे मोदी म्हणाले.

भूतकाळातील आक्रमक आता वाऱ्यातील धुळीसारखे झाले आहेत आणि त्यांची नावे विध्वंसाशी समानार्थी बनली आहे. ते इतिहासाच्या पानांवरील केवळ तळटीपा आहेत, तर सोमनाथ मात्र क्षितिजापलीकडे दूरवर प्रकाशमान होऊन उभा आहे आणि १०२६ च्या हल्ल्यामुळे किंचितही कमी न झालेल्या त्या शाश्वत आत्म्याची आठवण करून देत आहे, असे मोदी म्हणाले. (वृत्तसंस्था)

### चांगूलपणा ही मोठी शक्ती



सोमनाथ हे आशेचे एक गीत आहे, जे आपल्याला सांगते की, द्वेष आणि कट्टरता क्षणभरासाठी विनाश करण्याची शक्ती बाळगत असले, तरी चांगूलपणाच्या शक्तीवरील श्रद्धा आणि विश्वासात अनंतकाळासाठी निर्मिती करण्याची शक्ती आहे, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

### योग-आयुर्वेदाचा जगभरात प्रभाव

आपली कला, संस्कृती, संगीत आणि अनेक सण जागतिक स्तरावर पोहोचत आहेत. योग आणि आयुर्वेद जगभरात प्रभाव टाकत आहेत. यामुळे निरोगी जीवनशैलीला चालना मिळत आहे. जगासमोरील काही सर्वांत गंभीर आव्हानांवरची उत्तरे भारतातून येत आहेत, असे मोदी म्हणाले.

# नृत्य, पोवाडा, लोककलांच्या गजरातून समाजप्रबोधनाचा जागर

## विद्यापीठात 'उत्कर्ष' महोत्सवाचा सांस्कृतिक सोहळा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १६ व्या राज्यस्तरीय 'उत्कर्ष' सामाजिक व सांस्कृतिक महोत्सवात सोमवारी लोककलेच्या सादरीकरणातून समाजप्रबोधनाचा जागर करण्यात आला.

पोवाडा, भारुड, अभंग, संकल्पना नृत्य आणि लोकवाद्यांच्या तालावर विद्यापीठ परिसर अक्षरशः सांस्कृतिक उत्साहाने भारावून गेला. शाहिरांच्या खणखणीत आवाजात आणि डफाच्या जोशपूर्ण तालावर अफझलखानाचा वध, गड-किल्ल्यांचे महत्त्व आणि शिवरायांचे लोककल्याणकारी राज्य यांचे प्रभावी चित्रण करण्यात आले. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला आणि तरुणाईत नवचैतन्य संचारले. या राज्यस्तरीय महोत्सवात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, मुंबई विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि यजमान पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अशा एकूण १६ विद्यापीठांच्या संघांनी सहभाग नोंदवला. अभंग सादरीकरणावेळी संपूर्ण वातावरण भक्तीरसात न्हाऊन निघाले होते. संकल्पना नृत्याच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर प्रभावी भाष्य करण्यात आले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थिनीने लावणीच्या तालावर संकल्पना नृत्य सादर करुन शाश्वत विकासाचा संदेश दिला. यावेळी कवितांचेही जोरदार सादरीकरण झाले. कुलगुरु प्रा.डॉ.प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू प्रा.डॉ.लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.राजेंद्र वडजे, डॉ.केदारनाथ काळवणे, डॉ.वीरभद्र दंडे, डॉ.पंकज पवार यांनी नियोजन केले आहे.

# लवकरच वाढवू शकतो भारतावरील शुल्क

## • डोनाल्ड ट्रम्प यांची धमकी • माझ्या नाराजीची मोदींना जाणीव

**वॉशिंग्टन, ५ जानेवारी**

रशियाकडून होणाऱ्या तेल खरेदीमुळे मी नाराज होतो, याची जाणीव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आहे आणि आम्ही लवकरच भारतावरील शुल्क आणखी वाढवू शकतो, अशी धमकी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे.

फ्लोरिडा येथून वॉशिंग्टन डीसीला जात असताना डोनाल्ड ट्रम्प यांनी 'एअर फोर्स वन' विमानात पत्रकारांसोबत साधलेल्या संवादादरम्यान उपरोक्त टिप्पणी केली. भारताला मुळात मला खूश करायचे होते. मोदी खूप चांगले व्यक्ती आहेत. ते सज्जन आहेत. मी समधानी नव्हतो, हे त्यांना माहीत होते आणि मला खूश करणे महत्त्वाचे होते. ते व्यापार करतात आणि आम्ही त्यांच्यावर खूप लवकर शुल्क वाढवू शकतो. हे त्यांच्यासाठी खूप वाईट असेल, असे ट्रम्प म्हणाले.



भारताने रशियाकडून तेल खरेदी कमी करण्यामागे ट्रम्प यांनी लादलेले शुल्क हे एक प्रमुख कारण आहे, असे ट्रम्प यांच्यासोबत विमानात प्रवास करणारे अमेरिकी सिनेटर लिंडसे ग्रॅहम यांनी म्हटल्यानंतर ट्रम्प यांची टिप्पणी आली आहे. शुल्क विधेयकाबद्दल माहिती देताना ग्रॅहम यांनी सांगितले की, या माध्यमातून रशियन तेल खरेदी करणाऱ्या देशांवर ५०० टक्के कर लावण्याचा प्रस्ताव आहे.

रशिया आणि युक्रेनमधील युद्ध थांबविण्यासाठी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्या ग्राहकांवर दबाव टाकणे आवश्यक आहे, असे ग्रॅहम यांनी सांगितले. या निर्बंधांमुळे रशियाचे खूप मोठे नुकसान होत असल्याचे ट्रम्प यांनी सांगितले, नंतर त्यांनी भारताचा उल्लेख केला. रशियाकडून तेल खरेदी करण्यासाठी भारतावर २५ टक्के शुल्क लादण्यात आले आहे, असे ग्रॅहम नंतर म्हणाले. मी महिनाभरापूर्वी भारतीय राजदुतांची भेट घेतली. रशियन तेल कमी प्रमाणात खरेदी केले जात आहे, याबद्दलच ते बोलत होते. तुम्ही राष्ट्राध्यक्षांना सांगून शुल्क कमी करायला लावाल का, असेही त्यांनी विचारल्याचा दावा ग्रॅहम यांनी केला. (वृत्तसंस्था)

## भरधाव कारची दुचाकीला धडक; एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि.५ जानेवारी-**

सोलापूर-पुणे महामार्गावर शेटफळ गावासमोर भरधाव कारची दुचाकीला पाठी मागून जोरदार धडक बसली. यामध्ये दुचाकीचालकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. कारमधील तिघे किरकोळ जखमी झाले मुंबईवरुन सोलापूरच्या दिशेने जाणाऱ्या एम.एच.४६-५४०८ या क्रमांकाच्या कारने एम.एच.१३-६०३९ या क्रमांकाच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. दि.५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. युवराज बजरंग शिंदे (वय-५५, रा.सिध्देवाडी, ता.मोहोळ) असे मृताचे नाव आहे. किरकोळ जखमी झालेल्यांना शेटफळ शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. क्रेनच्या मदतीने दोन्ही वाहने बाजूला करुन वाहतूक सुरळीत करण्यात आली.

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा

'सोलापूर तरुण भारतची दिनदर्शिका सांगे भविष्याची दिशा'

- नव्या वर्षाची नवी कोरी दिनदर्शिका
- वर्षभर संग्रही राहील अशा वाचनीय मजकुरासह २४ पानांची रंगीत दिनदर्शिका
- प्रत्येक तारखेचा बारीक-सारिक तपशील
- तिथी वार, नक्षत्र, बारा राशींचे भविष्य
- संकष्टी चतुर्थी, गावोगावचे चंद्रोदय
- आरोग्य विषय व बारा ज्योतिर्लिंग माहितीसह भरगच्च मजकूर

आजच आपल्या दिनदर्शिकेची अंक वितरकाकडे नोंदणी करा.



नोंदणीसाठी संपर्क : 8888847267

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# भाबडे भाषक भान

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे दुसरे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्यात संपन्न झाले. साताऱ्याचे संमेलन ९९ वे होते. आता शंभरावे संमेलन पुण्यात होणार आहे. शेकडो वर्षे जुनी भाषा, तितकाच जुना साहित्य व्यवहार आणि १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची घोषणा या पृष्ठभूमीवर आपल्या माय मराठीच्या सद्य:स्थितीच्या संदर्भात वास्तववादी चिकित्सा करणे आवश्यक ठरते. यातील सर्वांत पहिला मुद्दा मराठी भाषेच्या भविष्याबद्दल आणि त्या भाषेतील विविध साहित्य प्रवाहांबद्दलच्या गळेकाढूपणाचा. आपली संमेलने, मग अखिल भारतीय असोत किंवा जिल्हा स्तरावरची असोत, ती गळेकाढूपणासाठी प्रसिद्ध आहेत. साताऱ्यातही तेच झाले. गर्दी चांगली होती. ग्रंथ विक्री चांगली झाली. पण, बव्हंशी सूर हा विविध विषयांवर चिंता व्यक्त करणारा. नपेक्षा ठरावांमध्ये काही चांगल्या बाबी आहेत. भाषेची सक्ती, मराठी माध्यमाच्या शाळा बंद करण्याचा विषय, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील ८६५ गावांचा प्रश्न, ग्रंथपालांची पदे असे मुद्दे ठरावांमध्ये घेतले गेले हे छानच. परंतु, एकुणात आपली भाषक समज आणि भान हे भाबडे आणि भावनिक असल्याचेच पुन: एकवार अधोरेखित झाले. राज्यातील प्रत्येक बसस्थानक आणि नगरपालिकेत पुस्तकाच्या दुकानांना सवलतीची जागा देऊ वगैरे घोषणा झाल्या. त्यातून फार काही हाती पडणारे नाही हे आजच स्पष्ट आहे. आपण हुतात्म्यांची स्मारके केली, समाजभवने केली. त्यातून फार काही हाती लागले नाही. आता मराठीला अभिजात दर्जा प्राप्त झाल्याच्या पृष्ठभूमीवर तिला व्यवहार भाषा आणि ज्ञानभाषा बनवण्याच्या दृष्टीने ठोस कृती कार्यक्रमही हाती घेतला गेलेला दिसत नाही. खरी चिंता व्यक्त करावी तो विषय हाच.

जगात सात हजारावर भाषा बोलल्या जातात. चिनी-मँडेरिन, इंग्रजी, हिंदी, स्पॅनिश, अरबी या त्यातील प्रमुख भाषा. पाच ते दहा कोटी लोक ज्या भाषा बोलतात, त्या भाषांत मराठीचा समावेश आहे. तेलगू आणि तामिळ भाषाही त्यात आहे. त्यामुळे मराठी भाषा विलुप्त वगैरे होईल, अशी भीती व्यक्त करणे अनाठायी आहे. कोट्यवधी लोक जी भाषा बोलतात, ज्या भाषेत व्यवहार करतात, ज्या भाषेत मोठ्या प्रमाणात लेखन-वाचन-अध्ययन-अध्यापन होते, ती भाषा विलुप्त होण्याची शक्यताच नाही. खरा प्रश्न आहे तो असा की, मराठी भाषेला महाराष्ट्रात सार्वत्रिक स्वरूपात व्यवहार भाषेचा दर्जा मिळण्याचा. सरकारी कामकाजात मराठीला बऱ्यापैकी प्रतिष्ठा आहे. तशी ती व्यवसाय-उद्योग-कॉर्पोरेट जगतात नाही. भाषांच्या बाबतीत असे म्हटले जाते की, एखाद्या भाषेला ज्ञानभाषा, लोकभाषा किंवा व्यवहार भाषा बनविण्यासाठी तीन गोष्टी महत्त्वाच्या असतात. पहिली म्हणजे ती भाषा शासन-प्रशासनाची असली पाहिजे. दुसरी बाब म्हणजे व्यापार-उदिम त्या भाषेत चालला पाहिजे आणि तिसरे म्हणजे सैन्यदलात त्या भाषेचा वापर होत असला पाहिजे. मराठी यातील फक्त एक अट पूर्ण करते आणि ती म्हणजे शासन-प्रशासनातील वापराची. सैन्यदलात मराठीचा वापर व्हावा, असा विचार करण्याचे कारण नाही. पण, व्यापार-व्यवसायाची व्यवहार भाषा म्हणून तिला प्रतिष्ठा देण्याचा प्रयत्न जरूर झाला पाहिजे. त्यासाठीची पूर्वअट अशी की, मराठी ही ज्ञानभाषा झाली पाहिजे. मराठी ही प्राथमिक स्तरावर ज्ञानभाषा आहे काय, या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी आहे. परंतु, त्यापुढे किंवा उच्च शिक्षणाच्या प्रक्रियेत तिच्याविना कुणाचे अडते काय, या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी आहे. कितीही विद्यापीठे आणि मंडळे-महामंडळे केली तरी ती ज्ञानभाषा बनू शकत नाही. त्याची कारणे अनेक आहेत. मराठीत आजही अद्ययावत ज्ञानकोश निघत नाहीत. अद्ययावत शब्दकोश निघत नाहीत. जे छापून तयार झालेले आहेत, त्यातील बरेच जुने झाले आहेत. त्यांचे ‘अपडेशन’ अपेक्षेप्रमाणे होताना दिसत नाही. साध्या गॅझेटियर्सचे उदाहरण घ्या. इंग्रजांनी तयार केलेले गॅझेटियर्स आजही संदर्भासाठी वापरले जातात. त्यातील सर्व नोंदी स्वातंत्र्यपूर्व काळातील आहेत. त्यानंतर मराठीत काही प्रमाणात गॅझेटियर्स झाले, पण त्यांचेही अद्ययावतीकरण गरजेनुसार होताना दिसत नाही. या साऱ्यांहून पुढचा आणि सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे तो ज्ञानभाषा बनण्यासाठी अन्य भाषांतील ज्ञान मराठीत येण्याचा. त्या बाबतीत सगळाच आनंदी-आनंद आहे. किमान एका शाखेचे पूर्ण अद्ययावत ज्ञान, अगदी उच्च शिक्षणाच्या स्तरापर्यंत, मराठीतून देण्याची तयारी अद्याप झालेली नाही. आम्ही मराठीतून वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू करू, हे घोषणेसाठी ठीक वाटते. प्रत्यक्षात ते करण्यात बऱ्याच अडचणी आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. पण, भाषेच्या बाबतीतील भावनिकता असा विचार करू देत नाही. या संदर्भात दोन्ही बाजूंनी अडचणी आहेत. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात एमबीबीएसचा अभ्यासक्रम मराठीतून सुरू करायचे ठरले तर त्यासाठी पाठ्यपुस्तके किंवा संदर्भग्रंथ मराठीतून उपलब्ध आहेत काय?... आणि समजा तशी ती तयार केली गेली तर मराठी माध्यमातून एमबीबीएस झालेली व्यक्ती तेलंगणा किंवा ओडिशात प्रॅक्टिस करू शकेल काय?... या दोन्ही प्रश्नांची उत्तरे दिल्याखेरीज वैद्यकीयच काय, कोणत्याच शाखेचा अभ्यासक्रम मराठीतून सुरू करण्याचा विचार करता येत नाही. या अडचणी व्यावहारिक आहेत. तेथे भावनिक उमाळा कामाचा नाही. भाबडेपणा उपयोगाचा नाही.

मराठी भाषा अतिशय समृद्ध आहे. तिच्या साहित्य व्यवहाराला मोठी परंपरा आहे. दरवर्षी अखिल भारतीय स्तरावरील भव्य साहित्य संमेलन भरविणारी ही एकमेव भाषा. त्यामुळे ती सशक्त भाषा आहे, यात वाद नाही. ती अधिक व्यापक व्हायची असेल तर आपल्याला भाषेच्या बाबतीतील भावनिकता आणि भाबडेपणा बाजूला ठेवावा लागेल. अन्य भाषांतून येणारे शब्द सामावून घेतले जातात तेव्हा भाषा समृद्ध होते. इंग्रजीचे उदाहरण त्यासाठी नेहमीच दिले जाते. जगातील सर्व प्रमुख भाषांतील शब्द इंग्रजीने आपलेसे केलेले आहेत. वर्ष-दोन वर्षांत इंग्रजीचा अद्ययावत शब्दकोश येतो. परभाषांतील शब्द सामावून घेतो. ते परके शब्द इतके इंग्रजाळतात की त्यांच्यावरील परभाषेची छाप पूर्णपणे निघून जाते. मराठीबद्दलच्या आपल्या आस्थेत भावनिकता मोठी. त्यामुळे अन्य भाषांतील शब्दांचा वापर जरासा झाला तरी भाषा भ्रष्ट झाल्याचा किंवा होत असल्याचा कल्ला करणारे लोक आहेत. भाषा हा संस्कृतीचा अविभाज्य भाग असेल तर तो कधीही साचेबद्ध राहता कामा नये. संस्कृती ही सदैव प्रवाहित असते. तशी भाषा देखील प्रवाही असली पाहिजे. परिवर्तनशील असली पाहिजे. तिच्यात नवे शब्द आले पाहिजेत. तिच्या अभिजात कृती अन्य भाषांत गेल्या पाहिजेत आणि अन्य भाषांतील उत्तमोत्तम रचना आपल्या भाषेत आल्या पाहिजेत.

वाचन संस्कृती हा यानंतरचा मुद्दा. लोक अजूनही वाचतात. पुस्तकांचे खप कमी झाले आहेत, पण लोक स्क्रीनवर वाचतात. या विषयावर वेगळे लिहिता येईल. लिहिणाऱ्यांची आणि वाचणाऱ्यांची संख्या नेहमीच कमी असते. शिवाय, पूर्वी पुस्तकाचे वाचन हा त्यातल्या त्यात एकमेव विरंगुळा होता. आता विरंगुळ्याची अनेक साधने आहेत. नव्या काळातील विषयांचे पुस्तक इतर भाषेतून आपल्या भाषेत अनुवादित झाले असले तरी ते आवर्जून वाचले जाते की नाही? मग मूळ मराठीतून तसे कां लिहिले जात नाही? याचे कारणही पुन्हा आपण स्वत:भोवती घालून घेतलेल्या भाषक वर्तुळाच्या व्याप्तीत दडलेले आहे. एकुणात मराठी भाषेचा साहित्य व्यवहार हा त्यातील ‘स्टेकहोल्डर्स’मुळे बंदिस्त आणि मर्यादित राहिलेला आहे आणि त्यामागे आपली भाषक समज अतिशय भाबडी आणि भावनिक असणे हेच महत्त्वाचे कारण आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सुपर इंटेलिजन्सच्या वाढत्या प्रभावाच्या पृष्ठभूमीवर होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात यादृष्टीने मंथन, चिंतन व्हावे आणि मराठीला ज्ञानभाषा व व्यवहार भाषा बनविण्यासाठी आवश्यक तो कृती कार्यक्रम जाहीर व्हावा, हीच अपेक्षा.


## आंतरराष्ट्रीय

# मित्र देश कसे झाले शत्रू?

**प्रा. जयसिंग यादव**

आखाती प्रदेशातील स्पर्धा ही मुस्लिम देशांचे खलिफा बनण्याची शर्यत आहे. सुरक्षा असो, तेल असो, राजनय असो किंवा प्रादेशिक राजकारण; सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती (यूएई) हे दोघेही प्रत्येक आघाडीवर एकत्र काम करायचे; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये परिस्थिती बदलली आहे. त्यांच्यातील अविश्वासाची दरी इतकी रुंदावली, की आज शत्रुत्वात बदलली आहे. आता येमेन मुद्यावरून सौदी अरेबिया आणि यूएईमध्ये तणाव वाढला आहे. सौदी अरेबिया आणि यूएईमध्ये येमेनच्या भूमीवर संघर्ष सुरू झाला आहे. सौदी अरेबियाने येमेनमध्ये यूएईच्या मालकीच्या शस्त्रास्त्रांच्या मालवाहतुकीवर हवाई हल्ला केला. यामुळे सौदी अरेबिया आणि यूएईमधील संबंध ताणले गेले. सौदी सैन्याने येमेनमधील मुकाल्ला या दक्षिणेकडील बंदरावर वारंवार बॉम्बहल्ला केला. त्यामुळे दोन्ही देशांमधील तणाव वाढला. परिस्थिती इतकी बिकट झाली की येमेनमधील सौदी समर्थित सरकारने यूएईच्या सैन्याला देश सोडण्यासाठी २४ तासांचा अल्टिमेटम दिला. त्यानंतर, यूएईनेही घाईघाईने आपले उर्वरित सैन्य मागे घेतले. त्यांच्या संरक्षण मंत्रालयाने एक निवेदन जारी केले, की ते येमेनमधील आपली उर्वरित लष्करी उपस्थिती संपवेल. इतिहासात मागे वळून पाहिले, तर लक्षात येईल की दोन्ही देशांमधील शत्रुत्व नवीन नाही. दोघे चांगले मित्र राहिले आहेत. अनेकदा आखाती देशांमध्ये या दोन्ही देशांमधील मैत्रीचे दाखले जात होते; परंतु काही हितसंबंधांमुळे ही मैत्री आता शत्रुत्वात बदलली आहे. सौदी अरेबिया आणि यूएई हे आखाती प्रदेशातील दोन प्रमुख मुस्लिम देश एके काळी घनिष्ठ मित्र होते. त्यांनी अरब जनांदोलनांपासून येमेन युद्धापर्यंत अनेक कारवायांप्रसंगी एकत्र काम केले; पण आता परिस्थिती बदलली आहे.

आर्थिक स्पर्धा, प्रादेशिक प्रभाव आणि वेगवेगळ्या रणनीतींमुळे त्यांना शत्रू बनवले आहे. ही कहाणी शतकानुशतके जुन्या संबंधांपासून सुरू होते आणि आजच्या भू-राजकीय तणावापर्यंत पोहोचते. सौदी अरेबिया सुरुवातीपासूनच यूएईचा समर्थक होता. दोन्ही देश सुन्नी मुस्लिमबहुल राजेशाही आहेत. दोघांची अर्थव्यवस्था तेलावर अवलंबून आहे. आखातातील इराणच्या वाढत्या प्रभावाबद्दलची चिंता आणि आखाती प्रदेशात स्थैर्य राखण्याचे सामायिक ध्येय यामुळे त्यांना जवळ आणले गेले होते. दोघांमधील दीर्घकालीन मैत्रीमध्ये इराण हा एक घटक आहे. दोन्ही देशांची मैत्री २०१० च्या दशकाच्या सुरुवातीला घट्ट झाली. क्राऊन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान (एमबीएस) आणि यूएईचे शासक मोहम्मद बिन झायेद (एमबीझेड) यांनी आपले वैयक्तिक संबंध मजबूत केले. ते इस्लामिक कट्टरतावाद आणि इराणविरुद्ध एकत्र



आले. तथापि, हळूहळू तेढ निर्माण झाली. सौदी अरेबिया आणि यूएई हे आखाती प्रदेशात सुरक्षेचे दोन मजबूत आधारस्तंभ मानले जात. २०११ मध्ये जेव्हा अरब स्प्रिंग क्रांतीला वेग आला, तेव्हा त्यांनी येमेनमध्ये इराण समर्थित हौथींविरुद्ध युती स्थापन केली. अरब स्प्रिंग क्रांतीने मध्य पूर्वेतील राजकारणाला हादरवून टाकले. इजिप्तमधील जनरल सिसी यांच्या सरकारला पाठिंबा देणे असो किंवा लिबिया आणि येमेनमध्ये हस्तक्षेप करणे; दोन्ही देशांनी एकत्र रणनीती आखली. त्यांची जोडी ‘अरब जगाचे जुळे स्तंभ’ म्हणून ओळखली जाऊ लागली.

२०११ मध्ये, यूएई आणि सौदी अरेबियाने इस्लामी चळवळींविरुद्ध संयुक्त आघाडी स्थापन केली. त्यांनी बहरीनमधील उठाव दडपण्यासाठी संयुक्त सैन्य पाठवले आणि २०१३ मध्ये इजिप्तमधील मुस्लिम ब्रदरहूड सरकारच्या लष्करी हकालपट्टीसाठी सहकार्य केले. मार्च २०१५ मध्ये दोन्ही देशांनी हुथी बंडखोरांविरुद्ध लष्करी मोहीम सुरू केली. यूएईने सैन्य पुरवले, तर सौदी अरेबियाने हवाई शक्ती पुरवली. तथापि, २०१९ मध्ये यूएईने आपले सैन्य मागे घेतले आणि दक्षिणी फुटीरतावाद्यांना (एसटीसी) पाठिंबा दिला, तर सौदी अरेबिया येमेनी सरकारसोबत राहिला. हा पहिला मोठा वाद होता. जून २०१७ मध्ये दोन्ही देशांनी कतारवर दहशतवादाला पाठिंबा देण्याचा आरोप करत बहिष्कार टाकला. २०२१ च्या ‘अल-उला’ शिखर परिषदेत सौदी अरेबियाने कतारशी समेट केला, तर यूएईने सौम्य भूमिका घेतली. सप्टेंबर २०२० मध्ये यूएईने इस्रायलशी संबंध सामान्य केले; परंतु सौदी अरेबिया पॅलेस्टिनी राज्याच्या मागणीवर ठाम राहिला. २०२२ मध्ये यूएई-इस्रायल व्यापार २.५ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला; परंतु सौदी अरेबियाने त्यापासून स्वत:ला दूर केले. असे म्हटले जाते की सौदी अरेबियाचे इस्रायलशी असलेले शत्रुत्व आणि यूएईची इस्रायलशी असलेली जवळीक हे शत्रुत्वाचे एक प्रमुख घटक होते.

जुलै २०२१ मध्ये यूएईने ‘ओपीईसी’मध्ये सौदी अरेबियाच्या नेतृत्वाखालील उत्पादन कपात रोखली आणि आपल्या बेसलाईनमध्ये वाढ करण्याची मागणी केली. फेब्रुवारीमध्ये सौदी अरेबियाने परदेशी कंपन्यांना रियाधमध्ये मुख्यालय स्थापन करण्यास सांगितले आणि दुबईला आव्हान दिले. जुलैमध्ये सौदी अरेबियाने संयुक्त अरब अमिरात मुक्त क्षेत्रांमधून आयातीवरील शुल्क उठवण्यास नकार दिला. सुदानी गृहयुद्ध एप्रिल २०२३ मध्ये सुरू झाले. या वेळी यूएईने ‘रॅपिड सपोर्ट फोर्सेस’ला शस्त्रे पुरवली, तर सौदी अरेबियाने सुदानी सशस्त्र दलांना पाठिंबा दिला आणि युद्धबंदी चर्चा आयोजित केली. डिसेंबर २०२४ मध्ये सीरियामध्ये असद यांना पदच्युत करण्यात आले. दोन्ही बाजूंनी नवीन नेतृत्वाशी संपर्क साधला; परंतु यूएईने असद यांच्यावर टीका केली. येमेनमध्ये याच महिन्यात यूएई समर्थित ‘एसटीसी’ने सौदी अरेबियाची ‘लाल रेषा’ ओलांडून हद्रामौत तेलक्षेत्रे ताब्यात घेतली. सौदी जेट आणि यूएई यांच्यात शत्रुत्व सुरू झाले. शत्रुत्वाचा मुख्य स्रोत येमेनमधील मुकाला हे दक्षिणेकडील बंदर होते. सौदीच्या नेतृत्वाखालील युतीने मुकाल्ला बंदरावर हवाई हल्ला केला.

सौदी अरेबियाने स्पष्टपणे सांगितले की, हा हल्ला यूएईच्या शस्त्रास्त्रांच्या मालवाहतुकीला लक्ष्य करत होता. तथापि, यूएईने सौदी अरेबियाचे दावे फेटाळून लावले आणि म्हटले की हल्ला केलेल्या मालवाहतुकीत शस्त्रे नव्हती, तर यूएईच्या लष्करासाठी पुरवठा आणि उपकरणे होती. या महिन्याच्या सुरुवातीपासूनच सौदी अरेबिया आणि यूएई या आखाती देशांमधील तणाव सातत्याने वाढत आहे. यूएईने केलेल्या घोषणेमुळे हा तणाव कमी होत असल्याची अटकळ निर्माण झाली. असे असूनही, दोन्ही देशांच्या भू-राजकीय महत्त्वाकांक्षांमधील संघर्ष अधिकाधिक स्पष्ट होत आहे. संयुक्त अरब अमिरातीच्या संरक्षण मंत्रालयाने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की ते येमेनमधून आपली उर्वरित लष्करी उपस्थिती मागे घेईल. आम्ही २०१५ पासून अरब युतीचा भाग आहोत आणि येमेनमधील कायदेशीर सरकारला पाठिंबा देत आहोत. संयुक्त अरब अमिरातीच्या सैन्याने २०१९ मध्ये येमेनमधील आपले मुख्य लष्करी ऑपरेशन पूर्ण केले आणि परतले; परंतु अतिरेकी शक्तींना रोखण्यासाठी काही सैन्य मागे ठेवण्यात आले होते. तथापि, अलिकडच्या घडामोडींच्या पृष्ठभूमीवर, संरक्षण मंत्रालय उर्वरित सैन्य मागे घेण्याचे आवाहन करत आहे. हा तात्पुरता शह असला, तरी गेल्या दशकभरातील शत्रुत्व पाहता या दोन देशांमधील संघर्ष संपण्याची शक्यता कमीच आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# बांगलादेशची मान मोदींच्या हातात

बांगलादेशच्या जन्मापासून कधी नव्हे एवढे संबंध भारताशी ताणले गेले आहेत. त्यास कारणीभूतही स्वत: बांगलादेश असून, त्याने स्वत:च पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे. भारताशिवाय पर्याय नसतानाही बांगलादेशच्या सध्याच्या नेतृत्वाने हा आत्मघाती पर्याय निवडला आहे. मागील एका महिन्यामध्ये तीन हिंदूंच्या हत्या करण्यात आल्या. तेथील हिंदूंचा अतोनात छळ अजूनही सुरू आहे. बांगलादेशात नवीन उदयास आलेले पक्ष भारतविरोधी गरळ ओकत आहे. भारताची सात पूर्वोत्तर राज्ये आम्ही तोडून भारताचे तुकडे पाडू. भारताला धडा शिकवू अशा प्रकारच्या घोषणा सध्या बांगलादेशमधील अनेक नेते देत आहेत. तेथील अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूसही बाहेर देशामध्ये जाऊन भारतविरोधी गरळ ओकण्यात सध्या आघाडीवर आहेत. त्यामुळे या देशाबद्दल भारतानेही आपल्या धोरणामध्ये बदल करून धडा शिकविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

चीनमध्ये जाऊन युनूस यांनी चीनला पूर्वोत्तरमध्ये येण्याचे आमंत्रण दिले. अशा प्रकारे भारताला डिवचण्यासाठी युनूस आणि तेथील नेते सध्या टपून बसले आहेत. असे असले तरी बांगलादेशची मान सध्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातामध्ये असून, ती नरेंद्र मोदी यांनी



आवळली तर बांगलादेशमध्ये हाहाकार माजल्याशिवाय राहणार नाही. बांगलादेशात वाहणाऱ्या सर्व नद्या भारतामधून जातात. त्यामधील सर्वाधिक महत्त्वाची नदी म्हणजे गंगा आहे. या गंगा नदीच्या मुख्य प्रवाहाने बांगलादेशमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यास पद्माच्या नावाने ओळखले जाते. भारत आणि बांगलादेश यांच्यामध्ये १२ डिसेंबर १९९६ साली गंगा नदी पाणी करार झाला होता. तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना आणि भारताचे पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांनी या करारावर स्वाक्षरी केली होती. हा करार ३० वर्षांसाठी असल्याने या कराराची मुदत यावर्षी डिसेंबर महिन्यामध्ये संपत आहे. त्यामुळे बांगलादेशच्या जर मुसक्या आवळायच्या असतील तर भारताने हा संपूर्ण करार रद्द करून बांगलादेशमध्ये जाणारे गंगेचे पाणी स्वतःसाठी राखीव ठेवायला हवे. या करारानुसार भारत दरवर्षी बांगलादेशला जवळपास ३५ हजार क्यूसेस पाणी देतो. या पाण्यावरच बांगलादेशची तहान भागविली जाते. या व्यतिरिक्त ब्रह्मपुत्र आणि मेघना या दोन प्रमुख नद्यांचा प्रवाहही भारतातूनच बांगलादेशात जातो. त्यामुळे बांगलादेशने कितीही उड्या मारल्या, कितीही वल्गना केल्या तरी त्यांच्या मुसक्या आवळण्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एक निर्णय पुरेसा आहे. १९७१ पासून भारताने बांगलादेशसोबत सदैव मैत्रीचा हात पुढे करून त्यास मदतच केली आहे. त्या मदतीची परतफेड जर शत्रुत्वाने होत असेल तर भारतानेही गंभीरतेने या बाबीचा विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. पहलगामच्या अतिरेकी हल्ल्यानंतर पाकिस्तानसोबतचा पाणी करार पूर्णपणे रद्द करून भारताने पाकिस्तानला त्याची जागा दाखवून दिली. त्यामुळे मोहम्मद युनूस यांच्या काळजाचे ढोके वाढायला सुरुवात झाली आहे. नरेंद्र मोदी आपणासही पाकिस्तानसारखा दणका देईल की काय या भीतीने त्यांची झोप उडाली आहे. त्यामुळे त्यांना हा करार करण्याची घाई झाल्याचे दिसून येत आहे. २०१४ नंतर इच्छाशक्ती दृढ असलेला नवीन भारत साऱ्या जगाने बघितला आहे. केंद्र सरकारचे धोरण बघता हा करार यापुढे होणार नाही, असा विश्वास जनतेला आहे. नरेंद्र मोदी यांच्या कूटनीतीने पाकिस्तानची संपूर्ण जगामध्ये नाचक्की झाली आहे. बांगलादेशची वाटचालही त्याच दिशेने सुरू आहे. या होणाऱ्या उलथापालथीने काँग्रेसच्या युवराजांना बांगलादेशचा उमाळा येऊन ते नरेंद्र मोदी यांना घेरून पुन्हा एकदा बदनाम करण्याचा प्रयत्न नक्कीच करतील. भारतातील जनतेने काँग्रेसला नाकारल्यामुळे त्यांच्या सर्व आशाआकांक्षा विदेशाकडे लागल्या आहेत. सत्तेसाठी विदेशामध्ये जाऊन खटाटोप करणे हा सध्या त्यांचा एकमेव आवडता कार्यक्रम आहे. परंतु, विचलित न होता राष्ट्र प्रथम या भावनेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दिशा ठरलेली आहे. जनतेच्या मनामध्ये काय आहे, हे ते पक्के जाणून आहे. त्यामुळे बांगलादेशही वठणवीवर येण्यास फार काळ लागणार नाही, एवढे मात्र नक्की.

९८८१७१७८५६

## इतस्तत:

# नववर्षात भारताची गगनभरारी!

**दत्तात्रेय आंबुलकर**

भारताच्या या यशस्वी अंतराळ अभियानाची पृष्ठभूमी म्हणजे, २०२५ मध्ये विविध टप्प्यांवर भारताने आपल्या यशाची छाप पाडली आहे. याचे श्रेय सर्वस्वी इस्रो व इस्रोअंतर्गत बंगळुरू, अहमदाबाद, त्रिवेंद्रम येथील संशोधक-अभ्यासक व त्यांचे मार्गदर्शक यांचे असून, केंद्र सरकारच्या नियोजन-प्रोत्साहनाचासुद्धा त्यामध्ये महत्त्वाचा वाटा आहे. याआधीच्या दशकांमध्ये भारताच्या अंतरिक्ष धोरण आणि मोहिमेला अभियांत्रिकी-तंत्रज्ञान व अंतराळ विज्ञानाची जोड मिळत होती. या मूलभूत तंत्रज्ञान व अभियांत्रिकीला भारतीय संशोधकांच्या अभ्यासपूर्ण प्रयत्नांची जोड मिळत गेली. यातूनच चांद्रयान, मंगळयान, आदित्य एल-१ यांसारख्या मोहिमांचे यशस्वीपणे क्रियान्वयन झाले. याच यशाचा पुढचा टप्पा म्हणून आता २०२५ मध्ये भारतीय अंतराळ अभियानाला सर्वाधिक पाठबळ देण्यासाठी न्यू स्पेस इंडिया लिमिटेडची स्थापना करण्यात आली. भारतीय अंतराळ संशोधन क्षेत्रात हा एक महत्त्वाचा व निर्णायक टप्पा ठरणार आहे.

नवीन वर्ष २०२६च्या पहिल्या टप्प्यातच भारताने आपल्या अंतराळ संशोधन क्षेत्रात महत्त्वाच्या अशा सहा प्रक्षेपण प्रकल्पांची सिद्धता केली आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. यामध्ये न्यू स्पेस इंडिया लिमिटेडचे अंतराळ प्रक्षेपण-संशोधनासाठी आवश्यक असे माहिती-तंत्रज्ञान, मूलभूत सुविधा, पायाभूत रचना इ.सह प्रत्यक्ष सहकार्य व मार्गदर्शन लाभणार आहे. याचे मोठे व सकारात्मक परिणाम निश्चितपणे होणार आहेत.

अंतराळात भारत आणि भारतीयांचे केवळ पदार्पणच पुरेसे. आपले बस्तान बसविण्यासाठी इस्रोला अंतराळ सुरक्षा व प्रगत तंत्रज्ञानासह आपले प्रयत्न आणि तयारी यशस्वीपणे सिद्ध करावी लागेल. त्यादृष्टीने इस्रोचे प्रयत्न आणि नियोजनदेखील सुरू आहे. या तयारीमध्ये मानवरहित संशोधन यानापासून अंतराळयानातून भारतीय शास्त्रज्ञांना अंतराळात सुरक्षितपणे पाठविणे व त्यानंतरही त्यांच्या सुरक्षिततेची निश्चिती करणे आवश्यक आहे. यासाठी इस्रोतर्फे अंतराळात मानवीय सुरक्षेसाठी आवश्यक प्रयत्नांना चालना देण्यात आली असून, या प्रयत्नांना अधिक गतिमान करणे आवश्यक आहे.

याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून नवीन वर्षाच्या पहिल्या टप्प्यात इस्रोतर्फे प्रायोगिक स्तरावर मानवासह असणारे गगनयान अंतराळात पाठविण्यात येणार असून, त्याद्वारे अंतराळात मानवीय सुरक्षेच्या चाचणीची पडताळणी केली जाणार आहे. या प्रस्तावित प्रयोगाकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. इस्रोच्या पुढील अंतराळ मोहिमांच्या




यशाचा पूर्व-टप्पा म्हणून हे प्रयत्न निर्णायक ठरणार आहेत. या चाचणीदरम्यान मानवीय जीवनासाठी आवश्यक अशा प्राणवायू, पर्यावरण, तापमान इ. महत्त्वपूर्ण बाबींची पूर्तता यानिमित्ताने होणार आहे.

मानवसहित अंतराळयान अंतराळात यशस्वीपणे पाठवून ते स्थिरावण्यासाठी व या प्रयोगाच्या यशस्वितेची पडताळणीच नव्हे, तर खातरजमा करण्यासाठी विविध प्रकारची परिस्थिती आणि बदलते वातावरण इ. कठीण परिस्थितीवर मात करण्यासाठी विविध प्रकारच्या कठोर चाचण्या घेण्यात येणार आहेत. हे याआधीच इस्रोच्या उच्चपदस्थांतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. अंतराळातील प्रक्षेपणाशी संबंधित चाचणीच्या पुढच्या टप्प्यात प्रत्यक्ष अंतराळात पोहोचल्यावर संशोधक-मानवाचे यानातून बाहेर जाणे, त्यांचा अंतराळातील वावर व मुख्य म्हणजे यानामधील फेरप्रवेश इ. टप्प्यांच्या काळजीपूर्वक अभ्यास-चाचण्या करण्यात येणार आहेत. त्यादरम्यान पण अर्थातच, संशोधक आणि यान या उभयतांच्या सुरक्षेला विशेष महत्त्व दिले जाणार आहे. इस्रोच्या दृष्टीने अभियानाशी संबंधित पुढचा व महत्त्वाचा टप्पा म्हणजे, अंतराळ मोहीम आटोपून यानाचा पृथ्वीकडचा परतीचा प्रवास. यादरम्यान, परतताना चांद्रयान पृथ्वीच्या पर्यावरणीय कक्षेमध्ये प्रवेश करताना विज्ञान-तंत्रज्ञानच नव्हे, तर पर्यावरणीयसंदर्भात विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. या विविध टप्प्यांमधील असणारी जोखीम, त्याचे होऊ शकणारे संभाव्य परिणाम व या जोखमींवर घ्यावयाची काळजी, यावर इस्रोचा विशेष भर राहणार आहे. या संदर्भात अंतराळ तंत्रज्ञानाच्या जोडीलाच अद्ययावत माहिती-तंत्रज्ञानाची साथही तितकीच महत्त्वाची. मुख्य म्हणजे, संपूर्णपणे व सुरुवातीपासून मोहिमेच्या परतीच्या अखेरच्या यशस्वी क्षणापर्यंतच्या संदर्भातील जोखीम व्यवस्थापन आखून त्यासाठी आवश्यक ते सर्वप्रकारचे नियोजन करण्यात येत आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. यासाठी आपात्प्रसंगी वापरण्यासाठी आवश्यक अशा विशेष व अद्ययावत पॅराशूटची संशोधन-निर्मिती करण्यात येत आहे. इस्रोच्या नव्या व आव्हानात्मक अंतराळ गगनभरारीला संरक्षण सिद्धतेच्या दृष्टीने सर्व संबंधित सुरक्षा यंत्रणांनासुद्धा त्याचदरम्यान सिद्ध ठेवण्यात येणार आहे. यासंदर्भात मोहिमेचे महत्त्व, त्यातील जटिलता व जोखीम पाहता, अंतराळयान मोहिमेच्या कालावधीत भारतीय नौदलाला सर्व सज्ज ठेवण्यात येणार आहे, एवढे सांगितले म्हणजे विषयाचे गांभीर्य स्पष्ट होते. या संदर्भातील सराव प्रसंगांमध्येसुद्धा आपल्या नौदलाचा सहभाग असणार आहे. भारतीय अंतराळ मोहिमेचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, या संपूर्ण मोहिमेत इस्रो आणि त्यांच्या संशोधकांचा भर चुकांमधून शिकण्यावर, घोडचुका टाळण्यावरच राहणार आहे. त्याशिवाय, विज्ञान- तंत्रज्ञानापेक्षा प्रसंगी प्रत्यक्ष प्रक्षेपणात सहभागी होणाऱ्या अंतराळवीरांच्या सुरक्षिततेला धोरणात्मकदृष्ट्या सुरुवातच नव्हे, तर योजनेच्या पूर्वतयारीपासून महत्त्व दिले जाणार आहे. या मोहिमेकडे अंतराळ मोहिमेतील प्रमुख व उभ्या जगाला मार्गदर्शक ठरविण्याचा मनोदय इस्रोने यापूर्वीच जाहीर केला आहे.

अंतराळ मोहिमेशी संबंधित गुंतवणुकीकडे इस्रो दुहेरी दृष्टिकोनातून पाहात असल्याचे दिसते. यात एकीकडे शेकडो-करोडो रुपयांची मोठी आर्थिक गुंतवणूक, प्रगत व अद्ययावत तंत्रज्ञान व त्याच्याशी संबंधित आधी केलेले व प्रचलित असे संशोधन हे तर महत्त्वाचे आहेच. मात्र, त्याच जोडीला अंतराळ मोहीम प्रत्यक्षात साकारणाऱ्या व त्याला इस्रोच्या यशस्वी मोहीम-परंपरांमध्ये मूर्त रूप देणाऱ्या शास्त्रज्ञांची सुरक्षा इस्रोने सर्वोपरी मानली आहे.

इस्रोच्या नव्याने आखलेल्या अंतराळ मोहिमेशी निगडित महत्त्वाच्या बिंदूंमध्ये प्रचंड आर्थिक गुंतवणुकीद्वारे होणारे वैज्ञानिक संशोधन, विविध तयारी-चाचण्यांद्वारे होणारा अभ्यास, नव्या उपक्रमांतून नवे संशोधक-शास्त्रज्ञ घडविणे एवढेच नव्हे, तर नजीकच्या काळात जागतिक स्तरावर भारतीय अर्थव्यवस्थेला आभाळाएवढी उंची गाठण्याचे सामर्थ्य मिळणार आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## समर्पित जीवन : छत्रपती यशवंतराव होळकर

छत्रपती शिवाजी महाराजानंतर स्वत: राज्याभिषेक करून घेणारे राजे म्हणजे यशवंतराव होळकर. त्यांनी आपल्या तलवारीच्या आणि युद्ध चातुर्याच्या जोरावर अनेकांना सळो की पळो करून सोडले होते. त्यांनी मराठ्यांच्या इतिहासामध्ये संपूर्ण देशांमध्ये आपल्या अनन्यसाधारण अशा



कर्तृत्वाची, अचाट नेतृत्वाची, युद्धकौशल्याची, विश्वासघात पचवून सर्वांना सामावून घेण्याची, प्रसंगी निराश न होता त्यामधून मार्ग काढण्याची क्षमता जगाला दाखवून दिली त्याला इतिहासामध्ये तोड नाही. गनिमी कावा हे किती महत्त्वाचे साधन आहे हे छत्रपती शिवरायानंतर महाराजा यशवंतराव यांनी दाखवून दिले. त्यांनी मॉन्सूनसारख्या धूर्त व्यक्तीचा दारुण पराभव केला. नेपोलियनसारख्या सम्राटाचा ज्यांनी पराभव केला अशा वेलस्ली नावाच्या सेनापतीलाही पराभूत करून त्याला भारत देशातून जाण्यास भाग पाडले अर्थात इंग्रजांना हा पराभव फार जिव्हारी लागल्यामुळेच त्याला भारतातून परत बोलावून घेतले होते. महाराजांनी केलेली युद्धे ही फक्त मराठा साम्राज्याकरिता केलेली नसून ती संपूर्ण देशाच्या स्वातंत्र्यलढ्याकरिताच होती असे म्हटले तरी वावगे होणार नाही. त्या काळातील त्यांचे हे कार्य राष्ट्रभक्तांकरिता प्रेरणादायी असेच होते.

जगामध्ये अजिंक्य असणाऱ्या इंग्रजी फौजेला अठरा वेळा महाराजांनी पराभूत केले. त्यांना हिंदू धर्माबद्दल खूप प्रेम होते. मात्र त्यांनी दुसऱ्या धर्माचा कधीही तिरस्कार केला नाही. त्यांच्या सैन्यांमध्ये अनेक मुस्लिम व इंग्रज अधिकारी मोठ्या पदावर काम करीत होते हे विशेष होय. यशवंतराव महाराजांचा इतिहास हा आजच्या पिढीने जरूर वाचावा असाच आहे. शाहीर अमर शेख यांनी असे म्हटले आहे की, ज्यांच्या पायावरती लोटांगण । घातली इंग्रजांनी असा कोण हिंदभूषण ॥ ज्याचं शाहिरांनी नाव गाव । डोक्यावर घेऊनी नाचावं ॥

## वाचक पत्रे

इतिहासाला लेण व्हावं । लहान थोरांच्या ओठी न्हावं ॥ यशवंतराव । फक्त एकच नाव ॥ अशा या महान पराक्रमी, कर्तृत्ववान, राष्ट्राभिमानी, धर्माभिमानी, आपल्या प्रजेवर प्रेम करणारे महाराज यशवंतराव होळकर यांचा आज राज्याभिषेक दिन त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन.

**श्रीराम मोतीराम पुंडे**/८२७५०६३६९८

## साहित्य संमेलने आणि संस्कृती...

नोव्हेंबर आणि डिसेंबर हे दोन्ही महिने साहित्य संमेलनांचेच होते. विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये जिल्हा साहित्य संमेलने आयोजित करण्यात आली होती. या संमेलनांना राज्य मराठी भाषा विभाग आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे पाच लाखांचे अनुदान देण्यात आले. पूर्वी हे अनुदान केवळ दोन लाख रुपये होते. हे वाढीव अनुदान कोणत्या कारणासाठी किंवा उद्दिष्टांसाठी दिले गेले हे ठळकपणे कुठेच मांडले गेले नसावे असे संमेलनांचे स्वरूप पाहून वाटते. संमेलनांच्या पत्रिका पाहता बहुतेक संमेलनामध्ये तेच ते ठरावीक कार्यक्रम घेण्यात आल्याचे जाणवले. ही साहित्य संमेलने आयोजित करणाऱ्यांनी दिवंगत ज्येष्ठ साहित्यिकांची नावेही ऐकली नसावीत इतके ते अनुल्लेखित राहिलेत.

प्राचार्य राम शेवाळकर, कवी अनिल, कुसुमावती देशपांडे, राम गणेश गडकरी, मुकुंदराज, ग्रेस, सुरेश भट, राजा बढे, आनंद टेकाडे, श्रीधर शनवारेसारख्या थोर साहित्यिकांना योग्य स्थाने दिल्याचे जाणवले नाही. नवीन साहित्यिकांना या महाराष्ट्रात नव्हे, महाराष्ट्राबाहेरही विख्यात असलेल्या ज्येष्ठ साहित्यिकांची माहिती व आदर असणे आवश्यक आहे. अशीच विस्मित करणारी बाब म्हणजे राजकीय पक्षांसारखे, साहित्यिक पक्ष (गट) निर्माण झाल्याचे स्पष्टपणे लक्षात आले आणि राजकीय पक्षांसारखे एकमेकावर कुरघोडी करण्याचे प्रयत्नही दिसून आले. साहित्य सर्वसमावेशक असते, साहित्यिकाचे मन नि:पक्षपाती व विशाल असते, तो विश्वासाठी पसायदान मागतो हे साहित्याचे स्वरूप आजवर सर्वांनी पाहिले आहे. पण आता ही संस्कृती बदलणार असे दिसते.

देवादिकांच्या सात्त्विक प्रतिमा सोन्या-चांदीने मढवल्याने खऱ्या भक्तिभावाचा लोप आपण पाहतोच आहोत तसाच साहित्यिकाचा सोज्वळ चेहरा दिखाऊपणाच्या विलेपनाने फसवा होण्याची भीती आहे. सहभागींना दिले जाणारे भरघोस मानधन अनेक वाईट पायंडे पाडू शकते. मराठी भाषेचा विकास घडवायचा असेल तर जिल्ह्याच्या साहित्य संमेलनात त्याच जिल्ह्याच्या साहित्यिकांना संधी देण्यात यावी, त्यांचाच सहभाग असावा. साहित्य संमेलन प्रकल्प स्वरूपात घेण्यात यावे, साहित्य संस्कृती मंडळाने सगळ्या प्रकल्पांची समग्र तपासणी करून एक मोठा प्रकल्प उभा करावा, तो साकारण्यासाठी राज्य साहित्य संमेलन घ्यावे. केवळ निधी वाटपाने हे साध्य होणार नाही, एवढे तरी लक्षात घ्यावे.

**आशा पांडे**/९४२२२०७९२५

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९३७३४३८३५२ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### जमिनीवर अतिक्रमण करुन विक्री केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**




जमिनीवर अतिक्रमण करुन विक्री केल्याप्रकरणी शितल सुरेंद्र गायकवाड व सुशिल सुरेंद्र गायकवाड या दोघा जणांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दि.२८ ऑक्टोबर २०२३ पासून कल्पक सहकारी सोसायटी परिसरात हा प्रकार सुरु होता. याबाबत शाम अंबादास हंचाटे (रा.जीवनज्योती गृहनिर्माण सोसायटी, आयकर नगर, रंगभवन मागे, सोलापूर) यांनी ३ जानेवारी २०२६ रोजी फिर्याद दाखल केली. शितल सुरेंद्र गायकवाड व सुशिल सुरेंद्र गायकवाड यांनी फिर्यादीच्या मालकीच्या जागेत बेकायदेशीर प्रवेश करुन शिवीगाळ व दमदाटी केली. बनावट व खोटी माहिती देत हद्द कायम मोजणी करून चारही बाजूंनी जमीन स्वतःची असल्याचे भासवण्यात आले. फिर्यादीचा प्लॉट क्रमांक ११ ब तसेच इतर नागरिकांचे एकूण आठ प्लॉट व ६४५ चौमी खुली जागेवरील तारेचे कंपाऊंड काढून टाकून अतिक्रमण करण्यात आले. त्यानंतर आरोपींनी त्या जागेवर स्वतःचे मालकी हक्क असल्याचे दर्शविणारे बोर्ड व कंपाऊंड उभारुन सदर जागा ग्राहकांना विक्री करुन फसवणूक केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.



### लोकशाहीर बिरुदेव एडके यांना 'हालमत संप्रदाय संस्कृती संवर्धन पुरस्कार' प्रदान

**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

धनगर समाजाची गौरवशाली परंपरा, लोककला आणि संस्कृतीचा वारसा आपल्या पहाडी आवाजातून आणि ढोलाच्या गजरात जनमनसांत रुजवणारे लोकशाहीर बिरुदेव एडके यांना यंदाचा प्रतिष्ठित 'हालमत संप्रदाय संस्कृती संवर्धन पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. सांगली येथील 'हालमत संस्कृती संवर्धन संस्था' यांच्या वतीने हा सोहळा हातकणंगले तालुक्यातील कुंभोज येथे मोठ्या उत्साहात पार पडला. कुंभोज येथे आयोजित या कार्यक्रमाला लोकशाहीर बिरुदेव एडके यांना त्यांच्या पत्नी शामल एडके यांच्यासह मंचावर गौरविण्यात आले. हा पुरस्कार डॉ. सुषमा पुजारी, सोनाली उद्योग सुमहाचे संदीप कारंडे, सिध्दाप्पा गावडे, वारणा दुध संघाचे संचालक अरुण पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. रोख रक्कम, सन्मानचिन्ह, कोल्हापुरी फेटा, घोंगडी आणि श्रीफळ यांचा समावेश होता.



### पद्मश्री सुमतीबाई टेक्निकल हायस्कूल पारितोषिक वितरण

**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

येथील श्राविका संस्थेचे विश्वस्त स्वर्गीय सेठ रतनचंदजी शहा यांच्या जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी विविध आंतरशालेय स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना शालिनी नाईक यांच्या हस्ते बक्षिस वितरित करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, पर्यवेक्षक जयेश शिरढोणे, प्री -प्रायमरी समन्वयक अर्चना अक्कलकोटे, पर्यवेक्षक कल्पना रामावत यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये, पाचवी ते दहावी हस्ताक्षर स्पर्धा, पाचवी ते सातवी चित्रकला स्पर्धा इयत्ता आठवी ते दहावी साठी जनजागृती पर संदेश असलेले भीत्तीचित्र पोस्टर बनविणे, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव यतीन शहा, मुख्य कार्यकारी अधिकारी देवई करणं शहा यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सद्दाम पटेल यांनी केले. विजेत्यांना मीनाक्षी सग्गम व अर्चना अक्कलकोटे यांनी आमंत्रित केले. सुनिता आळंगे टीचर यांनी आभार केले.



### ध्यानामुळे एकाग्रता, स्मरणशक्ती वाढते

**पिरॅमिड मास्टर नेहा मिरजगावकर यांचे प्रतिपादन**

**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

आजच्या स्पर्धात्मक व तणावपूर्ण वातावरणात विद्यार्थी वर्गावर अभ्यासाचा ताण, मोबाईल व सोशल मीडियाचा वाढता वापर, एकाग्रतेचा अभाव तसेच मानसिक अस्वस्थता यांचा परिणाम दिसून येतो. अशा परिस्थितीत ध्यान व श्वसनाधारित साधना विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. ध्यानामुळे एकाग्रता, स्मरणशक्ती व अभ्यासातील लक्ष वाढते, असे प्रतिपादन पिरॅमिड मास्टर नेहा मिरजगावकर यांनी केले.ंभाजीराव शिंदे प्रशाला व सोलापूर पिरॅमिड स्पिरिच्युअल ट्रस्टच्यावतीने माजी महापौर स्व. महेश विष्णुपंत कोठे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त विडी घरकुल येथील संभाजीराव शिंदे प्रशालेत चार दिवस ध्यान शिबिर आयोजित केले होते. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी कविता मिरजगावकर, प्रीती सदारंगानी, आनंद गांगजी, रोहित वंगारी, श्रीनिवास पुला, मुख्याध्यापक सतीश मल्लाव आदीजण उपस्थित होते.

# मध्य रेल्वेला 'मालवाहतूक'द्वारे मिळाला ३४.७१ कोटींचा महसूल



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २०२५ या वर्षात सोलापूर जिल्ह्यातील आयओसीएल पाकणी साइडिंगमध्ये पेट्रोलियम उत्पादनांच्या वाहतुकीत सातत्यपूर्ण आणि भरीव वाढ नोंदवून मालवाहतूक क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. डिसेंबर २०२५ पर्यंत २४३ रॅक यशस्वीरित्या भरण्यात आले. यामध्ये सोलापूर विभागासाठी ३४.७१ कोटींचा मालवाहतूक महसूल प्राप्त झाला.

आयओसीएल पाकणी साइडिंगमध्ये पेट्रोलियम, तेल आणि वंगण (पीओएल) उत्पादनांच्या वाहतुकीची पहिलीवहिली कार्यवाही २८ जानेवारी २०२५ रोजी हाती घेण्यात आली, जी भारतीय रेल्वे आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (आयओसीएल) साठी एक ऐतिहासिक घटना ठरली. कामकाजाच्या सुरुवातीपासून, या वर्षातील कामगिरी अत्यंत उत्तम राहिली आहे.

आयओसीएल पाकणी साइडिंग हे एक सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे लॉजिस्टिक्स केंद्र म्हणून उदयास आले आहे. ही महाराष्ट्रातील पहिली आयओसीएल रॅक-लोडिंग सुविधा, भारतातील आयओसीएलचे नववे विशेष विपणन रॅक-लोडिंग ठिकाण आणि देशभरातील रिफायनरीसह एकूण १८वे ठिकाण बनले आहे. मूळतः १९९६ मध्ये अधिसूचित केलेल्या आयओसीएल पाकणी साइडिंगमधून पूर्वी मर्यादित प्रमाणात पेट्रोलियम उत्पादनांची आवक-जावक होत असे. २०२५ मध्ये बाह्य मालवाहतूक कार्यान्वित झाल्यामुळे, ही साइडिंग आता मोठ्या प्रमाणावर पेट्रोलियम पदार्थांची वाहतूक हाताळत आहे, ज्यामुळे ती या प्रदेशासाठी एक प्रमुख मालवाहतूक केंद्र बनली आहे. या महत्त्वाच्या मालवाहतूक उपक्रमाला कोयाली (वडोदरा) ते पाकणी (सोलापूर) पर्यंतच्या ७४७ किलोमीटर लांबीच्या समर्पित पाइपलाइनद्वारे पाठिंबा मिळत आहे. पेट्रोलियम उत्पादने कोयाली रिफायनरीतून पाकणी डेपोपर्यंत पाइपलाइनद्वारे अखंडपणे पोहोचवली जातात आणि त्यानंतर रेल्वे रेकद्वारे जवळच्या डेपो आणि उपभोग केंद्रांपर्यंत वितरित केली जातात, ज्यामुळे सुरक्षितता, कार्यक्षमता आणि विश्वासार्हता सुनिश्चित होते.

आयओसीएल पाकणी साइडिंगवर पेट्रोलियम उत्पादनांच्या लोडिंगमधील प्रभावी कामगिरी ही भारतीय रेल्वे आणि आयओसीएल यांच्यातील प्रभावी समन्वयाचा पुरावा आहे. मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग मालवाहतूक क्षमता वाढवण्यासाठी, महसूल वाढवण्यासाठी आणि महाराष्ट्र, शेजारील राज्ये व संपूर्ण देशाच्या आर्थिक विकासात योगदान देण्यासाठी कटिबद्ध आहे.

#### ही आहेत वाहतूक केलेली उत्पादने

पाकणी साइडिंगमधून विविध प्रकारच्या पेट्रोलियम उत्पादनांची वाहतूक केली जाते, जसे की

- **हाय स्पीड डिझेल (एचएसडी)**
- **मोटर स्पिरिट (एमएस)**
- **सुपीरियर केरोसीन ऑइल (एसकेओ)**
- **इथेनॉल**
- **बायोडीझेल**

उत्पादनांचे हे वैविध्यपूर्ण मिश्रण कार्यक्षम, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक रेल्वे मार्गाद्वारे पारंपारिक आणि पर्यायी इंधनाच्या वाहतुकीला मदत करते.

#### पाकणी येथून सेवा दिली जाणारी प्रमुख गंतव्यस्थाने

- **मिरज, महाराष्ट्र**
- **हिरेनंदुरू, कलबुरगि जिल्हा, कर्नाटक**
- **हुबळी, कर्नाटक**
- **सिकंदराबाद, तेलंगणा**

हे अनेक राज्यांमध्ये व्यापक प्रादेशिक कनेक्टिव्हिटी दर्शवते.

## सुमतीबाई स्कूलची सान्वी वाळवेकर प्रथम

**श्री भाऊसाहेब गांधी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान, सोलापूर व श्री ऐलूक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा संचलित वालचंद शिक्षण समूह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्री भाऊसाहेब गांधी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत पी. एस. इंग्लिश मिडीयम स्कूलच्या सान्वी वाळवेकर हिने प्रभावी वक्तृत्वाच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकाविला.

वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स येथील वालचंद सभागृहात पार पडलेली ही प्रतिष्ठेची स्पर्धा यंदा २०व्या वर्षात पदार्पण करत असून, श्री भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर या उपक्रमाला विशेष तेज लाभले. राज्यभरातून २९०हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. अध्यक्षस्थानी वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त आणि श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठानचे विश्वस्त पराग शहा होते. यावेळी प्रतिष्ठानचे सचिव प्रदीप पंडित, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. अश्विन बोन्दार्डे आणि वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, परीक्षक म्हणून संगमेश्वर महाविद्यालयाचे प्रा. संतोष पवार, दयानंद महाविद्यालयाचे प्रा. डॉ.राजशेखर शिंदे, प्रा. डॉ. अंजना गायकवाड उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अजित देवसाळे यांनी केले. प्रा. चेतन तुपकर यांनी आभार मानले.

#### पारितोषिकेप्राप्त अंतिम तीन व उत्तेजणार्थ विद्यार्थी

सान्वी वाळवेकर ( ७ हजार रुपये, पी. एस. इंग्लिश मिडीयम स्कूल,सोलापूर), अभय आळशी (४ हजार रुपये, डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई), समर्थ बंडगर (३ हजार रुपये, डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे) उत्तेजनार्थ- राधा शिंदे, अनुष्का घोडके व सायली गायकवाड (प्रत्येकी एक हजार)

### निलंबन रद्द करावे अन्यथा आत्मदहन करु

**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

मैंदर्गी नगरपरिषद येथे जन्म-मृत्यू विभागात कार्यरत असताना जिवंत व्यक्तीचा मृत्यू दाखला दिल्याप्रकरणी निलंबित करण्यात आले. यासंदर्भात खुलासा दिल्यानंतर निलंबन रद्द करण्याची टिपणी सादर केली. यासंदर्भात तत्काळ कार्यवाही करून निलंबनाची कारवाई मागे घ्यावी अन्यथा गुरुवार, दि. ८ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजता मैंदर्गी नगरपरिषद कार्यालय समोर आत्मदान करणार, असा इशारा श्रीधर मनीकडे यांनी पत्रपरिषदेत दिला. याप्रकरणी आपल्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. मात्र, चौकशीअंती मैंदर्गीचे मुख्याधिकारी यांच्याकडे गोपनीय अहवाल सादर झाला. त्यानुसार निलंबन रद्द करण्याबाबत कार्यालयीन टिपणी सादर केली. ती मंजूरही झाली. यानुसार दंड आणि इतर फी मिळून रक्कम नगरपरिषद कोषागारात भरणा करण्यात आली. मात्र अद्यापही निलंबनाची कारवाई मागे घेण्यात आली नाही, असेही त्यांनी सांगितले.

## PUBLIC NOTICE

That I Sadik Rajjak Shaikh, Age-34 Years, residing at 422, Zopadpatti, Gadegaon Road, Barshi, Tal Barshi, Dist -Solapur do hereby state that my name is recorded differently in various documents as:

1. Sadik Rajak Shaikh on Adhar Card no. 8243 0521 4583
2. Sadik Rajjak Shaikh on School Leaving Certificate

I hereby declare that both the above names refer to one and the same person, i.e. myself, and there is no intention to mislead or suppress any fact.

This declaration is made for the purpose of Passport office/Passport Seva kendra and for all other official and legal records.

If anyone has any objection to the above declaration, the same may be raised within 7 days from the date of publication. After that, no objection shall be entertained.

Place:- Barshi
Date 05/01/2026

Sign/-
**Sadik Rajjak Shaikh,**
422, Zopadpatti,
Gadegaon Road,
Barshi Tal. Barshi
Dist Solapur

## खरेदीपुर्व जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः जि. सोलापूर येथील लोकांस या जाहीर नोटीसी कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन:** जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ मधील मौजे बुधवार पेठ टी. पी. नं. ४ सि. स. नं. ८९०७/५अ/५/४ यांसी क्षेत्र १०१.३० चौ. मी. यामध्ये मिळकत यांसी चतुःसिमा पुर्वेसः मगरुम खाने यांची मिळकत, पश्चिमेसःधस कुशन यांचे दुकान, दक्षिणेसः रस्ता, उत्तरेसः गिराम यांची मिळकत. येणेप्रमाणे खुलीजागा असुन त्यातील दगड, माती, इत्यादी तदंगभुतवस्तुसह, वहिवाटीच्या हक्कासहची ही मिळकत श्रीमती, कमलाबाई भागीरथ काबरा यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची असुन, त्यांनी वरील नमुद मिळकत आमचे अशिलांना कायम खुषखरेदीने विक्री करण्याचे मान्य व कबुल करुन इसारा रक्कम स्विकारुन इसारा पावती करुन दिलेले आहे. वर नमुद मिळकत निर्वेध व निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री व निर्वाळा आमचे अशिलांना दिलेली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीबाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा खरेदी, गहाण, कुलमूखत्यारपत्र, दान, बक्षिस, लिज, साठेखत, पोटगी, दिवाणी दावा, वारसा हक्क, कब्जा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्यांवर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी, मुदतीमध्ये हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची गृहित धरुन, आमचे अशिल पुढीलव्यवहार करतील, तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत व तक्रार बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

हि जाहिर नोटीस दिली ता.०५/०१/२०२६.

सही/-
**ॲड. पांडुरंग लक्ष्मीकांत देशमुख**
**ॲड. पृथ्वीराज बाळासाहेब उन्हाळे**
**ॲड. प्रतिभा महेश चौरे (विचितकर)**
ॲडव्होकेटस्
ऑ. १०० अ, मुरारजी पेठ, रोटे चेंबरर्स,
एस-१, लकी चौक, सोलापूर -४१३००१
मो. नं. ९४२२०६७४६९
अशिलातर्फे ॲडव्होकेट

## तहसिल कार्यालय बार्शी
**(कुळ कायदा शाखा)**

दुरध्वनी क्र. (०२१८४) २२२२१३ email-tahbarshi@gmail.com

क्र. कुळकायदा/क १४, १५/एसआर-१८/२५ दिनांक ०२/०१/२०२६

**जाहीर समन्स/वृत्तपत्राव्दारे**

प्रति,
१. राहुल हरीचंद्र गजभरे
२. वैभव गोपीचंद गजभरे -- अर्जदार
३. बालाजी अजय गजभरे
रा. रातंजन ता. बार्शी
**विरूध्द**
१. सज्जनराव जिवनराव देशमुख -- सामनेवाले
रा. रातंजन ता. बार्शी

**मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम १४ व १५ अन्वये चौकशी**
**-: दावा जमीनीचे वर्णन :-**

| गावाचे नांव | गटनंबर | क्षेत्र हे.आर. | पो.ख. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| रातंजन | १७२/१ | १.८२ | ०.०० | ३.१३ |
| | १७२/२ | ०.९१ | ०.०० | १.५६ |
| | १७२/३ | ०.९२ | ०.०० | १.५६ |

दावा जमीनीबाबत अर्जदार/वादी यांनी दावा मिळकतीच्या इतर हक्कातील सज्जनराव जिवनराव देशमुख कुळ हा शेरा कमी करुन मिळणेबाबत दि. २७/१२/२०२४ रोजी या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे.

दावा जमिनीबाबत मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम १४ व १५ अन्वये दि. ०१/०१/२०२६ रोजी चौकशीची तारीख ठेवण्यात आलेली होती. तथापि प्रतिवादी हे गैरहजर राहिलेले असून ग्राम महसूल अधिकारी धामणगांव दु. ता. बार्शी यांनी प्रतिवादी गावी राहत नसलेबाबत अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे जाहिर समन्सव्दारे कळविण्यात येते की, वरील नमूद प्रतिवादी अथवा त्यांचे वारस हे जिथे कोठे असतील तेथून सदर केसच्या संदर्भाने तुम्ही जातीने अगर तुमच्या अधिकृत अभिकर्त्यामार्फत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह दि.०५/०२/२०२६ रोजी तहसिल कार्यालय बार्शी हजर रहावे. जर तुमचे म्हणणे प्राप्त झाले नाही तर आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी घेतली जाईल व उपलब्ध कागदपत्राआधारे योग्य तो निर्णय देणेत येईल याची नोंद घ्यावी.

सही/-
**(एफ. आर.शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे खांडवी व ता. बार्शी व शहर बाशी तसेच आसपासचे लोकांना आमचे पक्षकार यांचे तर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व सांगितलेवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बाशी पैकी मौजे खांडवी हद्दीतील जमीन याचा गट नं. १३९/३ याचे क्षेत्र हे. ००.९६ आर. आकार रु. ०१.५३ पैसे अशी जमीन यासी चतुः सिमा पुर्वेस गट नं. १३९/२ गिरीश राजेश काटे यांची जमीन, दक्षिणेस बार्शी कुडूवाडी रस्ता, पश्चिमेस - गट नं. १३९/४ स्नेहा अभिजीत मुनोत यांची जमीन व. उत्तरेस गट नं. १३८ पुनमिया यांची जमीन आहे. येणेप्रमाणे चतुः सिमा पुर्वक जमीन आतील झाड. झुडूप वगैरे सर्व तदंगभूत वस्तूसह, जाणे येणेच्या वहिवाटीच्या हक्कासह.

वर नमूद मिळकत ही राजन दिगंबर देशमुख, रा. बार्शी यांच्या मालकीची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीतील आहे. सदर मिळकतीचे मालकांनी त्यांच्या कायदेशीर गरजेपोटी ही जमिन विक्रीस काढली आहे. व ठरल्याप्रमाणे आमच्या पक्षकारांनी त्यांना इसार दिलेला असून तसा ठराव झालेला आहे. त्या अन्वये आमचे पक्षकार सदर जमिन खरेदी घेणार आहेत. सदर मिळकत ही मिळकत मालकांनी निर्वेध व निजोखमी असल्याचा निर्वाळा आमचे पक्षकारास दिलेला आहे.

तरी या नोटीसीने कळविण्यात येते की, वरील जमिनीबाबत मालकी, कब्जे वहिवाट, बोजा, तारण, पोटगी, लिन, लिज, टाच, भाडेपट्टा, भोगवटा हक्क वगैरे, तत्सम किंवा कोणत्याही स्वरुपाची कसलाही हक्क, अधिकार असल्यास अथवा सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसात त्यांचे हक्क, अधिकार यांच्या बद्दल संपूर्ण कागदपत्रे पुरावेनिशी खालील नमूद पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाची, कसलीही लेखी हरकत न आल्यास, सदर मिळकत ही निर्वेध, निजोखीम, बिनबोजाची आहे, त्याबद्दल कोणाचेही, कसलेही हक्क, अधिकार नाहीत, व्यवहारास हरकत नाही, असे समजून रजि. खरेदीचा व्यवहार आमचे पक्षकार पूर्ण करतील, मग कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार चालणार नाही, विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी, कोणाची फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. कळावे, ता. ०५/०१/२०२६

सही/-
**ॲड. श्री. संभाजी शिवाजी गलांडे**
**३८४७, भवानी पेठ, बाशी**
**मो. नं. ९६०४१७११०१**
**पक्षकारतर्फे ॲडव्होकेट**

## मे. सहाय्यक निंबधक, सहकारी संस्था, बार्शी यांचे समोर
**तुळजापूर रोड मार्केट यार्ड बार्शी ४१३४०१**

जा क्र./उप/ १८०६/२०२६ दि.०१.०१.२०२६

**लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापुर** -- अर्जदार
**विरूध्द**
**(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद)** -- जाब देणार

| अ. क्र. | दावा क्र. | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ८०७/२०२५ | ६,७६,१७८/- | १ | श्री. घोलप श्रीराम साहेबराव व श्री घोलप साहेबराव सोपान रा. मु. पो. आष्टा ता भुम जि. धाराशिव |
| २ | ८०९/२०२५ | ५,०५,०७०/- | ३ | श्री. वनवे रामहरी भारकर रा.मु.पो. रामेश्वर ता.भुम जि. धाराशिव |
| ३ | ८१०/२०२५ | १,१९,४१४/- | २ | श्री. कवडे सुरज शिवाजी रा.मु. पो. वाडकर प्लॉट वाडकर पिठ गिरणीजवळ सुभाष नगर ता बार्शी जि. सोलापूर |
| ४ | ८१२/२०२५ | २,२४,४०५/- | १<br>२<br>३ | श्री. सपाटे गणेश अनिल रा.मु. पो. नेटके प्लॉट अलिपुर रोड बार्शी ता बार्शी जि. सोलापूर<br>श्री. सुपेकर अमर विश्वनाथ मु.पो. मेन रोड नागोबा गल्ली भुम ता. भुम जि. धाराशिव<br>श्री. आतकरे दिपक सुर्यकांत मु. पो. गजानन मंदिर चोरमुले प्लॉट बार्शी ता बार्शी जि. सोलापूर |
| ५ | ८१४/२०२५ | ५८,६०५/- | ३ | श्री. शेख बिलाल बशीर रा. मु. म्हेत्रे चाळ बार्शी ता बार्शी जि. सोलापूर |
| ६ | ८१५/२०२५ | ३८,२२३/- | २<br>३ | श्री. मोरे सुनिल श्रीरंग रा.मु.पो. रेल्वे पोटर चाळ कुर्डुवाडी ता. माढा जि. सोलापूर<br>श्री. शेख शहानवाज सलीम रा. मु. गाडेगांव रोड बार्शी ता बार्शी जि. सोलापूर |
| ७ | ८१६/२०२५ | ५३,६९४/- | २<br>३ | श्री. शेख मुसा वक्शु रा. मु. पो. पांगरी ता बार्शी जि. सोलापूर<br>श्री. शेख आयेशा रज्जाक रा. मु. कसबा पेठ बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर |
| ८ | ८१७/२०२५ | ६१,८६१/- | ३ | श्री. कुलकर्णी गणेश हरी रा. मु. कसबा पेठ पवार गल्ली बार्शी ता बार्शी जि. सोलापूर |
| ९ | ८१८/२०२५ | ४३,४४३/- | १<br>२<br>३ | श्री. थोरेबोले सागर राजेंद्र रा. मु.पो. उंबरगे ता. बार्शी जि. सोलापूर<br>श्री. सांळुके बालाजी देविदास मु. पो. खडकोनी रोड जुने गांव उंबरगे ता बार्शी जि. सोलापूर<br>श्री. जाधव श्रीकांत अभिमन्यु रा.मु.पो. उंबरगे ता बार्शी जि. सोलापूर |
| १० | ८१९/२०२५ | | २ | श्री. अंधारे जनार्धन मच्छिंद्र रा.मु.पो. जि. प. प्रा. शाळा लोणारवाडी ता. परंडा जि. धाराशिव |
| ११ | ८२४/२०२५ | | १<br>२<br>३ | श्री. सुतार लहुराज दगडु मु. पो. रूईभर ता. धाराशिव जि. धाराशिव<br>श्री. कुरेशी यासीन शानुर मु. पो. राजा कॉलनी धाराशिव ता. धाराशिव जि. धाराशिव<br>श्री. कुरेशी समीर यासीन रा.मु. पो. रोमा पॅलेस धाराशिव ता. धाराशिव जि. धाराशिव<br>श्री. सुतार हेमा भगवान |
| १२ | ८२६/२०२५ | | ३ | रा.मु. पो. पंचशील नगर वैराग ता. बार्शी जि. सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे/पत्तावर आढळुन येत नसल्याने/अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणे येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः जातीने अथवा वकिलामार्फत **दिनांकः-१६/०१/२०२६ रोजी दुपारी १२.३० वा.** कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि. ०१/०१/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुदेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

स्थळ - सोलापुर
दि. - ०६/०१/२०२६

सही/-
**(श्री. सय्यद. ए.टी)**
**सहाय्यक निंबधक**
**सहकारी संस्था, बार्शी. जि. सोलापूर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### बांगलादेशी गोल्फरच्या सहभागावर निर्णय नाही



**नवी दिल्ली :** बांगलादेशी गोल्फपटूंना प्रोफेशनल गोल्फ टूर ऑफ इंडिया (पीजीटीआय) मध्ये खेळण्याची परवानगी दिली जाईल की नाही, यावर अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, असे क्रिकेटचे दिग्गज व सध्याचे पीजीटीआयचे अध्यक्ष कपिल देव यांनी सोमवारी सांगितले. आयपीएल फ्रॅन्चायझी केकेआरने बीसीसीआयच्या सूचनेनुसार वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला करारमुक्त केल्यानंतर, बांगलादेश क्रिकेट मंडळाने (बीसीबी) सुरक्षा चिंता व सरकारच्या सल्ल्याचा हवाला देत पुढील महिन्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी आपला राष्ट्रीय संघ भारतात न पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही बसून या अलीकडील मुद्द्यावर चर्चा करू. आम्ही यावर अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही.

# बांगलादेशची आयपीएलच्या प्रसारणावर बंदी

### आणखी एक प्रतिशोधात्मक कारवाई

**◆ ढाका, ५ जानेवारी**

बीसीसीआयच्या निर्देशानुसार वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला जगातील सर्वात मोठ्या टी-२० लीगधून वगळल्याच्या पृष्ठभूमीवर बांगलादेशने सोमवारी आयपीएलच्या आगामी हंगामाच्या प्रसारणावर बंदी घातली.

बीसीसीआयने आयपीएल फ्रॅन्चायझी कोलकाता नाईट रायडर्सला रहमानला २०२६ च्या संघातून वगळण्याचे निर्देश देताना कोणतेही 'तार्किक कारण' दिले नाही, असे बांगलादेशच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. आयपीएल २६ मार्चपासून सुरू होणार आहे.

आयपीएलच्या प्रसारणावर बंदी घालण्याचा हा निर्णय बांगलादेशने पुढील महिन्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी भारतात जाण्यास नकार दिल्यानंतर आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट



परिषदेला (आयसीसी) आपले सर्व लीग सामने स्पर्धेचा सह-यजमान असलेल्या श्रीलंकेत स्थलांतरित करण्याची विनंती केल्यानंतर एक दिवसाने घेण्यात आला आहे.

बीसीसीआयच्या या निर्णयामागे (रहमानला वगळण्यामागे) कोणतेही तार्किक कारण ज्ञात नाही, आणि अशा निर्णयामुळे बांगलादेशच्या लोकांना दुःख, वेदना आणि संताप झाला आहे, असे सरकारी अधिसूचनेत म्हटले आहे. या परिस्थितीत, पुढील आदेशापर्यंत, इंडियन प्रीमियर लीगचे (आयपीएल) सर्व सामने आणि कार्यक्रमांचे प्रसारण/दूरदर्शन थांबवण्याची विनंती आदेशान्वये करण्यात येत आहे.

हा आदेश योग्य प्राधिकरणाच्या मंजुरीने आणि जनहितार्थ जारी करण्यात आला आहे, असे सहायक सचिव फिरोज खान यांनी स्वाक्षरी केलेल्या पत्रात म्हटले आहे. बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी रहमानला वगळण्याचा आदेश जाहीर करताना, विशिष्ट तपशील न देता, हे 'सर्वत्र घडत असलेल्या घडामोडींमुळे' केले जात आहे, असेच केवळ म्हटले होते. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांना पदावरून हटवल्यानंतर भारत-बांगलादेश संबंधात तणाव निर्माण झाला आहे. हसीना गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये सरकारविरोधी आंदोलनानंतर भारतात पळून गेल्या होत्या. आंदोलनादरम्यान झालेल्या प्राणघातक कारवाईत अनेक विद्यार्थी मारले गेले होते, त्या घटनेतील कथित भूमिकेसाठी एका न्यायाधिकरणाने त्यांना अनुपस्थितीत फाशीची शिक्षा सुनावली आहे. हसीना यांना पदावरून हटवल्यापासून हिंदूंना हिंसक हल्ल्यांचे लक्ष्य केले जात आहे. ◀(वृत्तसंस्था)



## बीच कबड्डीत महाराष्ट्राच्या दोन्ही संघाची विजयी सलामी

**दीव, दि. ५ जानेवारी-**

दुसऱ्या पर्वातील खेलो इंडिया बीच स्पर्धेचा उद्घाटनाचा दिवस महाराष्ट्राच्या कबड्डी संघाच्या धडाकेबाज कामगिरीने गाजला. महिलांनी सलामीच्या लढतीत यजमान दीव-दमण संघाचा ५३ गुणांनी धुा उडविला. पाठोपाठ पुरूष संघानेही बलाढ्य दिल्लीला ४७ -२० गुणांनी पराभूत करीत विजयी सलामी दिली.

दीवमधील निसर्गसंपन्न घोघला समुद्र किनाऱ्यावर खेलो इंडिया बीच स्पर्धेचे सोमवारी शानदार उद्घाटन झाले. या स्पर्धेत महाराष्ट्राचे ७७ जणांचे पथक सहभागी झाले आहे. यात ३१ पुरूष व २८ महिला खेळाडूंचा समावेश होता. स्पर्धेत बीच सॉकर, बीच कबड्डी, बीच पेंचक सिलट, सागरी जलतरण, बीच सपक टकरा प्रकारात महाराष्ट्र झुंजणार आहे. स्पर्धेत भारतातील ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी भाग घेतला आहे.

बीच कबड्डीत स्पर्धेतीत सलामीच्या लढतीत महाराष्ट्राच्या महिला संघाने यजमान दीव-दमण संघावर ७१-१८ गुणांनी दणदणीत विजय संपादन केला. सुरूवातीपासून महाराष्ट्राच्या महिलांनी आक्रमक खेळ करीत आपले वर्चस्व गाजवले. पूर्वार्धातील ३६-५ गुणांनी आघाडी कायम राखत होती. समृद्धी मोहिते व हर्षा शेट्टी यांनी उत्कृष्ट चढाया करीत तर पौर्णिमा जेधे, समरीन बुरोंडकर यांनी पकड घेत स्पर्धेत सर्वात मोठ्या विजयाची पल्ला सर केला.

पुरूषांच्या कबड्डीतही जय महाराष्ट्राचा नारा घुमला. महाराष्ट्राने दिल्लीवर ४७-२० गुणांनी दणदणीत विजयाची नोंद केली. पूर्वार्धात २३-१४ गुणांनी मोठी आघाडी महाराष्ट्राने घेतली होती. उत्तरार्धातही साहिल राणेने आक्रमक आणि दादासो पुजारचीच्या पकडीमुळे महाराष्ट्राने २७ गुणांनी पहिल्याच लढतीत विजयाचा झेंडा फडकविला आहे.

## कबीर कीर्तीकरच्या शानदार शतकांमुळे एनजी अकादमीची गुलबर्गावर मात

**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**



मास्टर्स क्रिकेट अकादमीच्या १२ वर्षाखालील लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत कबीर कीर्तीकरच्या शानदार शतकाच्या जोरावर निलेशगायकवाडक्रिकेट अकॅडमीने क्रिकेट किंग्डम गुलबर्गा संघावर २२९ धावांनी दणदणीत विजय मिळविला. कबीर सामन्याचा मानकरी ठरला. डोणगाव येथील पुष्प अकादमीच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ४० षटकांत सर्वबाद २८१ धावा केल्या. त्यात कबीर कीर्तीकरने (१०४) शानदार शतक झळकाविले. पूर्णचंद्रने ३५ धावा करीत त्याला साथ दिली. क्रिकेट किंग्डम गुलबर्गा अकॅडमीकडून अर्जुनने ३१ धावांत २ बळी घेतले. २८१ धावांचे विजयी लक्ष्य क्रिकेट किंग्डम गुलबर्गा अकॅडमीस पेलवले नाही. त्यांचा डाव २०.०५ षटकात ५२ धावांत आटोपला. नलेश गायकवाड अकादमीकडून भय्यासाहेब बनसोडेने १३ धावांत ३ गडी बाद केले.

**आजचा उपांत्य सामना :** मास्टर्स क्रिकेट अकॅडमी विरुद्ध रोहन क्रिकेट अकॅडमी.

# वि. मो. मेहता प्रशालेचे वर्चस्व

### शालेय शहर शस्त्रांग मार्शल आर्ट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

शालेय शहर शस्त्रांग मार्शल आर्ट स्पर्धेत १९ वर्षांखालील गटात जुळे सोलापूर येथील कै. विलासचंद्र मोतीचंद मेहता माध्यमिक शाळेच्या १६ विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावून वर्चस्व मिळविले.

महानगरपालिका व जिल्हा क्रीडा परिषद, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ही स्पर्धा श्री. सुशिलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, नेहरूनगर, सोलापूर येथे झाली. या स्पर्धेचे उद्घाटन उद्योगपती यशवंत इंगळे व ग्रँडमास्टर युवराज गायकवाड यांच्या हस्ते झाले. यावेळी मास्टर भास्कर देडे, अभिजीत गायकवाड, शस्त्रांग मार्शल आर्ट सोलापूर शहर अध्यक्ष संदीप गायकवाड, सचिव सम्राट गायकवाड, अनुराग देडे, नागेश कांबळे, विश्वजीत गायकवाड, सुमित पाटील, मोनिका गायकवाड तसेच पंच शर्वरी गुरव, साक्षी बेनूरे, श्रुती राठोड आणि विविध शाळांचे क्रीडा शिक्षक उपस्थित होते. या स्पर्धेत संगमेश्वर कॉलेज, मेहता प्रशाला व सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.



**कामगिरी केलेले मेहता प्रशालेचे खेळाडू**

**मुली :** आर्या शिंदे, वैष्णवी चव्हाण, शाल्मली जोशी, साक्षी बिदनुरे, श्रेया राठोड, श्रुती राठोड, संस्कृती जाधव, शर्वरी गुरव.

**मुले :** सुजय हजारे, संभाजी ननवरे, श्रीराज घोलप, श्रेयश बहिरगोंडे, उज्ज्वल पैठणकर, तेजस डिकोळे,पालापुरे पंचप्पा, तोडकरी बसवेश्वर

# सोलापुरात शुक्रवारपासून वरिष्ठ गट राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा

**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

वरिष्ठ गट महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा ९ ते ११ जानेवारी दरम्यान आयोजित केल्याची माहिती सोलापूर डिस्ट्रिक्ट टेबल टेनिस असोसिएशनचे खजिनदार डॉ. नीलकंठ पोतदार यांनी पत्रकार परिषदेत दिली. ही स्पर्धा महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशन, महाराष्ट्र प्रौढ टेबल टेनिस असोसिएशन व सोलापूर जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली असून, जवळपास दहा वर्षांनंतर सोलापुरात राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धा होत आहे. या स्पर्धा आत्मन क्रीडा संकुल, सुयश गुरुकुल, विजापूर रोड येथे संपन्न होणार आहे. या स्पर्धेत राज्यातील वरिष्ठ गटातील पुरुष व महिला प्रत्येकी ९ वयोगटांमध्ये वैयक्तिक एकेरी सामने होणार असून, प्रत्येक गटात विजेता, उपविजेता व उपांत्य फेरीत पोहोचलेल्या खेळाडूंना ११ जानेवारी रोजी पारितोषिके दिली जाणार आहेत.




ही स्पर्धा प्रिसिजन कॅम्प शाफ्ट, बालाजी अमाईन्स व एनटीपीसी यांच्या सहकार्याने पुरस्कृत करण्यात आली आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, खेळाडू व स्वयंसेवक मेहनत घेत आहेत. स्पर्धेचे लाईव्ह टेलिकास्ट व वृत्तांकन युट्यूबद्वारे करण्यात येणार असून, खेळाडूंकरिता आकर्षक ट्रॉफीज, मेडल्स व रोख बक्षिसांची तरतूद करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मानांकन असलेले नामांकित ४१६ खेळाडू सहभागी होणार आहेत. तर २५ जण पंच म्हणून काम पाहणार आहेत. या स्पर्धेमधूनच राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य संघाची निवड केली जाणार असल्याचे डॉ. पोतदार यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस डॉ. राजीव प्रधान, झेड. एम. पुणेकर, गोरख गडसिंग, गोवर्धन अवाशंक आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्राच्या मुलींचे सुवर्ण कायम, मुलांना रौप्यवर समाधान





### ४४ वी कुमार-मुली राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

### महाराष्ट्राच्या मुलींचे सलग ११वे व एकूण २७ वे विजेतेद

**तभा वृत्तसेवा,**
**बेंगळुरू, दि. ५ जानेवारी-**

बेंगळुरूच्या 'गुंजूर' मैदानावर झालेल्या ४४व्या कुमार-मुली नॅशनल खो-खो चॅम्पियनशिपमध्ये खेळाचा अंगावर शहारे आणणारा थरार पाहायला मिळाला! खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाच्या मान्यतेने आणि कर्नाटक खो-खो असोसिएशनद्वारे आयोजित या स्पर्धेत वेग, चपळता, डावपेच आणि जिद्दीचा अद्भुत संगम अनुभवायला मिळाला. अटीतटीच्या अंतिम लढतीत महाराष्ट्राच्या रणरागिणींनी आपल्या कौशल्याच्या जोरावर ओडिशाला नमवून सुवर्णपदक पटकाविले. मुलांच्या अंतिम सामन्यात यजमान कर्नाटकने बलाढ्य महाराष्ट्रावर मात करत सुवर्णावर कब्जा केला. या विजयाने दोन्ही राज्यांच्या खेळाडूंनी भारतीय खो-खो क्षेत्रात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

महाराष्ट्राने गेल्या वर्षापर्यंत सलग १० दुहेरी अजिंक्यपदे मिळवली होती. मुलांच्या गटात सलग १९ आणि एकूण ३५ अजिंक्यपदे महाराष्ट्राच्या नावावर होती; मात्र यंदा ही परंपरा खंडित झाली. तरीही महाराष्ट्राच्या मुलींनी सलग ११वे व एकूण २७वे अजिंक्यपद जिंकत आपली वर्चस्वाची गाथा अधिक भक्कम केली. या स्पर्धेत सोलापूरच्या शेतकरी कुटुंबातील स्नेहा लामकाने हिने 'जानकी पुरस्कार' पटकावत स्वतःसह महाराष्ट्राचे नाव उज्वल केले, तर कर्नाटकच्या बी. विजय याला 'वीर अभिमन्यू पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

**महाराष्ट्राची मुलींची विजयाची गुढी**

मुलींच्या गटात महाराष्ट्र आणि ओडिशा यांच्यात झालेला सामना अत्यंत थरारक ठरला. मध्यंतरापर्यंत १४-११ अशा निसटत्या फरकाने महाराष्ट्र आघाडीवर होता. तर संपूर्ण वेळेत दोन्ही संघांचा गुणफलक २५-२५ असा बरोबरीत होता. त्यानंतर झालेल्या अतिरिक्त डावात महाराष्ट्राने दमदार खेळ करत ४४-३३ असा ११ गुणांनी दणदणीत विजय मिळवला. संपूर्ण स्पर्धेत महाराष्ट्राच्या रणरागिणींनी जशी आपली कामगिरी पार पडली तशी अंतिम सामन्यात सुध्दा धमाकेदार ठेवत अजिंक्यपदावर नाव कोरले. या विजयात महाराष्ट्राच्या स्नेहा लामकाने (३, २.४० मि. संरक्षण व ४ गुण), मैथिली पवार (१.३०, १.३० मि. संरक्षण व ६ गुण), सानिका चाफे (२.२०, १.४० मि. संरक्षण व २ गुण), दीक्षा काटेकर (१.२० मि. संरक्षण व १० गुण), श्रावणी तामखडे (२, १.४०, १.१० मि. संरक्षण), श्रुती चोरमरे (१२ गुण) व श्वेता नवले (नाबाद २ मि. संरक्षण व ४ गुण) यांनी विजयी गुढी उभारताना प्रेक्षकांना जागेवर खिळवून ठेवले. तर पराभूत ओडिशाच्या खेळाडूंनी दिलेली लढत वाखाणण्याजोगी होती. त्यांच्या अर्चना प्रधान (२.५० मि., २.३० मि., १.१० मि. संरक्षण व ८ गुण), तृप्ती बारीक (२.२० मि., १.१० मि., १.०० मि. संरक्षण व ४ गुण), चिन्मयी प्रधान (६ गुण) आणि के. रम्या (२.०० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ केला. ओडिशाच्या मुलींची झुंजार लढत दिली मात्र शेवटी त्यांच्या पदरी निराशाच आली. या विजयानंतर महाराष्ट्राच्या खेळाडू व प्रेक्षकांनी एकच जल्लोष केला.

**वैयक्तिक पुरस्कारांचे मानकरी**

या स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या मुलींच्या गटात महाराष्ट्राची स्नेहा लामकाने 'जानकी पुरस्कारा'ची मानकरी ठरली, तर दीक्षा काटेकर (महाराष्ट्र) हिने 'सर्वोत्कृष्ट आक्रमक' आणि ओडिशाच्या अर्चना प्रधान हिने 'सर्वोत्कृष्ट संरक्षक' पुरस्कार पटकावला. मुलांच्या गटात कर्नाटकच्या विजय बी. याला 'वीर अभिमन्यू पुरस्कार' मिळाला. महाराष्ट्राचा राज जाधव 'सर्वोत्कृष्ट आक्रमक' आणि कर्नाटकचा प्रज्वल वाय. 'सर्वोत्कृष्ट संरक्षक' ठरला.

अंतिम सामन्यातील खेळाडूंची जिद्द, शिस्तबद्ध डावपेच आणि संघभावना कौतुकास्पद होती. मुलांच्या गटात रौप्यपदक मिळवतानाही संघाने दिलेली झुंजार लढत प्रेरणादायी आहे. या यशामागे खेळाडू, प्रशिक्षक, व्यवस्थापक आणि जिल्हा संघटनांची मेहनत मोलाची ठरली आहे. ही कामगिरी महाराष्ट्रातील खो-खोला राष्ट्रीय स्तरावर अधिक बळ देणारी असून भविष्यात आंतरराष्ट्रीय यशाचा मार्ग प्रशस्त करणारी आहे.


**- प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, सरचिटणीस , महाराष्ट्र खो-खो असोसिएशन**

**कर्नाटकचा मुलांचा घरच्या मैदानावर विजय**

मुलांच्या अंतिम सामन्यात यजमान कर्नाटकने महाराष्ट्रावर ३५-३० अशी ५ गुणांनी मात केली. मध्यंतराला कर्नाटकने २३-१२ अशी मोठी आघाडी घेतली होती. कर्नाटककडून विजय बी. (१.४८, १.१० मि. संरक्षण व ८ गुण), इब्राहिम (२.१० मि. संरक्षण व ४ गुण), जीवन राठोड (१.५० मि. संरक्षण व २ गुण), जीवन के. (२.१० मि. संरक्षण) आणि अनिकेत (६ गुण) यांनी विजयात मोलाचा वाटा उचलला. महाराष्ट्राच्या मुलांना जरी अपयश आले तरी त्यांनी केलेली कामगिरी कौतुकास्पद ठरली. उपविजेत्या ठरलेल्या महाराष्ट्र संघाकडून राज जाधव (१.२० मि. संरक्षण व ८ गुण), हरदया वसावे (१.३० मि. संरक्षण व २ गुण), पार्थ देवकाते (१ मि. संरक्षण व ४ गुण), जितेंद्र वसावे (१ मि. संरक्षण व ४ गुण) आणि योगेश पवार (१.५० मि. संरक्षण) यांनी झुंजार खेळ केला, मात्र संघाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

या स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींनी दाखवलेली एकजूट, शिस्त आणि शेवटपर्यंत न झुकणारी जिद्द अभिमानास्पद होती. प्रत्येक खेळाडूने दिलेल्या जबाबदारीचे भान ठेवत संघासाठी खेळ केला, हेच या यशाचे खरे गमक ठरले. सराव शिबिरातील मेहनत प्रत्यक्ष सामन्यांत दिसून आली आणि त्यामुळेच हे अजिंक्यपद शक्य झाले. या यशातून महाराष्ट्रातील भविष्यातील खो-खो खेळाडूंना नवी दिशा व प्रेरणा मिळेल.

**-प्रशिक्षक अभिजित पाटील (धाराशिव) व सहा. प्रशिक्षक ऐश्वर्या सावंत (रत्नागिरी)**




## वाडीकुरोलीची स्नेहा लामकाने जानकी पुरस्काराची मानकरी

**सोलापूर :** या राष्ट्रीय स्पर्धेतील मुलींच्या गटातील देशातील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा जानकी पुरस्कार वाडीकुरोली (तालुका पंढरपूर) येथील वसंतराव काळे प्रशालेची विद्यार्थिनी व कल्याणराव काळे स्पोर्ट्स क्लबची खेळाडू स्नेहा लामकाने हिला प्राप्त झाला आहे. यापूर्वी २०२२-२३ मध्ये वाडीकुरोलीच्याच प्रीती काळे हिने हा पुरस्कार मिळवला होत. स्नेहा व तिचे प्रशिक्षक अतुल जाधव यांचे महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस डॉ. चंद्रजीत जाधव, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर, सचिव उमाकांत गायकवाड, श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कल्याणराव काळे, सचिव बाळासाहेब काळे, प्राचार्य संजय कुलकर्णी, पर्यवेक्षक कुमार गाजरे यांनी अभिनंदन केले.

**अन्यायावर मात करत सर्वोच्च सन्मान**

विशेष म्हणजे, शालेय राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी एक महिन्यापूर्वी झालेल्या निवड चाचणी मध्ये स्नेहा लामकाने हिची १७ वर्षाखालील मुलींच्या गटात निवड समितीने महाराष्ट्र संघात निवड केली नव्हती. तिच्यावर अन्याय झाला होता. मात्र, या अन्यायाने खचून न जाता तिने आपल्या खेळातील गुणवत्ता, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर राष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी करत थेट भारत देशातील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा 'ऐतिहासिक जानकी पुरस्कार' पटकावला आहे.

# तेजस्विनी कथले यांनी शक्ती प्रदर्शन करत नगराध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ जानेवारी -**

बार्शी नगरपरिषदेच्या भाजपच्या नूतन नगराध्यक्षा तेजस्विनी कथले यांनी आज जोरदार शक्ती प्रदर्शन करत मिरवणुकीद्वारे वाजत गाजत जाऊन नगरपालिका मुख्यालयात नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला.

सकाळी अकरा वाजता कथले यांच्या निवासस्थानापासून शेकडो नागरिक आणि भाजप कार्यकर्ते तसेच नगरसेवकांच्या उपस्थितीत भव्य मिरवणूक काढण्यात आली. लेझीम, ढोल ताशे, संबळ अन हलगी अशा पारंपरिक वाद्यांच्या गजरात मुख्य मार्गाने ही मिरवणूक पालिकेजवळ आली. शिवसृष्टीमधील शिवरायांचा पुतळा, ग्रामदैवत श्री भगवंतांचे दर्शन घेऊन माजी आमदार राजेंद्र राऊत, कविता राऊत, पती प्रशांत कथले, कुटूंबिय, नातेवाईक आणि नगरसेवक यांच्या उपस्थितीत सन्मानाने तेजस्वी कथले यांनी पदभार स्वीकारला.



त्यानंतर नगरपालिका आवारात छोटेखानी कार्यक्रमात सर्व नगरसेवक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी आमदार राजेंद्र राऊत, मुख्याधिकारी तैमूर मुलाणी, बाजार समिती सभापती विजय गरड, भाजप शहराध्यक्ष महावीर कदम, तालुकाध्यक्ष मदन दराडे, गडदे, सेनेचे तालुकाप्रमुख विजय माने आदींसह नगरसेवक उपस्थित होते. मुख्याधिकारी तैमूर मुलाणी यांनी प्रस्ताविकात सर्वांचे स्वागत करत प्रशासन आणि पदाधिकारी हातात हात घालून शहराचा विकास करु, अशी ग्वाही देत नूतन नगरसेवक आणि नगराध्यक्षा यांना शुभेच्छा दिल्या. उपमुख्याधिकारी विठ्ठल पाटोळे, राजाराम नरुटे, नगर अभियंता आणि सर्व खाते प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते. नगरपालिका सभागृह,नगराध्यक्ष दालन यांची फुलांनी सजावट करण्यात आली होती. नूतन नगराध्यक्ष तेजस्विनी कथले म्हणाल्या, मी शहराची प्रथम सेवक आहे. प्रशासन आणि विरोधक यात समन्वय राखत हेवा वाटेल असा कारभार करु. देवभाऊ, जयाभाऊ अन राजाभाऊ हे तीन लाडके भाऊ शहरासाठी निधी कमी पडू देणार नाहीत. पाणी प्रश्न एप्रिलपर्यत मार्गी लावेन. माझे कार्यालय हे सदैव जनतेच्या सेवेसाठी तत्पर राहील. जिल्ह्याला हेवा वाटेल असे स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित शहर बनवू, असे अभिवचन दिले. माजी आमदार राजाभाऊ राऊत म्हणाले, तालुक्यात विकासाची थांबलेली घोडदौड पुन्हा सुरु होईल. तालुका पाठीमागे गेला अशी लोकांना भीती वाटत होती. काहीजणांनी तालुक्याला बदनाम करण्याचा प्रयत्न केला होता.

कोणी आपणास नावं ठेवणार नाही असा कारभार करा. हारतुरे स्वीकारताना आपल्याला ज्यांनी सहकार्य केले त्यांना फक्त विसरु नका. माझी हात जोडून विनंती आहे. कारण जिवाभावाचे सोबती महत्वाचे. सर्वांचा तुम्ही सन्मान करा, लोकांसोबत आपुलकी ठेवा, उज्वल कारकीर्द होईल अशा शुभेच्छा दिल्या.

राजकारणात काहीही होऊ द्या, कोण येईल कोण जाईल पण आपण ज्या गावात जन्मलो आणि वास्तव्य आहोत अशा आपल्या गावाची बदनामी होईल असे पाप कुणीही करु नका. चार वर्षे प्रशासक कारकीर्द होती. त्यामुळे एकट्या सीईओंना काम करताना अडचणी निर्माण झाल्या. नगरपालिकेत आर्थिक तुटवडा तयार झाला आहे. २५ कोटी अनुदान जुनी देणी देण्यासाठी सरकारकडून मंजूर होईल. निधी आणण्यात आपण एक्स्पर्ट आहोत. शहरवासियांनी काळजी करण्याचे कारण नाही. ३२ नगरसेवक विजयी होतील, अशी अपेक्षा होती. थोड्या जागा कमी आल्या. पराभूत झाला असला तरी तुम्ही नगरसेवक आहेत, लोकांत जावा. त्यांची कामे करा.

विरोधकांना उद्देशून राऊत म्हणाले, तुम्हाला आयुष्यात गुलाल पडू देणार नाही. जरा मोठं मन करा की, आज विरोधी नगरसेवक आले नाहीत. त्यांचा काहीतरी कुटील डाव सुरु होता. जाणीवपूर्वक कटकारस्थान आणि बदनामी आम्ही सहन करणार नाही. आम्हाला काय घेरणार, आमच्या मनात कुणाविषयी काही नाही. प्लॅनिंग करुन अडचण करण्याचा प्रयत्न करु नका, आम्ही सक्षम आहोत.

## महत्वाचे...



## नागणसूरच्या प्रचंडे प्रशालेत आनंद मेळावा

**अक्कलकोट, दि. ५ जानेवारी-**

नागणसूर येथील एच.जी. प्रचंडे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत दरवर्षाप्रमाणे याही वर्षी आनंद मेळावा संपन्न झाला. आनंद मेळावा कार्यक्रमाचे उद्घाटन प्रशालेचे प्राचार्य शंकर व्हनमाने यांच्या मुख्य उपस्थितीत प्राथमिक शिक्षक सोसायटीचे तालुका अध्यक्ष बसवराज खिलारी यांच्या हस्ते करण्यात आले. या मेळाव्यात स्वदेशी विविध खाद्यपदार्थाचे रेलचेल मोठ्या प्रमाणात होती. भारतीय खाद्यपदार्थांची विविधता यामध्ये दिसून आली. या आनंद मेळाव्याने विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळाला. लहानपणापासूनच विविध वस्तूंच्या खरेदी विक्रीचे आर्थिक व्यवहार समजण्यास मदत झाली. त्यामुळे प्रशालेच्या लहान विद्यार्थी विद्यार्थिनीने पाणीपुरी, भेळ, वडापाव, कच्ची दाबेली, गाजराचा हलवा, पुरी भाजी, संगम वडा, आईस्क्रीम, विविध पेय आनंद मेळाव्यात विक्रीसाठी आणले होते .बॉलआणि ग्लास, इलेक्ट्रिक जादू आदी गमती जंमती मोठ्या आनंदात सादर करून आनंद मेळावा पार पडला. आनंद मेळाव्याला बाजाराचे स्वरूप प्राप्त झाले होते. या मेळाव्यामध्ये परिसरातील सर्व जिल्हा परिषद मुख्याध्यापक,शिक्षक, शिक्षिका, लहान चिमुकले यांच्यासह विद्यार्थी- विद्यार्थिनी, पालक, माजी विद्यार्थी आदी जणांचा समावेश होता. मेळावा यशस्वी होण्यासाठी प्रचंडे प्रशालेतील प्राचार्य शंकर व्हनमाने यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेतले.

## डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

डॉ.आंबेडकर मेमोरियल फंड समिती संचलित डॉ.आंबेडकर मेमोरियल हायस्कूल, डॉ.आंबेडकर मेमोरियल नाईट हायस्कूल, मनपा प्राथमिक शाळा क्र. २५ यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष भागवत सरवदे, स्कूल कमिटीचे चेअरमन बबन साबळे यांच्यासह शशिकांत कांबळे, सुहासिनी कुलकर्णी, शंकर म्हमाणे, सायरा शेख, गव्हाणे, मकानदार, कासार, संतोषी साबळे, सतीश शिंदे, दत्तात्रय चौगुले उपस्थित होते. सुशील जानराव, मीना कोळी यांनी सूत्रसंचालन केले. विश्वनाथ कुलकर्णी यांनी आभार मानले.

# पंढरपूर पोलिसांनी शोधला १३ लाख ६३ हजारांचा मुद्देमाल

## सोने-चांदीचे दागिने व ३५ मोटरसायकली केल्या फिर्यादीस परत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ जानेवारी -**



येथील शहर पोलीसांनी दमदार कामगिरी करीत गेल्या वर्षभरात चोरीस गेलेल्या काही घटना मधील सोन्याचे व चांदीचे दागीने असा ८ लाख ८१ हजार ७०० रूपयांचा तसेच ३५ मोटार सायकलचे असे दोन्ही मिळुन १३ लाख ६३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पंढरपुर शहर पोलीस ठाणेस दाखल असलेल्या गुन्ह्यातील फिर्यादींना परत दिल्याची माहिती शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी दिली.

याबाबत माहिती देताना घोडके यांनी सांगितल की, पंढरपूर शहर पोलीस ठाणेत दाखल गुन्हयामध्ये चोरीस गेलेले ८ लाख ८१ हजार ७०० रूपये किंमतीचे सोन्याचे दागीने (१० तोळे) व चांदीच्या वस्तु (५०० ग्रॅम) गुन्हयातील आरोपी कडुन जप्त करण्यात आले. तसेच पंढरपूर शहर पोलीस ठाणेत दाखल गुन्हयातील चोरीस गेलेले ८२ हजार रुपये किंमतीचे दोन तोळे सोन्याचे दागीने आरोपींकडून जप्त करण्यात आले. सन २०२५ अखेर एकुण ३५ मोटार सायकलींचा शोध घेऊन या प्रकरणातील संशयितांना जेरबंद करुन ह्या मोटारसायकली संबंधित फिर्यादीस परत दिल्याचे सांगितले. दरम्यान सदर चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेचे उद्देशाने पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, पंढरपुर विभाग, पंढरपुर यांचे सुचनेनुसार व पंढरपुर शहर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी सपोनि आशिष कांबळे व अंमलदार यांची विशेष पथके नेमली होती. शहर व परिसरात लक्ष ठेवले असता सदरचे आरोपी सापडले. दरम्यान सदरची कामगीरी ही वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोसई राजेश गोसावी, पोह सिरमा गोडसे, पोह विठ्ठल विभुते, पोह प्रसाद औटी, पोह सचिन हेंबाडे, पोना पकाले, पोका कपिल माने, पोशि शहाजी मंडले, पोकॉ बजरंग बिचुकले, पोकॉ दिपक नवले, पोकॉ दिपक नवले, चापोका बडे तसेच सायबर पोलीस ठाणे, सोलापुर ग्रामीणचे पोकॉ रतन जाधव यांनी पार पाडली.



## पत्रकार दिनानिमित्त रोहित धोत्रे यूथ फाउंडेशन, आर.डी. ग्रुपच्या वतीने पत्रकारांचा सत्कार

**टेंभुर्णी, दि. ५ जानेवारी-**

रोहित धोत्रे यूथ फाउंडेशन टेंभुर्णी व आर.डी. ग्रुप टेंभुर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने सहा जानेवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या पत्रकार दिनानिमित्त टेंभुर्णी ग्रामीण पत्रकार संघ व टेंभुर्णी प्रेस क्लबच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे औचित्य साधून पत्रकार बांधवांचा सत्कार करण्यात आला. सर्व पत्रकारांना मिठाई, पुष्पहार, पेन व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रस्तावना व सूत्रसंचालन करताना अखिल महाराष्ट्र वडार समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजकुमार धोत्रे यांनी केले. टेंभुर्णी प्रेस क्लबचे नूतन अध्यक्ष सतिश चांदगुडे तसेच टेंभुर्णी ग्रामीण पत्रकार संघाचे नूतन अध्यक्ष धनंजय भोसले यांनी सत्काराबद्दल मनोगत व्यक्त करत आर.डी. ग्रुप व रोहित धोत्रे यूथ फाउंडेशनचे आभार मानले. कार्यक्रमास टेंभुर्णीतील पत्रकार संतोष वाघमारे, प्रेस क्लबचे ज्येष्ठ सदस्य सोपान ढगे, सुहास साळुंखे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अनिल जगताप, पत्रकार संघाचे सचिव गणेश पोळ, माजी अध्यक्ष प्रा. हरिश्चंद्र गाडेकर, प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष गणेश चौगुले, सुरज देशमुख, धनंजय मोरे, महावीर वजाळे आदी उपस्थित होते. पत्रकारांचा सत्कार अध्यक्ष सूरज धोत्रे, उपाध्यक्ष राहुल धोत्रे, तसेच योगेश वाघमारे, पृथ्वीराज जगताप, ओम आरडे, शुभम पवार, सचिन आखाडे, रोहन जगताप, ओंकार जगताप यांच्या हस्ते करण्यात आला.

## निधन वृत्त...

### पूज्य माँ गीताभारतीजी

**सोलापूर, दि.५ जानेवारी-**



सोलापूरसह देशभरातील अनेकांचे धार्मिक गुरु आणि पहिल्या महिला महामंडलेश्वर, जूनी पंचायती निर्वाणी आखाडयाचे प्रमुखा माँ गीता भारती उर्फ संतोषीपुरी माता यांचे सोमवार, ५ जानेवारी २०२६ रोजी निधन झाले. मृत्युसमयी त्या ८५ वर्षांच्या होत्या. मंगळवार, ६ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता अहमदाबाद येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. माँ गीताभारती उर्फ संतोषीपुरी यांचा जन्म हरिद्वार येथे झाला. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना 'गीता भारती' ही पदवी बहाल केली होती. देशभरात होणाऱ्या कुंभमेळ्यात त्यांना मानाचे स्थान होते. देश-विदेशात त्यांचे लाखो अनुयायी आहेत. सोलापुरातील तब्बल ६५ हजारांहून अधिक भक्त त्यांच्याकडून दीक्षा घेतले आहेत. दरम्यान, जुनी पंचायती निर्वाणी आखाडयाचे उत्तराधिकारी म्हणून माता प्रज्ञापुरी यांच्याकडे पदभार सोपविण्यात आले आहे.

### गोपालदास गोयदानी

**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**



चाटी गल्ली येथील किलबिल फुलवारी मालकाचे जेष्ठ बंधु गोपालदास बन्सीलाल गोयदानी यांचे रविवार दिनांक ४/१/२०२६ रोजी सकाळी ७.३० वाजता निधन झाले. मृत्यूसमयी ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, २ बंधू, २ मुले, सुना, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे त्यांच्या पार्थिव देहावर मारवाडी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### अंबऋषी कोळेकर

**बार्शी, दि. ५ जानेवारी-**



बार्शी येथील माजी मुख्याध्यापक, बार्शी तालुका भटक्या विमुक्त जमाती संघटनेचे अध्यक्ष, वारकरी संप्रदायाचे भजनीकार, सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते अंबऋषी कोळेकर (वय ७२) यांचे दि. ४ जानेवारी रोजी खोपोली येथील रुग्णालयात उपचार सुरु असताना निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, दोन भाऊ, पुतणे, चार बहिणी असा परिवार आहे.

### राहुल आसादे

**सोलापूर, दि.५ जानेवारी-**



राहुल राजेंद्र आसादे (वय २९) राहणार सरस्वती चौक उत्तर सदर बाजार लष्कर सोलापूर यांचे रविवार रोजी रेल्वे अपघाती निधन झाले. ते मोची समाजाचे नेते राजेंद्र आसादे यांचे मोठे चिरंजीव होते, त्यांच्या पश्चात दोन बहिणी, एक भाऊ, आई-वडील असा परिवार आहे

## जय भारत शाळेत बालिका दिन साजरा

**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

जयभारत प्राथमिक शाळेत बालिका दिन अर्थात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. शालेय समितीचे सदस्य मारुती माळगे हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सिद्राम फुले, सचिव दीपक फुले, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी उपस्थित होते. विद्यार्थिनींनी सावित्रीबाईंच्या वेशभुषा परिधान करुन त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक कार्य यावर भाषणातून प्रकाशझोत टाकले. म्हेत्रे यांनी प्रास्ताविक, गोटे यांनी सूत्रसंचालन केले. लेंगरे यांनी आभार मानले. यावेळी पालकही उपस्थित होते.

# नीती आयोगाचे प्रभारी अधिकारी तोशाबा शिंदे यांनी दिली सांगोल्यास भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ५ जानेवारी-**



तोशाबा शिंदे यांनी ग्रामीण रुग्णालय सांगोला या ठिकाणी भेट देऊन ओपीडी, आयपीडी, रुग्णालयातील सर्व इमारती, प्रसुती गृह या कक्षांना भेटी देऊन पाहणी केली. यावेळी डॉ.फुले, डॉ.साळे उपस्थित होते.

आकांक्षी तालुका कार्यक्रम अंतर्गत नीती आयोग, नवी दिल्लीचे प्रभारी अधिकारी तोशाबा शिंदे यांनी सांगोला तालुक्यास भेट देत सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांना आकांक्षीत ब्लॉक निर्देशांक निहाय करावयाच्या प्रगती बाबत मार्गदर्शन केले. यावेळी जि.प.सोलापूरचे बालकल्याणचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद मिरकले, सांगोला गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संदीप देवकते, पशुसंवर्धन अधिकारी डॉ.असलम सय्यद, बांधकाम उपअभियंता नकाते, सीडीपीओ अभिजीत मोलानी, उमेद अभियान व्यवस्थापक अवताडे तसेच पंचायत समितीचे आरोग्य विस्तार अधिकारी मिलिंद सावंत, जगन्नाथ टकले, पंचायत विस्तार अधिकारी अमोल तोडकरी, देवानंद पुकळे, अंगणवाडी पर्यवेक्षिका वाघमारे उपस्थित होते.

दरम्यान तालुका भेटी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, घेरडी येथे भेट देऊन आढावा घेत इमारत बांधकाम, स्वच्छता, ओपीडी, आयपीडी, प्रसुती कक्ष, कर्मचारी निवासस्थान, याची पाहणी केली व दुरुस्तीसाठी नीती आयोगाकडे मागणी करण्यासंदर्भात सांगितले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.कल्याणी सरवदे, औषध निर्माण अधिकारी खुमन तडवी, आरोग्य सहाय्यक पांडुरंग कोळी, आरोग्य सहायिका सुलताना शेख, माने, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी करिष्मा जाधव, सोमा मोटे उपस्थित होते. तसेच प्राथमिक शाळा व अंगणवाडी येथील आकांक्षीत निर्देशांका निहाय करावयाच्या प्रगती बाबत मार्गदर्शन केले. उमेद अभियान अंतर्गत सीआरपी महिला बचत गट यांना मार्गदर्शन केले.

प्राथमिक आरोग्य केंद्र येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.महानवर, डॉ.इनामदार यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राचा आढावा सादर केला. त्याठिकाणी सोयी सुविधांची पाहणी केली. ओपीडी, आयपीडी, प्रसुती कक्षाची पाहणी केली. यावेळी पंचायत अधिकारी सचिन लंगोटे, उपसरपंच शिंदे व नंदकुमार शिंदे उपस्थित होते. त्यानंतर पंचायत समिती, सांगोला येथे कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी सहा.गटविकास अधिकारी वसंत फुले यांनी आभार मानले.

# शैक्षणिक, सांस्कृतिक विश्वातील उपक्रमशील बार्शीतील सुरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळ

**बार्शी तालुक्यातील जवळगांवचे सुपुत्र शिवाजीराव यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन शुन्यातून विश्व घडविले आणि या राज्यात उद्योगपती, शिक्षण संस्थाचालक आणि दानशूर व्यक्तीमत्व म्हणून समाजात आपले स्थान निर्माण केले. शिवाजीराव डिसले यांनी आपल्या कठोर परिश्रम, स्पष्टवक्ता, पारदर्शी स्वभाव, स्वच्छ कार्यपद्धती यातून आपल्या सार्वजनिक बांधकाम क्षेत्रातील कामांचा व्याप वाढविला. त्यांच्याकडे कर्तृत्वामुळे जसा लक्ष्मीचा आशीर्वाद होता तसाच त्यांच्या दानशूर स्वभावामुळे त्यांना मानणारा मोठा वर्ग पंचक्रोशीत निर्माण झाला होता. गरजू माणसाला मदत करण्याची त्यांची वृत्ती होती. त्यामुळे त्यांच्याकडे एक अजातशत्रू व परोपकारी व्यक्तीमत्त्व म्हणून पाहिले जात होते. जवळगांवच्या अनेक उपक्रमांना त्यांनी आजीवन सढळ हाताने मदत केली. डिसले यांच्या प्रेरणेने उच्चशिक्षित कलाप्रेमी, युवा नेतृत्व रवींद्र कापसे यांनी सन १९९९ साली सुरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळाची स्थापना केली. आपले मित्र व मंडळाचे सचिव प्रताप दराडे व अन्य सहकार्यांच्या मदतीने कापसे यांनी बार्शी तालुक्यात कला, साहित्य, क्रीडा, नाट्य व सांस्कृतिक क्षेत्रातील विविध उपक्रम गेली २६ वर्षे राबविले आहेत.**

---

रवींद्र कापसे यांनी युवकांमध्ये सभा धीटपणा व अभिव्यक्ती आणि अविष्कार व आत्मविश्वास निर्माण व्हावा यासाठी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धांचे संयोजन केले. तसेच एकांकिका या अभिजात नाट्यकलेचे संवर्धन करण्यासाठी सलग १४ वर्षे राज्यस्तरीय कै. बाबुराव डिसले करंडक एकांकिका स्पर्धांचे संयोजन केले. या स्पर्धेला राज्याच्या कानाकोपऱ्यातून अनेक नववधीत विद्यार्थी कलावंतांनी आपल्या कलागुणांचे प्रदर्शन घडवत सहभाग दिला. त्यामुळे या स्पर्धेच्या माध्यमातून अनेक चांगले कलावंत घडले. या स्पर्धांचे वैशिष्ट्य म्हणजे खुल्या रंगमंचावर या स्पर्धांचे संयोजन झाले होते. सर्व विभागातून सर्व समावेशक पारितोषिके हे या स्पर्धेचे वेगळे वैशिष्ट्ये होते. तसेच या मंडळाने निसर्गचित्र रेखाटन या अभिनव स्पर्धाचेही आयोजन केले. या मंडळाच्या वाटचालीतील शिरपेचात मानाचा तुरा खोवण्याचे काम कै. बाबुरावजी डिसले जीवनगौरव पुरस्काराने केले आहे. समाजाच्या विविध क्षेत्रामध्ये आपल्या गुणवत्ता, कर्तृत्व, कलागुण, सेवाभाव, कल्पकता यांचा ठसा उमटवित कार्यरत असणाऱ्या प्रज्ञावंत, कलावंत, क्रीडापटू, शिक्षक, पत्रकार, कर्तृत्वशालिनी महिला यांना सन्मानित करण्याचे काम या पुरस्कारांच्या माध्यमातून होत आहे. गेली २३ वर्षे हे पुरस्कार दिले जात असून या पुरस्कार सोहळ्यांमध्ये विख्यात सिनेअभिनेते राहुल सोलापूरकर, अभिनेत्री क्रांती रेडकर, सुरेखा कुडची, अविनाश देशमुख यासारखे नामवंत कलावंत आले आहेत. या पुरस्कारांमुळे समाजातील गुणवंतांची काम





करण्याची उमेद वाढली आहे. विधायक कामाला प्रोत्साहन ही या उपक्रमामागची संयोजक रवींद्र कापसे यांची भूमिका आहे. रवींद कापसे हे शिक्षण क्षेत्रातील ध्येयवादी व्यक्तीमत्त्व आहे. शिक्षणाच्या माध्यमातून सुसंस्कार, व्यक्ती महत्त्व विकास, विविध सुप्त गुणांना व्यासपीठ व राष्ट्रप्रेम निर्माण करावे ही कापसे यांची शिक्षण क्षेत्रातील दृष्टी आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागात आधुनिक काळाची गरज असलेले इंग्रजी माध्यमाचे शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी शिशुविहार ते कनिष्ठ महाविद्यालय अशा शाखा अर्णव शैक्षणिक संकुल, सासुरे फाटा, वैराग व शिवप्रभा शैक्षणिक संकुल, नागोबा चौक, रुई, ता. बार्शी येथे निर्माण केल्या आहेत.

या शाळांच्या माध्यमातून विज्ञान प्रदर्शन, वार्षिक स्नेहसंमेलन, आनंद बाजार, जिल्हास्तरीय स्काऊटगाईड मेळावा असे विद्यार्थ्यांना घडविणारे उपक्रम आयोजित केले जातात. तसेच या शाळांमध्ये देशी खेळांना प्रोत्साहन मिळावे व चांगले क्रीडापटू घडावेत या उद्देशाने राज्यस्तरीय कुस्ती व कबड्डी स्पर्धांचेही संयोजन केले जाते. या शाळांच्या माध्यमातून चांगले विद्यार्थी घडले आहेत. रवींद्र कापसे यांनी विद्यार्थीदशेपासूनच सामाजिक बांधिलकी जपली आहे. त्यांच्याकडे संघटन कौशल्य आहे. तसेच समाजासाठी काही भव्यदिव्य घडविण्याची त्यांची इच्छाशक्ती आहे. त्यामुळे शिक्षण व सामाजिक कार्य या क्षेत्रात कापसे यांनी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. आपल्या शिक्षण संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कोणत्याही सोयीसुविधांची कमतरता भासू नये यासाठी ते प्रयत्नशील असतात. ग्रामीण भागातील शैक्षणिक दर्जा उंचाविण्याचे काम ध्येयवादी दृष्टीकोनामुळे होत आहे. आपल्या मंडळाच्या माध्यमातूनही समाजाला दिशा देण्याचे काम कापसे यांनी केले आहे. कापसे यांनी बार्शी तालुक्यात विविध क्षेत्रातील मित्र परिवाराच्या माध्यमातून विधायक उपक्रमशीलता जोपासली आहे.

आपल्या शिक्षण संस्थांच्या माध्यमातून जबाबदार नागरिक निर्माण करण्याबरोबरच त्यांच्यामध्ये स्वावलंबन, स्वयंपूर्णता व आधुनिक ज्ञानाची गोडी निर्माण करण्यासाठी कापसे प्रामाणिक तळमळीने काम करीत आहेत. त्यांच्या या कार्यामध्ये सुविद्य पत्नी सौ. अर्चना कापसे या समर्पित भावनेने साथ देत आहेत. सौ. कापसे यांनी मुख्याध्यापिका म्हणून नेटके व शिस्तबद्ध व्यवस्थापन अंमलात आणले आहे. समाजभूषण शिवाजीराव डिसले यांनी अतिशय कष्टातून विविध उद्योगांची निर्मिती केली. त्यांच्या विचारांचा व कार्याचा वसा आणि वारसा जपण्याची काम या शैक्षणिक संकुल व सुरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या माध्यमातून होत आहे. शिवाजीराव डिसले यांचे आदर्श पुढे नेण्यासाठी त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांची स्मृती चिरंत्तर राहिली आहे हे कौतुकास्पद आहे.

**- अरुण बळप, बार्शी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भावी नगरसेवकांच्या खर्चावर कडक नजर

**खर्च नोंदवही, बँक स्टेटमेंट सादर करणे बंधनकारक**

**निवडणूक खर्च समितीची स्थापना**

**उमेदवारांसाठी प्रशिक्षण बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक संदर्भात निवडणूक खर्चावर निवडणूक आयोगाची कडक नजर राहणार आहे. यासाठी निवडणूक खर्च समितीची स्थापना करण्यात आली. या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिकेच्या मीटिंग हॉलमध्ये राजकीय पक्षांचे उमेदवार, इच्छुक उमेदवार तसेच उमेदवारांचे अधिकृत खर्च प्रतिनिधी यांच्यासाठी मार्गदर्शन व प्रशिक्षण बैठक घेण्यात आली.

मुख्य लेखाधिकारी डॉ.रत्नराज जवळगेकर यांनी निवडणूक खर्चाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी मुख्य लेखापरीक्षक सदानंद वाघमोडे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. मुख्य लेखाधिकारी डॉ.रत्नराज जवळगेकर यांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रचारासाठी होणारा प्रत्येक खर्च नियमबद्ध, पारदर्शक व वेळेत नोंदवणे उमेदवारांसाठी बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले. उमेदवारांनी अर्ज दाखल केल्यापासून ते दि.१६ जानेवारीपर्यंतचा संपूर्ण खर्चाचा तपशील देणे महत्वाचे आहे.

दि.८ जानेवारी व १२ जानेवारी रोजी खर्च तपासणी होणार आहे. प्रचार खर्चाशी संबंधित बँक स्टेटमेंट व सर्व मूळ पावत्या सादर करणे आवश्यक आहे. जाहिराती, सभा, वाहन वापर, बॅनर, पोस्टर तसेच सोशल मीडियावरील प्रचार खर्चाचीही नियमांनुसार नोंद करणे बंधनकारक आहे. खर्च सादरीकरणासाठी आवश्यक कागदपत्रे, खर्च नोंदवही भरण्याची पद्धत व खर्च निरीक्षकांकडून होणाऱ्या तपासणीबाबतही उपस्थितांना माहिती देण्यात आली. नियमांचे उल्लंघन झाल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले, असेही सांगण्यात आले. या बैठकीस विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### खर्चाबाबत महत्त्वाच्या सूचना

- अर्ज दाखल केल्यापासून १६ जानेवारीपर्यंतचा खर्च सादर करणे बंधनकारक
- दररोजचा प्रचार खर्च खर्च नोंदवहीत नोंदवावा
- ८ व १२ जानेवारी रोजी खर्च तपासणी
- बँक स्टेटमेंट व सर्व मूळ पावत्या अनिवार्य
- जाहिराती, सभा, वाहन, बॅनर, पोस्टर व सोशल मीडिया खर्चाची स्वतंत्र नोंद
- नियमभंग झाल्यास निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कारवाई करण्यात येणार

# प्रचार साहित्याने बाजार फुलला

- ✓ विविध पक्षांच्या चिन्ह साहित्याला जोरदार मागणी
- ✓ शहरातील मधला मारुती परिसर गजबजून गेला



**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि.५ जानेवारी-**

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारांना चिन्ह वाटप झाल्यानंतर शहरातील प्रचार साहित्य बाजारात मोठी उलाढाल सुरु झाली आहे. अंतिम उमेदवार यादी स्पष्ट झाल्यानंतर मधला मारुती परिसरातील प्रचार साहित्य विक्री केंद्रांमध्ये एकाचवेळी ऑर्डरींचा ओघ वाढल्याने हा परिसर गजबजलेला आहे.

महापालिकेच्या निवडणुकीते ५६४ उमेदवार रिंगणात आहेत. प्रत्यक्ष प्रचाराला आता वेग आला आहे. याचा थेट परिणाम प्रचार साहित्याच्या विक्रीवर झाला आहे. व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार सध्या विविध पक्ष चिन्हाच्या साहित्याचीही विक्री होत आहे. तसेच इतर राजकीय पक्षांच्या चिन्हाच्या साहित्याला मागणी असल्याचे चित्र आहे. मधला मारुती येथील व्यापाऱ्यांनी सांगितले की, चिन्ह वाटप प्रक्रिया पूर्ण होताच अचानक ऑर्डरी वाढल्या आहेत. टी-शर्ट, स्कार्फ, झेंडे यांना विशेष मागणी असून, भाजपचे साहित्य येताच तात्काळ संपत आले आहे. यंदा प्रचार साहित्याची खरेदी उशिरा सुरु झाली असली, तरी सध्या मागणी झपाट्याने वाढत आहे.

**टी-शर्ट, झेंडे, बिल्ले, दुपट्टे, पोस्टरला मागणी**

अंतिम उमेदवार निश्चित होताच टी-शर्ट, झेंडे, बिल्ले, दुपट्टे, पोस्टर व प्लेकार्ड यांची मागणी लक्षणीयरित्या वाढली आहे. पदयात्रा, प्रभागनिहाय प्रचार फेऱ्या व कॉर्नर सभा सुरु झाल्याने तातडीच्या ऑर्डरी मोठ्या प्रमाणात दिल्या जात आहेत. कमी वेळेत जास्त साहित्य मिळावे; यासाठी अनेक उमेदवार रात्री उशिरापर्यंत छपाई करुन घेत असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

**डिजिटलसोबत पारंपरिक प्रचारालाही चालना**

डिजिटल प्रचाराचे महत्त्व वाढले असले, तरी अंतिम टप्प्यात प्रत्यक्ष प्रचाराशिवाय निवडणूक जिंकणे कठीण असल्याची जाणीव उमेदवारांना होत असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे सोशल मीडियासोबतच झेंडे, बिल्ले, टी-शर्ट यांसारख्या पारंपरिक प्रचार साहित्यालाही पुन्हा जोर आला आहे. पुढील काही दिवसांत मधला मारुती परिसरातील प्रचार साहित्य बाजार पूर्ण क्षमतेने फुलणार, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# दै.तरुण भारतचे अविनाश गायकवाड यांना पत्रकार पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जानेवारी-**

राष्ट्रीय पत्रकार दिनाचे औचित्य साधून सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुलच्या वतीने देण्यात येणाऱ्या कै.बाबुरावसा दत्तात्रयसा भुमकर आदर्श पत्रकार पुरस्कारांचे नावे जाहीर करण्यात आली.



यात दै.तरुण भारतचे उपसंपादक अविनाश गायकवाड यांचाही समावेश आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष संजीव बिद्री व शालेय समितीचे अध्यक्ष राजू भुमकर यांनी दिली. सोलापूरचे ज्येष्ठ पत्रकार अविनाश गायकवाड यांना त्यांच्या पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल नुकताच मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांनी गेली अनेक वर्षे सामाजिक प्रश्नांवर परखड लेखन करून जनसामान्यांचे प्रश्न मांडले आहेत.

नागराज बगले, विनोद कामतकर, प्रभू वारशेट्टी, श्रीशैल भद्रशेट्टी, शरीफ सय्यद, संतोष चितापुरे, विष्णू सुरवसे, प्रीतम पंडित, मनोज हुलसुरे, सोनू शहानूरकर, बाळकृष्ण दोड्डी, शेखर गोतसुर्वे, नितीन पात्रे या पत्रकारांचीही निवड करण्यात आली. शनिवार, १० जानेवारी रोजी सकाळी १० वाजता सहस्त्रार्जून शैक्षणिक संकुल येथे पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# ‘आठवण माईंची’ दै.तरुण भारतच्या विशेष पुरवणीचे प्रकाशन

**सिंधूताई सपकाळ यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त भावपूर्ण आदरांजली**



**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि.५ जानेवारी-**

अनाथांची आई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पद्मश्री डॉ.सौ.सिंधूताई (माई) सपकाळ यांच्या चौथ्या पुण्यस्मरण दिनानिमित्त पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे ‘यशोदा माई राष्ट्रीय पुरस्कार’ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वतीने माईंच्या कार्याला आदरांजली म्हणून प्रकाशित करण्यात आलेल्या ‘आठवण माईंची’ या विशेष पुरवणीचे प्रकाशन करण्यात आले.

याप्रसंगी पद्मश्री गिरीश प्रभुणे, एकलव्य बालशिक्षण व आरोग्य न्यासच्या अध्यक्षा रेणुताई गावस्कर, विलू पूनावाला फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी जसविंदर नारंग, अनंत चिंचोळकर, ममता सिंधूताई सपकाळ, दीपक दादा गायकवाड, विनय सिंधूताई सपकाळ, प्रणव सातभाई, सागर बोधगिरे, दैनिक तरुण भारतचे धाराशिव जिल्हा प्रतिनिधी अनिल आगलावे आदी उपस्थित होते.

‘आठवण माईंची’ या विशेष पुरवणीमधून सिंधूताई सपकाळ यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा, अनाथ, निराधार आणि वंचित मुलांसाठी केलेल्या कार्याचा तसेच समाजाला दिलेल्या मोलाच्या संदेशांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. माईंच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजात सेवाभाव आणि माणुसकी जपण्याचा संदेश ही पुरवणी देते.

मान्यवरांनी सिंधूताई सपकाळ यांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांची आणि कार्याची आजच्या पिढीला अत्यंत गरज असल्याचे मत व्यक्त केले. सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास विविध सामाजिक संस्था, सेवाभावी कार्यकर्ते, पत्रकार तसेच माईंच्या कार्याने प्रेरित असलेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## चिमुकल्या व्यावसायिकांनी जिंकली पालकांची मने!

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**

येथील फ्लाईंग किड्स इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलमध्ये आज 'आनंद मेळावा' उत्साहात पार पडला. शालेय जीवनात केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना व्यावहारिक जगाचे धडे मिळावेत, या हेतूने आयोजित केलेल्या या मेळाव्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

आनंद मेळाव्याचे प्रेमा पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उदघाटन करण्यात आले.

यावेळी शाळेचे प्राचार्य चतुर्वेदी, उपप्राचार्या जेकब, ज्युनिअर को-ऑर्डिनेटर जेकब आणि सिनिअर को-ऑर्डिनेटर काकडे उपस्थित होती. मेळाव्यात विद्यार्थ्यांनी सजवलेले खाद्यपदार्थांचे स्टॉल्स. खमंग भेळ, चविष्ट सँडविच, वडापाव आणि विविध थंड पेयांसह विद्यार्थ्यांनी केवळ पदार्थ विक्री केली नाही, तर 'मार्केटिंग', 'फायनान्स' आणि 'कस्टमर सर्व्हिस' यांसारख्या व्यावसायिक संज्ञांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

हिशोब करतानाची त्यांची अचूकता पाहून उपस्थित पालकांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### मुंबईच्या भाविकाकडून तुळजाभवानी मंदिरला ५१ हजार रुपयांची देणगी

**तुळजापूर, दि.५ जानेवारी -**

नवी मुंबई येथील भाविक सतीश नारायण हिरे यांनी सहकुटुंब श्री कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीजींचे दर्शन घेतले. दर्शनानंतर हिरे कुटुंबीयांनी देवीचरणी आपली भक्ती अर्पण करत श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानला रोख स्वरूपात ५१ हजार रुपयांची देणगी दिली. त्यांच्या या धार्मिक व सेवाभावी कार्याबद्दल मंदिर संस्थानच्या वतीने हिरे कुटुंबीयांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांना श्री तुळजाभवानी देवीजींची प्रतिमा व महावस्त्र भेट म्हणून देण्यात आले. यावेळी सहायक जनसंपर्क अधिकारी अतुल भालेराव, उमाकांत क्षीरसागर तसेच संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### व्यंकटेश महाजन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

**धाराशिव, दि.५ जानेवारी -**


येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत वैद्यनाथ कॉलेज परळी येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेत महाविद्यालयाची विद्यार्थिनी साक्षी भांडारकर हिने रौप्यपदक मिळवले व तिची मेंगलोर कर्नाटक येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. तर विराज जाधवर कांस्य पदक मिळविले व त्याची रोहतक हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल संस्थेच्या मार्गदर्शक रेखाताई महाजन, अध्यक्ष पूनमताई महाजन, संस्था सचिव ॲड. मिलिंद पाटील, संस्था सदस्य शेषाद्री डांगे, कमलाकर पाटील, डॉ. अभय शहापूरकर, प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी यांनी अभिनंदन केले

### शिराढोण परिसरातून म्हैस चोरी; गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.५ जानेवारी -**

शिराढोण पोलीस ठाण्यात फिर्यादी सुर्यकांत धोंडीराम धाकतोडे (वय ५६, रा. शिराढोण ता. कळंब) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, शिराढोण शिवारातील रायगव्हाण गावाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या शेत गट नं.१९७ अ मधील गोठ्यातून अंदाजे १ लाख ४० हजार रुपये किमतीची मुरा जातीची म्हैस अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना घडली आहे. ही चोरी दि.२२ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ८ ते दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान घडली. या प्रकरणी फिर्यादी यांनी दि.४ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून शिराढोण पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.





### आरळी बुद्रूकचे महेश तानवडे यांना कलबुर्गी विद्यापीठाची डॉक्टरेट

**धाराशिव, दि.५ जानेवारी -**

तालुक्यातील आरळी बुद्रूक येथील महेश विलास तानवडे यांना कलबुर्गी (कर्नाटक) येथील शरणबसवा विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. डॉ. महेश यांनी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अभ्यास व संशोधन विभागातून डॉ. बसवराजेश्वरी इंदूर यांच्या मार्गदर्शनाखाली स्टडीज फॉर सिलेक्टेड एनडोक्राईन डिसरप्टिंग कम्पाउंडस इफेक्ट्स ऑन मेल रिप्रोडेक्टीव्ह ॲक्टिव्हिटीज इन अल्बिनो रॅटस या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला होता. आरळी सारख्या ग्रामीण भागातून येऊन उच्च दर्जाचे संशोधन पूर्ण करणे ही अभिमानास्पद बाब मानली जात आहे. या यशाबद्दल त्यांचे वडील विलास तानवडे, आई धानम्माबाई तानवडे यांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच भाऊ सिद्राम तानवडे, रामेश्वर तानवडे, काका श्रीशैल्य तानवडे, प्रकाश तानवडे, गणेश तानवडे यांच्यासह आरळी बुद्रूक व परिसरातील नागरिक, मित्रपरिवार, शिक्षक व नातेवाईकांनी डॉ. महेश तानवडे यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

# दोन्ही नगरपरिषदेत धोबीपछाड; मतदारांसमोर जाण्याचा नैतिक अधिकार नाही

## ▶▶ सुजितसिंह ठाकुरांची तानाजी सावंतांवर नाव न घेता जोरदार टीका...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.५ जानेवारी -**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जशा-जशा जवळ येत आहेत, तसे परंडा विधानसभा क्षेत्रातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत असून नेत्यांमधील शाब्दिक संघर्ष अधिक तीव्र होत चालला आहे.



(दि.३) जानेवारी रोजी वाशी तालुक्यातील इंदापूर येथे पार पडलेल्या 'शिंदे गटाच्या विजय संकल्प मेळावा'त माजी मंत्री आमदार तानाजी सावंत यांनी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, माजी आमदार राहुल मोटे तसेच आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्यावर नाव न घेता जोरदार टीका केली होती. त्या टीकेला प्रत्युत्तर देताना भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी परंडा येथे (दि.५) जानेवारी रोजी भाजपच्या एका कार्यक्रमात नाव न घेता सावंतांवर कडाडून टीका केली. ठाकूर म्हणाले, दोन्ही नगरपरिषद निवडणुकांत जनतेने त्यांना स्पष्टपणे धोबीपछाड दिली आहे.

त्यामुळे मतदारांसमोर जाण्याचा त्यांना कोणताही नैतिक अधिकार नाही. ते पुढे म्हणाले, पालकमंत्री असताना भाजपच्या एकाही कार्यकर्त्याला साधा निधीही दिला नाही. फक्त लोकांचा प्रवेश करून घेण्याचीच भूमिका त्यांनी घेतली. जिल्हा परिषद निवडणुकांचा उल्लेख करत ठाकूर यांनी आक्रमक इशारा दिला. आम्ही ठरवलं तर येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकांत त्यांना बुका लावू, असा थेट इशाराच त्यांनी दिला. निवडून आल्यापासून मतदारसंघात केवळ दोन-तीन वेळाच पाय ठेवला असल्याचा आरोप करत ठाकूर यांनी सावंतांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. यानंतर आता पाटील आणि मोटे गटाकडून काय प्रतिक्रिया येते, याकडे परंडा मतदारसंघासह संपूर्ण धाराशिव जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

एकमेकांवर होत असलेल्या या टीका-प्रत्युत्तरांमुळे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर परंडा विधानसभा क्षेत्रातील राजकीय घडामोडींना अधिक वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## शिराढोण परिसरात चोरीस गेलेली गाभण म्हैस अवघ्या काही दिवसांत जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**

शेतकरी सूर्यकांत धोंडीराम धाकतोडे यांच्या शेतातून दहा महिन्यांची गाभण मुऱ्हा जातीची अंदाजे १ लाख ४० हजार रुपये किमतीची म्हैस चोरीस गेली होती. या प्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात गु.र.नं. ०२/२०२६ अन्वये भा.न्या.सं. कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला होता.

दरम्यान, दि.४ जानेवारी २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सुदर्शन कासार व त्यांचे पथक गस्त करीत असताना शिराढोण पोलीस ठाणे हद्दीत धाबा पाटी, शिराढोण पारधीपेढी परिसरात एका इसमास रात्रीच्या अंधारात एक म्हैस व एक रेडकू घेऊन जाताना आढळून आले. संशय आल्याने त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने उडवा-उडवीची उत्तरे दिली. त्यामुळे संबंधित इसम व जनावरांना पुढील चौकशीसाठी शिराढोण पोलीस ठाण्यात आणण्यात आले.

सखोल चौकशीत सदरची म्हैस ही गु.र.नं. ०२/२०२६ मधील चोरीस गेलेलीच असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी पंचनामा करून १ लाख ४० हजार रुपये किमतीची म्हैस व रेडकू जप्त केली. आरोपी जालिंदर उर्फ पिंटू शंकर शिंदे (रा. ब्रह्मगाव, शेंडी पाटी, ता. वाशी, जि. धाराशिव) याच्याकडे चौकशी केली असता त्याने आपल्या दोन साथीदारांसह सदर म्हैस चोरी केल्याची कबुली दिली. पुढील कारवाईसाठी आरोपीला शिराढोण पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार यांच्यासह पोह. शौकत पठाण (५७६), जावेद काझी (२८९), प्रकाश औताडे (९२९), फरहान पठाण (१२७५), चापोह. रत्नदीप डोंगरे (५३९) व चापोह. नवनाथ गुरव (६६२) यांनी केली.

## समुद्रवाणी येथे विवाहितेची आत्महत्या

### हुंड्यासाठी छळ केल्याचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी-**

मयत तसलीम मोहसीन शेख (वय २७, रा. समुद्रवाणी ता. जि. धाराशिव) यांनी दि.२ जानेवारी २०२६ रोजी रात्री ११ वाजता समुद्रवाणी येथील राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी इक्रामहुसेन अकलाक हुसेन शेख (वय ३४, रा. इर्ला ता. जि. धाराशिव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पती मोहसीन शेख, दिर आशपाक रुकमोद्दीन शेख तसेच सासू यास्मीने शेख (सर्व रा. समुद्रवाणी ता. जि. धाराशिव) यांनी मयत तसलीम हिच्या माहेरून दहा तोळे सोने आणण्याच्या कारणावरून तिला वारंवार शिवीगाळ, मारहाण व मानसिक छळ केला. हुंड्यासाठी दिलेल्या सततच्या त्रासाला कंटाळून तसलीम हिने आत्महत्या केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.



या प्रकरणी दि.४ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून बेंबळी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम १०८, ८०, ८५, ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३५१ (३) व ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## तुळजापूर बसस्थानकात खिसेकापूचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी-**

तुळजापूर पोलीस ठाण्यात दाखल फिर्यादीनुसार, फिर्यादी सोमनाथ बापुराव झेंडेकर (वय ६२, रा. प्लॉट नं. २२६, बीड बायपास, नाईकनगर, जि. संभाजीनगर) हे दि.४ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता तुळजापूर येथील जुन्या बसस्थानकात सोलापूर-धुळे बसमध्ये चढत असताना ही घटना घडली. गर्दीचा फायदा घेत आरोपी अरुण रावसाहेब काळे (रा. जामखेड) यांनी फिर्यादी यांच्या पॅन्टच्या मागील खिशातील ६,५७० रुपये चोरण्याचा प्रयत्न केला.

## परंडा विधानसभेत राजकीय हालचालींना वेग; वाशीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.५ जानेवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्याने परंडा विधानसभा क्षेत्रात राजकीय हालचालींना वेग आला आहे. निवडणुकांची घोषणा कधीही होण्याची शक्यता लक्षात घेता सर्वच राजकीय पक्षांकडून संघटनात्मक बांधणीला जोर देण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून परंडा विधानसभेचे माजी आमदार राहुल मोटे यांनी आघाडी घेतली आहे. भूम, परंडा व वाशी तालुक्यातील जिल्हा परिषद गट तसेच गावागावात कार्यकर्त्यांच्या बैठका घेण्याचा सपाटा त्यांनी लावला असून कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी रणनीती आखली जात आहे.

दि.४ जानेवारी रोजी वाशी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस पक्षाचे पदाधिकारी, स्थानिक नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संघटन मजबूत करणे, बूथनिहाय तयारी तसेच निवडणुकीतील संभाव्य अडचणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी राहुल मोटे यांनी कार्यकर्त्यांना जोमाने कामाला लागण्याचे आवाहन करत, येणाऱ्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा प्रत्येक जिल्हा परिषद गटात फडकवण्याचा निर्धार व्यक्त केला.

## परंडा तालुक्यात भाजपचे 'अटल संमेलन' उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ जानेवारी -**

भारतीय जनता पार्टी, परंडा तालुक्याच्या वतीने 'अटल संमेलन'चे आयोजन करण्यात आले. आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जि.प. व पं.स.च्या निवडणुका भाजपा पूर्ण ताकदीने लढवणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.

प्रत्येक जि.प. गट व पं.स. गणातून इच्छुक उमेदवारांकडून परिचयपत्र भरून घेण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. भाजपा नेते मा. आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले. येणाऱ्या निवडणुकांत भाजप मोठ्या ताकदीने मैदानात उतरणार असून प्रत्येक कार्यकर्त्याने सक्रिय सहभाग घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, ॲड. नितीन भोसले, ॲड. गणेश खरसडे, ॲड. संतोष सूर्यवंशी, अरविंद रगडे, ॲड. जहीर चौधरी, सुखदेव टोंपे, बाबासाहेब जाधव, धनाजी गायकवाड, तानाजी पाटील, अर्जुन शिंदे, राजाभाऊ चौधरी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

## पराभवाने खचून जावू नका जनतेच्या कामात राहा यश जवळच आहे : खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

### तुळजापूर न.पा.तील सर्व उमेदवारांचा सन्मान सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**



तुळजापूर नगरपालिकेच्या निवडणुकीत निवडून आलेल्या तसेच पराभूत झालेल्या सर्व उमेदवारांचा सन्मानपूर्वक सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी निवडून आलेल्या उमेदवारांनी जनतेने दाखवलेल्या विश्वासास पात्र ठरत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहावे, पारदर्शक व लोकाभिमुख कारभार करावा तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत सर्वसमावेशक प्रगतीसाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन करण्यात आले.

निवडणुकीत पराभूत झालेल्या उमेदवारांनी खचून न जाता सामाजिक कार्य, जनतेशी असलेले नाते आणि लोकहिताचे उपक्रम अधिक जोमाने सुरू ठेवावेत, असा सकारात्मक संदेश यावेळी देण्यात आला.

निवडणूक हा राजकीय प्रवासातील केवळ एक टप्पा असून जनसेवा ही अखंड चालणारी साधना आहे.

विजय-पराजयाच्या पलीकडे जाऊन समाजहितासाठी सातत्याने कार्यरत राहणे हीच खरी लोकशाहीची भावना असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

विजय-पराजयाच्या पलीकडे जाऊन सर्व उमेदवारांनी लोकशाही प्रक्रियेत दिलेले योगदान मोलाचे असून तुळजापूरच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे, समन्वयाने व सकारात्मक भूमिकेतून काम करणे ही काळाची गरज असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

या कार्यक्रमास काँग्रेस जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, ऋषिकेश मगर, शाम मामा पवार, शामल वडणे, अर्जुन आप्पा साळुंके, सागर इंगळे, सुधीर कदम, राहुल खपले तसेच पक्षाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुळजापूर बसस्थानकात खिसेकापूचा प्रयत्न; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**

तुळजापूर पोलीस ठाण्यात दाखल फिर्यादीनुसार, फिर्यादी सोमनाथ बापुराव झेंडेकर (वय ६२, रा.प्लॉट नं.२२६, बीड बायपास, नाईकनगर, जि. संभाजीनगर) हे दि.४ जानेवारी रोजी सायं. ७ वाजता तुळजापूर येथील जुन्या बसस्थानकात सोलापूर-धुळे बसमध्ये चढत असताना ही घटना घडली.

गर्दीचा फायदा घेत आरोपी अरुण रावसाहेब काळे (रा. मिलींद नगर, भुतारा रोड, जामखेड, जि. अहिल्यानगर) यांनी फिर्यादी यांच्या पॅन्टच्या मागील खिशातील ६,५७० रुपये चोरण्याचा प्रयत्न केला.

या प्रकरणी फिर्यादी यांनी दि.४ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## बालगंधर्व रंगमंदिर येथे 'आठवण माईंची' विशेष पुरवणीचे प्रकाशन

▶▶ दै. 'तरुण भारत'चे मान्यवरांकडून कौतुक... ▶▶ सिंधूताई सपकाळ यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त भावपूर्ण आदरांजली...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**

अनाथांची आई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पद्मश्री डॉ. सिंधूताई (माई) सपकाळ यांच्या चौथ्या पुण्यस्मरण दिनानिमित्त पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे यशोदा माई राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी दैनिक सोलापूर तरुण भारततर्फे माईंच्या कार्याला आदरांजली म्हणून प्रकाशित करण्यात आलेल्या 'आठवण माईंची' या विशेष पुरवणीचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.



या प्रकाशन सोहळ्यास पद्मश्री गिरीश प्रभुणे, रेणुताई गावस्कर (अध्यक्षा - एकलव्य बाल शिक्षण व आरोग्य न्यास, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग), सेवा संकल्प प्रतिष्ठान (चिखली, जि. बुलढाणा), विलू पूनावाला फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी जसविंदर नारंग, अनंत चिंचोळकर, ममता सिंधूताई सपकाळ, दीपक दादा गायकवाड, विनय सिंधूताई सपकाळ, प्रणव सातभाई, सागर बोधगिरे तसेच दैनिक तरुण भारतचे धाराशिव जिल्हा प्रतिनिधी अनिल आगलावे आदी मान्यवर उपस्थित होते.

'आठवण माईंची' या विशेष पुरवणीमधून सिंधूताई सपकाळ यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा, अनाथ, निराधार आणि वंचित मुलांसाठी केलेल्या कार्याचा तसेच समाजाला दिलेल्या मोलाच्या संदेशांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. माईंच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजात सेवाभाव आणि माणुसकी जपण्याचा संदेश ही पुरवणी देते.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी सिंधूताई सपकाळ यांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांची आणि कार्याची आजच्या पिढीला अत्यंत गरज असल्याचे मत व्यक्त केले. पुरस्कार सोहळ्याच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास विविध सामाजिक संस्था, सेवाभावी कार्यकर्ते, पत्रकार तसेच माईंच्या कार्याने प्रेरित असलेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'निळकंठेश्वर'चे ४४ दिवसांत १ लाख मेट्रिक टनाचे गाळप

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि.५ जानेवारी :** तालुक्यातील किल्लारी येथील श्री निळकंठेश्वर सहकारी साखर कारखान्याने अवघ्या ४४ दिवसांत १ लाख मेट्रिक टनाचे ऐतिहासिक ऊस गाळप करुन यंदाच्या हंगामातील उद्दिष्ट यशस्वीपणे पूर्ण केले आहे.आ. अभिमन्यू पवार यांच्या पुढाकारातून व सातत्यपूर्ण प्रयत्नातून अनेक आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय अडचणींवर मात करत कारखान्याने साधलेली ही कामगिरी सहकार क्षेत्रासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

एकेकाळी मृतावस्थेत असलेला व अनेक वर्षे बंद असलेला कारखाना सहकाराच्या माध्यमातून पुन्हा नव्या जोमाने सुरु झाला आहे. श्री निळकंठेश्वराचे आशीर्वाद आणि शेतकऱ्यांचा विश्वास या बळावर कारखान्याने १ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. सध्या कारखाना पूर्ण क्षमतेने सुरू आहे. या यशाबद्दल कारखान्यावर अहोरात्र कार्यरत असलेले सर्व अधिकारी, कर्मचारी, सहकार व सभासद ऊस उत्पादक शेतकरी बांधवांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. यंदाच्या गळीत हंगामात कारखान्याने ३ लाख ते ३ लाख ५० हजार मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवून काम सुरू ठेवले आहे. कारखान्याच्या दैनंदिन साखर उतान्याने १२.०५ टक्क्यांपर्यंत मजल मारली असून सरासरी साखर उतारा १०.७५ टक्के इतका समाधानकारक आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



**शेतकऱ्यांच्या विश्वासामुळेच यशस्वी – आ. पवार**

श्री निळकंठेश्वराचे आशीर्वाद आणि शेतकरी बांधवांचा विश्वास याच्या बळावर किल्लारीचा निळकंठेश्वर सहकारी साखर कारखाना पुन्हा उभा राहिला आहे. अवघ्या ४४ दिवसात १ लाख मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण होणे ही सहकाराची ताकद दर्शवते. केंद्रीय मंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्र्यांनी कारखाना सुरू करण्यासाठी मोलाची मदत केली. त्यामुळेच अशक्य वाटणारे कार्य शक्य झाले. अधिकारी, कर्मचारी यांचे योगदान व शेतकऱ्यांचा विश्वास असल्यामुळे कमी दिवसात गाळपाचे उद्दिष्ट पुर्ण झाले आहे.

कारखान्याच्या यशस्वी कामगिरीत नवीन 'नॅचरल शुगर' चे बी. बी. ठोंबरे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

तसेच वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटने तांत्रिक सल्लागार म्हणून बजावलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. कारखान्यातील संपूर्ण मशिनरीचे नूतनीकरण करण्यात आल्याने कारखाना सध्या सुस्थितीत व कार्यक्षमतेने सुरू आहे.आमदार अभिमन्यू पवार यांनी हा कारखाना पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक मदत मिळवून दिली.

त्या मदतीच्या आधारे कारखान्याचे पुनर्जीवन करण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेला हा कारखाना सहकारात पुन्हा सुरू झाल्याने लातूर व धाराशिव जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही मोठी दिलासादायक व आनंदाची बातमी ठरली आहे.

किल्लारीच्या निळकंठेश्वर साखर कारखान्याने ४४ दिवसात १ लाख मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण करून सहकाराच्या ताकदीचे दर्शन घडविले असून आगामी काळात उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने कारखाना वेगाने वाटचाल करीत राहील, असा विश्वास शेतकरी व सभासदांकडून व्यक्त होत आहे.

# श्री गुरू हावगीस्वामी महाराज म्हणजे उदगीरला लाभलेल एक वैभव : आ. बनसोडे




**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि.५ जानेवारी :** श्री गुरू हावगीस्वामी महाराजांचे जीवन म्हणजे तळपत्या सूर्यासारखे तेजस्वी होतं त्यांच्या सदाचाराला, सदविचाराला आणि विवेकाला अंत नव्हता एवढे असूनही सामान्य माणसाला सुंदर जीवन जगण्यासाठी सोपी जीवन पद्धती महाराजांनी सांगितली. श्री गुरु हावगीस्वामी यात्रा महोत्सवानिमित्त आयोजीत परमरहस्य ग्रंथाचे पारायण व शिवनाम जपयज्ञ उदगीरचे वैभव असल्याचे मत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते श्री सद्गुरु हावगीस्वामी यात्रा महोत्सव निमित्त सप्तकोटी शिवपंचाक्षर महामंत्र जपयज्ञ अखंड शिवनाम सप्ताह व परम रहस्य पारायण समारोहाप्रसंगी बोलत होते.

यावेळी श्री श्री १०८ डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज, माजी आ.गोविंदराव केंद्रे, वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापुरे, सचिन हुडे, उमेश पाटील, बालाजी भोसले, वसंत पाटील, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, शिवकुमार हसरगुंडे, विजय निट्टरे, मनोज कपाळे, राजकुमार हुडगे, नगरसेवक बाळासाहेब पाटोदे, सय्यद

**परमरहस्य ग्रंथाचे पारायण व शिवनाम जपयज्ञ सांगता समारोह**

इम्रान पाशा, गिरीष उप्परबावडे, बाळासाहेब मरलापल्ले, रामलिंग मठपती, शिवा उप्परबावडे, प्रमोद शेटकार, अनिरुध्द गुरुडे, भास्कर पाटील, कुणाल बागबंदे, ईश्वर समगे, शिल्पा उप्परबावडे, अनिता हैबतपुरे, रेखा कानमंदे, शंकुतला समगे, ताराबाई मोदे, सुरेखा समगे, श्रीदेवी खंदारे, शिवकुमार कांबळे, अंकेश धनुरे, प्रा.मल्लेश झुंगास्वामी, शंकरप्पा हरकरे, वीरभद्र स्वामी, राजशेखर कानमंदे, अशोक समगे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार संजय बनसोडे यांनी, श्री गुरु हावगीस्वामी महाराजांनी इथल्या समाजाला धार्मिक वारसा मिळवून दिला. दया आणि कृपा ही महाराजांची देण आहे. 'भक्ती हीच सर्वश्रेष्ठ शक्ती आहे' आणि ही भक्ती आम्हाला गुरुंनी शिकवली म्हणूनच आज या परिसरात भक्तीचा सुगंध पसरला असल्याचे आमदार बनसोडे यांनी सांगितले.

मी गेल्या अनेक वर्षापासुन श्री गुरु हावगीस्वामी महाराजांच्या चरणी नतमस्तक होवून त्यांचे आशिर्वाद घे तो इथे आले की समाजसेवेची नवी ऊर्जा मला मिळते. आपण सर्व माझ्या माता भगिनी व माझ्या बांधवांनी

माझ्यावर मोठा विश्वास दाखवून दुसऱ्यांदा मोठे मताधिक्य देवुन निवडून दिलात म्हणून मी 'जे जे नव ते ते उदगीरला हवं' या ब्रीद वाक्याप्रमाणे आपल्या उदगीरचा विकास केला आहे. सर्वसामान्यांसाठी वीरशैव लिंगायत भवनची निर्मिती केली.

श्री गुरु हावगीस्वामी महाराज यांच्या मठाला दोन कोटी रुपयाचा निधी दिला. त्यातुन हा भव्य सभामंडप उभारले असुन येत्या काळात आणखीन निधी देणार असल्याचेही आ.संजय बनसोडे यांनी सांगितले. यावेळी उदगीर सह पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणेश किनकर 'उत्कृष्ट पत्रकार' पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव, दि.५ जानेवारी :** निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ, पुणे यांच्या वतीने ६ जानेवारी २०२६ रोजी पुणे येथे आयोजित वर्धापन दिनानिमित्त अभिवाचन व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात लातूर जिल्ह्यातील लोकमतचे प्रतिनिधी गणेश किनकर (रा. किनगाव, ता. अहमदपूर) यांना २०२६ चा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

ग्रामीण भागातील जनसामान्यांचे प्रश्न, शेतकरी व कष्टकरी वर्गाचे मुद्दे, सामाजिक अन्याय तसेच प्रशासनाशी संबंधित विषयांवर सातत्याने, वस्तुनिष्ठ आणि निर्भीड वृत्तांकन केल्याबद्दल त्यांची या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

**पुण्यात ६ जानेवारीला पुरस्कार सोहळा**

निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ, पुणे ही संस्था राज्यभरातील ग्रामीण पत्रकारांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम करते. संघाच्या वर्धापन दिनानिमित्त राज्यातील विविध जिल्ह्यांतील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांचा या सोहळ्यात सन्मान करण्यात येणार आहे.

पुरस्काराबाबत प्रतिक्रिया देताना गणेश किनकर यांनी सांगितले की, हा २०२६ चा राज्यस्तरीय पुरस्कार माझ्या पत्रकारितेच्या कामाची पावती असून, यामुळे अधिक जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

या सन्मानाचे श्रेय त्यांनी कुटुंबीय, ज्येष्ठ पत्रकार, सहकारी आणि वाचकांना दिले आहे. पुढील काळातही समाजहित आणि सत्याधिष्ठित पत्रकारितेवर भर देत कार्य सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# वसंतराव नाईक आश्रम शाळेत पालक मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव, दि.५ जानेवारी :** येथील वसंतराव नाईक आश्रम शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीचे अवचित्य साधून पालक मेळावा आणि पास्को कायद्याविषयी मार्गदर्शन कार्यक्रम शनिवारी घेण्यात आला.

सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक प्रशांत गुळवे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके, मुरळे, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोस्को कायद्याअंतर्गत सविस्तर माहिती सपोनि माणिक डोके यांनी उपस्थित विद्यार्थी व पालकांना दिली.

# व्याख्यानमाला, सांस्कृतिक कार्यक्रमामुळे रेणापूरकरांना मिळाली संस्काराची शिदोरी

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि.५ जानेवारी :** दिनांक २९ ते ३१ डिसेंबर दरम्यान श्रीराम प्राथमिक माध्यमिक



उच्च माध्यमिक विद्यालय रेणापुर येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले . त्या अंतर्गत दिनांक ३१ डिसेंबर रोजी उच्च माध्यमिक विद्यालयाचा शेलापागोटे कार्यक्रम, स्व . मधुकरराव सूडे व्याख्यानमाला व रात्रीचा कलेच्या रंगाची उधळण असलेला सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. यामुळे रेणापुर नगरीतील विद्यार्थी पालक व रसिक प्रेक्षकांना साहित्याची ,कलेची व संस्काराची शिदोरी मिळाली. शेला पागोटे कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ .नरसिंग वाघमोडे यांच्या हस्ते झाले.

स्व.मधुकरराव सुळे व्याख्यानमालेसाठी अध्यक्ष म्हणून पंचायत समिती रेणापुरचे गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडीया उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध वक्ते प्रा गणेश बेळंबे उपस्थित होते.

या प्रसंगी व्यासपीठावर रेणुका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदासराव कुटवाड, सचिव पंडीतराव उगीले, उपाध्यक्ष रविकांत अकनगिरे, कोषाध्यक्ष ज्ञानोबा बरुरे, सहसचिव विठ्ठलराव कटके, संचालक ओमप्रकाश गोडभरले, अनिता भातीकरे, सूनिल कुटवाड, दिपक गोडभरले, प्राचार्य सिध्देश्वर मामडगे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सतिष मोरे, पर्यवेक्षक अनिल कुटवाड, प्रा भरत धायगुडे यांची उपस्थिती होती .स्व . मधुकरराव सुडे व्याख्यानमालेचे व्याख्याते प्रा. गणेश बेळंबे यांनी संस्काराचा दिपस्तंभ - छ. शिवाजी महाराज या विषयावर व्याख्यान केले . छ शिवाजी महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंगातून व्यक्तिमत्व कसे घडते याचे मार्गदर्शन केले .

या कार्यक्रमात प्रतीवर्षा प्रमाणे याही वर्षी २०२५ श्रीराम गौरव पुरस्काराचे मानकरी सूनिल साखरे, सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ .देविका भिकाने, सहाय्यक पोलीस निरीक्षक केशव राठोड यांना मान्यवरांच्या हस्ते पूरस्कार प्रदान करण्यात आला . सुनिल साखरे यांनी धनुर्विधाचे मौल्यवान किट शाळेस भेट दिली. मनोगतातून शाळेप्रती कृतज्ञता भाव व्यक्त केला. गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडीया यांनी विविध उपक्रमातील शाळेच्या सहभागाचे कौतुक केले.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन रेणापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांनी केले. रात्रीच्या सांस्कृतिक कार्यक्रमात लोकपरंपरेवर आधारित विविध गाणी नाटिका व विविध कला गुणदर्शनाचा कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्वर स्वामी सुरेखा बस्तापूरे प्रा लहुकांत शेवाळे यांनी केले तर आभार महानंदा माने यांनी मानले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी पालक रसिक प्रेक्षकांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

# चाकूने वार केल्याने तिघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**देवणी, दि.५ जानेवारी :** येथील वाडा लंच होमच्या समोर पूर्वीच्या किरकोळ भांडणाच्या कारणावरून चाकूने वार केल्याने तिघांविरुद्ध देवणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद झाला आहे.

याबाबत पोलिस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, निलंगा रोड वरील वाडा लंच होमच्या समोर दि.३० डिसेंबर रोजी सायंकाळी ५:३० वाजता गोविंद गिरी व गोरख गिरी हे मागील काही किरकोळ कारणावरून कुरापत काढून सुरज गोविंद गिरी यांनी गणेश चाळकापुरे याला चाकूने पोटावर वार करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. दता बालाजी चाळकापुरे यांच्या फिर्यादीवरून सुरज गोविंद गिरी, गोरख गिरी, गोविंद गिरी (सर्व रा. देवणी ता. देवणी जि. लातूर) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद झाला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बराडे हे करीत आहेत. देवणी शहरात चाकू हल्ला करणारा हा पहिला युवक असल्याचे नागरिकातून बोलले जात होते.

# रेणापूर येथे दर्पण दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि.५ जानेवारी :** मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त दर्पण दिनाचे औचित्य साधून रेणापूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता रेणुका देवी मंदिर सभागृह, रेणापूर येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' या वृत्तपत्राच्या माध्यमातून ज्ञान, प्रबोधन व सत्याचा जो मार्ग दाखवला, त्या मार्गावर चालत सत्य, निर्भयता व समाजहितासाठी पत्रकारिता करण्याची शपथ या कार्यक्रमात घेण्यात येणार आहे. भारतीय लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेच्या सन्मानार्थ हा दर्पण दिन विशेष कार्यक्रम आयोजित केला आहे.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून मा. वर्षा ठाकूर-घुगे मॅडम, जिल्हाधिकारी, लातूर, मा. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लातूर हे अध्यक्षस्थानी लाभणार असून मा. राहूल कुमार मीना साहेब, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

यावेळी विशेष उपस्थिती म्हणून मा. ए. जे. तडवी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. लातूर, मा. रविंद्र चौधर, पोलीस उप-अधीक्षक, चाकूर उपविभाग, मा. तृप्ती अंधारे मॅडम, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. प. लातूर, मा. सुमित जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती रेणापूर, मा. एल. डी. देवकर, मा. तानाजी घोलप साहेब, जिल्हा माहिती अधिकारी, लातूर, मा. सुधाकर देडे, पोलीस निरीक्षक, रेणापूर, मा. सी. बी. काळे, उपविभागीय अभियंता, महावितरण रेणापूर, मा. प्रशांत थोरात, तहसीलदार रेणापूर, तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, जि. प. बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता मा. सुभाष कुलकर्णी, मा. डॉ. अनिता अलगुले, वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय रेणापूर, मा. नितिन कांबळे, तालुका कृषी अधिकारी रेणापूर, मा. कृष्णा भराडीया, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती रेणापूर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाचे आयोजन रेणापूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले असून अध्यक्ष नामदेव शिंदे, उपाध्यक्ष बालाजी कटके, सचिव सिद्धार्थ चव्हाण, सहसचिव ईश्वर बद्दर, तसेच आर. डी. अपसिंगेकर, विठ्ठल अण्णा कटके, चंद्रकांत कातळे, गंगासिंह कदम, रफिक शिकलकर, निजाम शेख, भरत भोसले, सुधाकर दहिफळे, कोंडीराम काळे, शिवाजी यमते, अंकुश गवळी, योगेश मोरे आदी पदाधिकारी व सदस्य परिश्रम घेत आहेत.

दर्पण दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमास पत्रकार बांधवांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रेणापूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता राखली

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि.५ जानेवारी :** तंत्रशिक्षण मंडळाने घेतलेल्या परिक्षेत आलमला येथील विश्वेश्वरय्या इंस्टिट्युट ऑफ इंजिनीअरिंग अण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवत अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. या वर्षी १०६ विद्यार्थी ९० टक्केपेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत तर विशेष प्राविण्यासह ६५७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. अंतिम वर्षाचा निकाल १००% लागला आहे.तर रामोला शेळके ९६.३५% गुण घेऊन प्रथम आली आहे.

संगणक अभियांत्रिकी अंतिम वर्षातील राज कांबळे ९६.२४ टक्के द्वितीय तर नम्रता गोगाडे ९६ टक्के तृतीय आली आहे. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अंतिम वर्षातून प्रकाश कंकाळ व श्रुती सुर्यवंशी अनुक्रमे ९६ टक्के गुण घेऊन प्रथम, तनहाज मुलानी ९५.६३ टक्के द्वितीय तर दिक्षा चौधरी ९५.५३ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. सिव्हील इंजिनीअरिंग अंतिम वर्ष विभागातुन यशराज कानडे ९४.२२ टक्के प्रथम, रोहन जाधव ९३.६७ टक्के द्वितीय तर पवन जाधव ९३.५६ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे.



इलेक्ट्रॉनिक्स एण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग अंतिम वर्षातुन ओंकार गोरे ९४.१२ टक्के प्रथम, मानसी घोगरे ९३.१८ टक्के द्वितीय तर श्रवण गावकरे ९२.३५ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. इलेक्ट्रीकल इंजिनीअरिंग अंतिम वर्षातुन श्रेया म्हाळगी व शिंदे संध्याराणी अनुक्रमे ९२.७१ टक्के प्रथम, जान्हवी रासुरे ९२.४७ टक्के द्वितीय तर धनश्री जगताप ९२.३५ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. मेकॅनिकल इंजिनीअरिंग अंतिम वर्षातुन नागेश जावळे ९२.५९ टक्के प्रथम, कृष्णा बिराजदार ९०.९४ टक्के द्वितीय आणि अपुर्व पांडे ८९.०६ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे.

द्वितीय वर्ष सिव्हील इंजिनीअरिंग विभागातुन आदित्य नागुरे ९४.१२टक्के प्रथम, योगिनी कोकाटे ९२.७२ टक्के द्वितीय आणि अंकिता सुर्यवंशी ९१.९६ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. कॉम्प्युटर विभागातुन श्रुती गणापुरे ९३.०६ टक्के प्रथम, सृष्टी म्हेत्रे ९२ टक्के द्वितीय तर गायत्री गावकरे ८९.४१ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. इलेक्ट्रॉनिक्स एण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग विभागातुन पुनम चव्हाण ९२.७८ टक्के प्रथम, अमर मेंडोळे ९२.६७ टक्के द्वितीय तर स्नेहा सोमवंशी ९२.११ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे.

**रामोला शेळके ९६.३५ टक्के गुण घेऊन महाविद्यालयातुन प्रथम**

इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विभागातुन इरफान शेख ९२.३५ टक्के प्रथम, आसावरी इटकर ९१.४१ टक्के द्वितीय तर वैभवी सोमवंशी ९१.२९ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. इलेक्ट्रीकल इंजिनीअरिंग विभागातुन अंतरा आदमाने ९१.१८ टक्के प्रथम, समिना मुल्ला ८९.६५ टक्के द्वितीय आणि सुधीर बनसोडे ८८.४७ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. मेकॅनिकल विभागातुन अनिकेत कुलकर्णी ८८.५६ टक्के प्रथम आणि गायत्री भिंगोले ८७ टक्के गुण द्वितीय आली आहे.

महाविद्यालयातुन श्रेया काळे ९५.६०, दिक्षा चौधरी ९५.५३, अफरीन शेख ९५.२९, संध्या आळणे ९५.४१, ऋषीकेश ढगे ९४.९४, कृष्णा पाटील ९४.८२, ऋषीकेश देशपांडे ९४.७१, राजश्री केंद्रे ९४.५९, अदित्य हवालदार ९४.४७, राणी मोरे ९४.३५, यशराज कानडे ९४.२२, सायली पाटील व अमृता गावकरे अनुक्रमे ९४.१२, ऋतुजा खोसे,रितेश चौधरी, समीक्षा खुणे ९४, संध्या माने ९३.७७, मंथन औताडे ९३.०६, प्रतिक बिडवे, नेहा लोमटे व अदिनाथ केंद्रे अनुक्रमे ९३.४१, ऋषीकेश जगताप व गौरव चिद्रे अनुक्रमे ९३.२९, श्रेया बायसठाकूर ९२.८२, सई मद्दे ९२.७१, वैभवी खुणे ९२.५६, निकीता धवन ९२.९४, स्नेहल पाटील ९२.५९, समीक्षा रुकमे, नेहा मातोळे, हर्षवर्धन सातपुते व स्नेहा लोणारे अनुक्रमे ९२.४७, सुमित चंदनशिवे, महेश कोलबुद्रे ९२.२७, रोहित महामुनी, गितांश्री बिरादार, साधना म्हेत्रे व साक्षी बालगीडे अनुक्रमे ९२.१२, शिवम शिंदे तांबरवाडे, वैभवी कठारे, आसावरी पाठक, अमन पटेल व असिम शेख ९२, यश पाटील ९१.८८, ऋतुजा जंगाले ९१.७८, प्रतिभा बिराजदार व जिंदाशहा फकीर अनुक्रमे ९१.७७, ओंकार भोसले ९१.६७, श्रवेता लोहारे ९१.५३, अरबाज सय्यद ९१.१८, गौरी जाधव व वेदांत शिंदे ९१.०६, कौस्तुभ पवार ९०.८२, मन्मथ मेळकुंदे ९०.७१, साक्षी करे व श्रुती सुर्यवंशी ९०.८९, अदिती सुरवसे, प्रियंका पाटील ९० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.

प्रथम वर्ष विभागातुन कार्तिक मुरकुटे ९०.८२, सानिका बिराजदार ९०, पियुष सुर्यवंशी ८९.४१, श्रवेता सौदागर ८९.०६, सौम्या शिंदे ८८.३५, श्रुती पांचाळ ८८.२४, साक्षी टेकाळे ८८, अथर्व सावंत व इनायत काझी ८७.५३, कार्तिक सोकाटे ८७.१८ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.

संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, प्राचार्य प्रशांत धाराशिवे, उपप्राचार्य गोपाळ दंडिमे, विभाग प्रमुख रेवणसिध्द बुक्का, प्रविण साबदे, अंकुश बिडवे, मंगेश बिडवे, संदेश माडे, अजित लोकरे, अब्दुल समद काझी, प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

धाराशिव
जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## भारती देवस्थान व जमीन बचाव संघर्ष समिती कार्यालयाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.५ जानेवारी -**
वाशी येथील मठ भारती देवस्थान व जमीन बचाव संघर्ष समिती कार्यालयाचा उद्घाटन समारंभ संपन्न झाला.



हा कार्यक्रम मौजे वाशी येथे पार पडला. या कार्यालयाचे उद्घाटन मौजे वाशी येथील ज्येष्ठ पत्रकार बळीराम जगताप यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

यापसंगी संघर्ष समितीचे संयोजक ॲड. उमेश बाबासाहेब गवळी, माणिक बप्पा येताळ, अशोक नाना कवडे, बाळासाहेब पोरे, शहाजी चेडे, शिवाजी गवारे, रावसाहेब मोळवणे, काँग्रेसचे शहराध्यक्ष गजानन जगताप, प्रशांत सुकाळे, राजेश गवळी, प्रदीप कवडे आदी मान्यवर उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...

### नववर्षाचे स्वागत परिसर स्वच्छता व वृक्षारोपणाने

**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
तेरणा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) व ग्रीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन वर्षाची सुरुवात महाविद्यालय परिसर स्वच्छता व वृक्षारोपण करून करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, पर्यावरण संरक्षण व सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. एन.एस.एस. स्वयंसेवकांनी कचरा संकलन करून स्वच्छतेबाबत जनजागृती केली व विविध रोपांचे वृक्षारोपण केले.

यावेळी रोपांची निगा राखण्याचा संकल्पही व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.बी. मोरे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रीन क्लब समन्वयक डॉ. सुशिलकुमार सरवदे व एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. तुळशीराम उकिरडे यांनी परिश्रम घेतले.

### तेरखेड्यात ‘बाल आनंद मेळावा’

**वाशी, दि.५ जानेवारी -**
ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळा व जि.प. कन्या प्राथमिक शाळेच्या संयुक्त विद्यमाने बाल आनंद मेळावा उत्साहात पार पडला. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मेळाव्याचे उद्घाटन गावचे सरपंच दिलीप घोलप यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमात सावित्रीबाईंच्या स्त्री शिक्षणातील कार्याचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी सोमनाथ घोलप, जि.प. सदस्य उद्धव साळवी, केंद्रप्रमुख दत्तात्रय मोहिते, अच्युत शिंदे, विक्की चव्हाण, अक्षय चव्हाण, बालाजी खापे तसेच शिक्षणप्रेमी नागरिक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी उभारलेले खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, खेळ आणि उपक्रमांमुळे शाळा परिसर आनंदोत्सवात बदलला होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक कोकाटे, शेटे, शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती व पालकांनी परिश्रम घेतले.

### सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त तेरणा महाविद्यालयात विशेष कार्यक्रम

**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
तेरणा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दि.३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने झाली.

विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले तसेच सावित्रीबाईंच्या जीवनकार्यावर विचार मांडले. प्रमुख वक्त्या डॉ. नंदा उबाळे यांनी स्त्रीशिक्षण, सामाजिक समता व स्त्रीस्वातंत्र्यासाठी सावित्रीबाईंच्या योगदानाचा सविस्तर आढावा घेतला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.डी.बी. मोरे होते. कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जगदाळे महाविद्यालयात विद्यार्थी-पालक-शिक्षक मेळावा उत्साहात संपन्न

**वाशी, दि.५ जानेवारी -**
जगदाळे महाविद्यालयात विद्यार्थी-पालक-शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.ए.बी. कदम हे होते, तर प्रताप भैय्या देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी पालक मेळाव्याला संबोधित करताना विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कलागुणांना वाव द्यावा, तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग करून प्रगती करावी तसेच पालकांनी विद्यार्थ्यांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवावेत, त्यामुळे विद्यार्थी-पालक नाते अधिक घट्ट होईल, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमास विशेष उपस्थिती म्हणून प्रा. हेमंत शिंदे सर (अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कार्याध्यक्ष) लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मिलिंद शिंदे, सूत्रसंचालन प्रा. सुनील आवारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनिता लांडगे यांनी केले.

# गावयात्रेपुरतीच कुस्ती मर्यादित : तालीमी ओस पडू लागल्यात!

**धाराशिव जिल्ह्यातील तालीम व मल्लांच्या विकासाकडे दुर्लक्ष... पैलवानांसाठी ठोस व्यासपीठ उपलब्ध नाही...**

**तभा वृत्तसेवा / अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
धाराशिव जिल्ह्यात अनेक गावांमध्ये पूर्वी गजबजलेली तालीम आज इतिहास जमा होत चालली आहे. जिल्ह्याला कुस्तीची दीर्घ आणि गौरवशाली परंपरा असली तरी सध्या कुस्तीचे आयोजन केवळ गाव यात्रेपुरतेच मर्यादित राहिले असल्याचे चित्र दिसून येत आहे. तेही फारच कमी प्रमाणात आणि औपचारिक स्वरूपात होत असल्याने मल्लांना अपेक्षित संधी मिळत नाही. परिणामी गावागावातील तालीम ओस पडत असून कुस्तीच्या विकासाला मोठा अडथळा निर्माण झाला आहे.



सध्या बहुतांश गावांमध्ये वर्षातून एकदाच, तेही यात्रेच्या निमित्ताने कुस्तीचे सामने आयोजित केले जातात. नियमित किंवा विशेष कुस्ती स्पर्धांचा अभाव असल्यामुळे पैलवानांना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची आणि अनुभव मिळवण्याची संधी कमी होत आहे. स्पर्धा नसतील तर सरावाला उत्साह राहत नाही, असे अनेक माजी पैलवानांचे मत आहे.

जिल्ह्यात अनेक राज्यस्तरीय पैलवान असतानाही त्यांच्यापासून प्रेरणा घेणाऱ्या तरुण मल्लांसाठी ठोस व्यासपीठ उपलब्ध नाही. विशेष कुस्ती स्पर्धा, खुल्या फडांचे आयोजन आणि विविध वजनगटातील सामने नियमितपणे झाले, तर नवोदित पैलवान पुढे येऊ शकतील. मात्र सध्या स्पर्धांचा अभाव असल्याने अनेक होतकरू मल्ल कुस्तीपासून दूर जात आहेत. गावयात्रेपुरते मर्यादित राहिलेले कुस्तीचे आयोजन पुरेसे नाही. कुस्तीची परंपरा जपायची असेल आणि धाराशिव जिल्ह्यातून भविष्यातील नामवंत पैलवान घडवायचे असतील, तर नियमित व विशेष कुस्ती स्पर्धांचे आयोजन अपरिहार्य आहे. विशेष कुस्ती स्पर्धा ही केवळ कार्यक्रम नसून, गावमातीतील कुस्तीच्या पुनरुज्जीवनाची पहिली पायरी आहे. या दृष्टीने जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, राजकीय पुढारी, ग्रामपंचायती, तसेच कुस्तीप्रेमी नागरिकांनी एकत्र येऊन पुढाकार घेणे आवश्यक आहे.

शासनाच्या क्रीडा योजनांचा प्रभावी वापर करून विशेष कुस्ती स्पर्धांसाठी निधी उपलब्ध करून दिल्यास गावमातीतील कुस्तीला नवसंजीवनी मिळू शकते.

### गाव तालमीची जागा जिमने घेतली...

आधुनिक व्यायामप्रकारांकडे तरुणांचा वाढता कल आणि कुस्तीला मिळणारे अपुरे पाठबळ यामुळे परंपरागत तालमी दुर्लक्षित होत आहेत. मातीच्या आखाड्यांमध्ये नियमित सराव करणारे पैलवान कमी झाले असून त्या जागी आता खासगी जिम सुरू झाल्याचे चित्र दिसून येत असून जिममुळे शारीरिक तंदुरुस्ती वाढत असली तरी कुस्तीच्या मातीतील सरावाला पर्याय ठरू शकत नाही, असे मत कुस्तीप्रेमींमधून व्यक्त होत आहे. तालमी बंद पडल्याने नवोदित मल्लांना मार्गदर्शन करणारे अनुभवी पैलवानही हतबल झाले आहेत.

### विशेष कुस्ती स्पर्धा काळाची गरज...

तालुका व जिल्हा पातळीवर विशेष कुस्ती स्पर्धा, आमंत्रित मल्लांच्या फड, तसेच पारंपरिक मातीच्या कुस्तीला प्राधान्य देणारे उपक्रम राबविणे ही काळाची गरज बनली आहे. अशा स्पर्धांमुळे कुस्तीला प्रतिष्ठा मिळेल, प्रेक्षकांची संख्या वाढेल आणि तालमी पुन्हा जिवंत होतील. स्पर्धे शिवाय गावमातीतील पैलवान तयार होणार नाहीत. श्रीमंत कुस्ती आखाड्याच्या माध्यमातून प्रतिवर्षी विशेष भरण्यास सुरुवात केली आहे. कुस्तीप्रेमी आणि पैलवान यांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

**- संजय पारवे** (कुस्ती स्पर्धा आयोजक)
शिवछत्रपती क्रीडा संकुल आरळी बुद्रुक

# फक्त ३२८ रुपयांत ५ लाखांचे अपघात विमा संरक्षण

**इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेची ‘ग्रुप ॲक्सिडेंट गार्ड पॉलिसी’ नागरिकांसाठी वरदान...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
सामाजिक सुरक्षा व आर्थिक समावेशन अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक (खझझइ) मार्फत नागरिकांसाठी ‘ग्रुप ॲक्सिडेंट गार्ड पॉलिसी’ उपलब्ध करून देण्यात आली आहे. डाक विभाग, महाराष्ट्र सर्कल यांच्या वतीने याबाबत माहिती देण्यात आली.



ही पॉलिसी अपघातामुळे होणारा मृत्यू, अपघाती रुग्णालयात दाखल होणे तसेच कायमस्वरूपी पूर्ण किंवा अंशतः अपंगत्व अशा परिस्थितींमध्ये आर्थिक संरक्षण प्रदान करते. अत्यंत परवडणाऱ्या प्रिमियममध्ये उपलब्ध असल्याने ही योजना कामगार, शेतकरी, स्वयंरोजगार करणारे तसेच ग्रामीण व निमशहरी भागातील नागरिकांसाठी विशेषतः उपयुक्त ठरणार आहे.

या योजनेअंतर्गत अपघाती मृत्यू, रुग्णालयात दाखल झाल्यास खर्चासाठी मदत, कायमस्वरूपी अपंगत्वासाठी भरपाई तसेच मृत विमाधारकाच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध आहे. सुलभ नोंदणी प्रक्रिया व सोपी, त्रासमुक्त दावा व्यवस्था ही या योजनेची आणखी एक वैशिष्ट्ये आहेत.

या पॉलिसीसाठी वार्षिक प्रिमियम फक्त ३२८ रुपयांपासून सुरू होत असून त्यावर ५ लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळते. अधिक प्रिमियममध्ये १० लाख व १५ लाख रुपयांचे विमा संरक्षणही उपलब्ध आहे. ही सुविधा आयपीपीबी बचत खातेधारकांना त्यांच्या नजीकच्या पोस्ट ऑफिस, पोस्टमन किंवा ग्रामीण डाक सेवक यांच्या माध्यमातून सहजपणे घेता येणार आहे. इंडिया पोस्टचे व्यापक जाळे विमा सेवा शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेची ही योजना नागरिकांच्या सामाजिक सुरक्षेला बळ देणारी, आर्थिक स्थैर्य निर्माण करणारी व नागरिक-केंद्रित सेवा वितरणाचा उत्तम नमुना असल्याचे डाक विभागाने नमूद केले आहे.

# जिल्हास्तरीय लोकशाही दिन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
नागरिकांच्या तक्रारी थेट ऐकून त्यावर तात्काळ कार्यवाही करण्यासाठी राबविण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन आज धाराशिव येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती ज्योती पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

या लोकशाही दिनात अप्पर पोलीस अधीक्षक शफकत आमना, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे, संतोष राऊत तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी एकूण चार तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दोन, भूमी अभिलेख विभागाकडे एक व उपनिबंधक धाराशिव यांच्याकडे एक तक्रार दाखल करण्यात आली. विशेष म्हणजे यापूर्वी प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचा निपटारा प्रशासनाने केल्याची माहिती देण्यात आली.

लोकशाही दिन हा नागरिक व प्रशासन यांच्यातील थेट संवादाचा प्रभावी मंच असून सामान्य नागरिकांना आपली समस्या थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत मांडण्याची संधी मिळते. यामुळे प्रशासकीय विलंब कमी होतो, पारदर्शकता वाढते आणि नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होतो, असे यावेळी नमूद करण्यात आले.



### बुद्धवासी बापूसाहेब शिंदे यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ जानेवारी -**
परंडा येथील थोर विचारवंत व माजी नायब तहसीलदार बापूसाहेब नरहरी शिंदे यांच्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्त दि.५ जानेवारी रोजी समस्त शिंदे परिवार (परंडा) तसेच घोडके परिवार व चंदनशिवे परिवार यांच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी बापूसाहेब शिंदे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी त्यांच्या सामाजिक व प्रशासकीय कार्याची आठवण करून दिली. कार्यक्रमास पत्रकार आप्पासाहेब शिंदे, मिलिंद शिंदे, कोंताबाई शिंदे, अनिता घोडके, शुभम घोडके, ललिता चंदनशिवे, जीवन गंगावणे, अर्जुन सोनवणे, ज्ञानदेव शिंदे, बबन शिंदे, अविनाश शिंदे, आदित्य शिंदे, अभिनव शिंदे, मृणाल शिंदे, स्वाती शिंदे, वैशाली शिंदे आदी उपस्थित होते.

# वस्तुसंग्रहालये प्राचीन वारसा जतनासाठी काळाची गरज : उत्कर्ष श्रीवास्तव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
भारताला समृद्ध व प्राचीन ऐतिहासिक परंपरा लाभली असून या वारशाचे जतन व संवर्धन करण्यासाठी अधिकाधिक वस्तुसंग्रहालयांची निर्मिती होणे अत्यावश्यक आहे. ऐतिहासिक वस्तुसंग्रहालये ही काळाची गरज असून त्याद्वारे आपला प्राचीन वारसा जतन व पुढील पिढीपर्यंत पोहोचविता येतो, असे मत दिल्ली येथील राष्ट्रपतीभवन संग्रहालयातील अधिकारी उत्कर्ष श्रीवास्तव यांनी व्यक्त केले.



येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय व भारतीय मूर्ती व स्थापत्य संशोधन परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) अनुदानित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या परिषदेत ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर हेरिटेज फाउंडेशन, दिल्लीचे संचालक भुजंग बोबडे, संस्थेचे सदस्य डॉ. अभय शहापूरकर, मूर्तिशास्त्र संशोधन संस्थाध्यक्ष प्रा.डॉ. अरविंद सोनटक्के, भारतीय मूर्ती व स्थापत्य संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत गणवीर, प्रा. डॉ. शांता जाधवर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी व प्रा.डॉ. जयश्री कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

‘वस्तुसंग्रहालये : काल, आज आणि उद्या’ या विषयावर दि.२ व ३ जानेवारी रोजी या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी पुढे बोलताना उत्कर्ष श्रीवास्तव यांनी दिल्ली येथील वस्तुसंग्रहालयाची सविस्तर माहिती दिली. तर भुजंग बोबडे यांनी आपल्या मनोगतात भारतातील विविध वस्तुसंग्रहालयांचा आढावा घेत आजच्या काळात वस्तुसंग्रहालयांची गरज कशी वाढली आहे हे विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले.

या कार्यक्रमात डॉ. अभय शहापूरकर, डॉ. अरविंद सोनटक्के, डॉ. श्रीकांत गणवीर यांनीही आपले विचार मांडले. दोन दिवसीय परिषदेत डॉ. माया पाटील यांनी तेर येथील उत्खननाबाबत माहिती दिली. तसेच डॉ. विजय सरडे, डॉ. शांता जाधवर, डॉ. अरविंद सोनटक्के व डॉ. श्रीकांत गणवीर यांनी विविध विषयांवर आपले मनोगत व्यक्त केले. परिषदेच्या शेवटच्या दिवशी प्रतिनिधींनी तेर येथील रामलिंगाप्पा लामतुरे वस्तुसंग्रहालयाला भेट दिली. तेथे इतिहास अभ्यासक ॲड. राज कुलकर्णी यांनी वस्तुसंग्रहालयातील विविध वस्तूंबाबत माहिती दिली. यासोबतच त्रिविक्रम मंदिर व उत्तरेश्वर मंदिरालाही अभ्यासकांनी भेट देऊन अभ्यास केला.

या परिषदेत विविध विषयांवरील संशोधन निबंधांचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. संजय जोशी, प्रा. अशोक गोरे, प्रा.डॉ. कृष्णा तेरकर व प्रा. सहदेव रसाळ यांनी केले, तर आभार प्रा. रविंद्र कुलकर्णी यांनी मानले. या परिषदेत देशभरातील विविध महाविद्यालयांचे प्राध्यापक, संशोधक व इतिहास अभ्यासक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विभागप्रमुख प्रा.डॉ. जयश्री कुलकर्णी, प्रा. रविंद्र कुलकर्णी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नळदुर्ग येथे खंडोबा यात्रेनिमित्त भव्य कुस्ती स्पर्धा; हर्षवर्धन सदगीरचा मानाचा विजय

### बाल पैलवान समर्थराजे घोडके ठरला आकर्षण...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ जानेवारी -**
नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र मैलारपुर येथे दि.४ जानेवारी २०२६ रोजी श्री खंडोबा यात्रेनिमित्त श्रीक्षेत्र खंडोबा यात्रा कुस्ती आखाडा समिती व नळदुर्ग नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने लाखो रुपये बक्षिसांच्या भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा अत्यंत चित्तथरारक ठरली असून प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी ठरली. जवळपास पाच तास चाललेल्या या स्पर्धेत लहान-मोठ्या मिळून १५० पेक्षा अधिक कुस्त्या पार पडल्या. राज्यातील नामवंत पैलवानांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला.



या स्पर्धेचे उद्घाटन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी भाजप नेते सुनील चव्हाण, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य नितीन काळे, नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. हनुमानाच्या प्रतिमेचे पूजन करून कुस्त्यांना प्रारंभ करण्यात आला.

स्पर्धेतील सर्वात मानाची १ लाख ५१ हजार रुपये रोख व चांदीच्या गदेची कुस्ती आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल, पुणे येथील महाराष्ट्र केसरी विजेता पै. हर्षवर्धन सदगीर व नीतू आखाडा, सोनीपत (हरियाणा) येथील भारत केसरी विजेता पै. सोनू गेरवाल यांच्यात झाली. अत्यंत चुरशीच्या या कुस्तीत पै. हर्षवर्धन सदगीर यांनी हप्ते डावावर पै. सोनू गेरवाल यांना चारीमुंड्या चित करून ही मानाची कुस्ती जिंकली. विजयानंतर हर्षवर्धन सदगीर यांना नगराध्यक्ष बसवराज धरणे, नगरसेवक दत्तात्रय दासकर व नय्यर जहागीरदार यांच्या हस्ते रोख १ लाख ५१ हजार रुपये व पुदाले परिवारातर्फे मानाची चांदीची गदा प्रदान करण्यात आली.

दुसरी प्रमुख कुस्ती १ लाख ११ हजार १११ रुपये बक्षिसाची असून ती गंगाखेड तालिम, कोल्हापूरचे महान भारत केसरी पै. माऊली जमदाडे व पंजाबचे पैलवान अमित कुमार यांच्यात झाली. शेवटच्या टप्प्यात पै. माऊली जमदाडे यांनी पोकळ किस्सा डावावर पै. अमित कुमार यांना चितपट करत विजय मिळविला. या कुस्तीसाठी कै. अप्पाराव बेडगे, कै. संजय बलभीम जाधव व कै. प्रसन्न कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ ड. अरविंद बेडगे यांच्या वतीने ठेवलेले बक्षीस देण्यात आले.

या स्पर्धेतील सर्वांचे लक्ष वेधून घेणारा ठरला तो नळदुर्गचा बाल पैलवान समर्थराजे घोडके. गेल्या काही वर्षांपासून कुस्ती क्षेत्रात नळदुर्गचे नाव उज्वल करणाऱ्या समर्थराजे घोडकेने या स्पर्धेत सलग दोन कुस्त्या जिंकत प्रेक्षकांची दाद मिळवली. नितळी येथील जय बजरंग तालमीचा पै. संभाजी गरड याच्याविरुद्ध झालेल्या कुस्तीत समर्थराजेने चितपट करत आस्मान दाखविले. या विजयाबद्दल तेरणा यूथ फाउंडेशनचे नळदुर्ग शहर अध्यक्ष आशुतोष नाईक यांच्या वतीने त्याला ११ हजार रुपये रोख बक्षीस देण्यात आले.

याशिवाय पै. राहुल मुळे विरुद्ध पै. सागर देशमुख, पै. सुरज गवळी विरुद्ध पै. ज्योतिबा अटकळे, पै. विकास बनसोडे विरुद्ध पै. आकाश शेळके यांच्यासह अनेक कुस्त्या प्रेक्षणीय ठरल्या. महिला पैलवानांच्या कुस्त्यांनीही स्पर्धेत विशेष रंगत आणली. सर्व विजेत्या पैलवानांना आमदार राणा जगजितसिंह पाटील, सुनील चव्हाण, नितीन काळे, नगराध्यक्ष बसवराज धरणे व मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली.

ही भव्य स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कुस्ती आखाडा समितीचे अध्यक्ष राजाभाऊ ठाकूर, उपाध्यक्ष अनिल पुदाले, कार्याध्यक्ष बंडू पुदाले, कोषाध्यक्ष संजय मोरे यांच्यासह सर्व सदस्य, नगरपालिकेचे कर्मचारी व शहरातील विविध समाजातील युवकांनी परिश्रम घेतले. गोविंद पारगे यांनी उत्कृष्ट समालोचन केले. पंच म्हणून विनोद घुगे, ज्ञानेश्वर गोचडे, शिवाजीराव वऱ्हाडे, सर्जेराव जवळगे यांच्यासह अनेकांनी काम पाहिले.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बालाजी मंदिर ते यशोदा चित्रमंदिर रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** लातूर शहरातील बालाजी मंदिर ते यशोदा चित्रमंदिर , अंबाजोगाई बस स्थानक क्रं . २ कडे जाणाऱ्या रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य पसरल्याने भुरट्या चोरीच्या घटनात वाढ होण्याच्या शक्यतेने नागरिकातघबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.शहरातील बालाजी मंदिर, पापविनाश रोडपासून अंबाजोगाई रोडवरील बस स्थानकाकडे जाणारा हा रस्ता मागच्या काही वर्षांपासून अतिशय वर्दळीचा झाला आहे. मुख्य रस्त्यावरील वाहतुकीच्या कोंडीतअडकण्यापेक्षाया रस्त्याने जाण्यास वाहनधारक प्राधान्य देताना दिसतात. दिवसा - रात्री कोणत्याही वेळेस हा रस्ता कायम गजबजलेला असतो. मात्र, रात्रीच्या वेळी या रस्त्यावरील बहुतांश भागात पथदिवे नसल्याने अंधाराचे साम्राज्य दिसून येते. अंधारामुळे महिला, युवतींना या रस्त्यावरून जाताना अनाहूत भीती वाटते. कायम वर्दळीच्या असणाऱ्या या रस्त्यावर लख्ख प्रकाशासाठी विजेची सोय करून देणे अत्यावश्यक आहे. या भागातील नागरिक सातत्याने अंधार दूर करण्याची मागणी करत असतात. मात्र प्रशासन त्याकडेफारसेगांभीर्याने पाहताना दिसत नाही. त्यामुळे किमान महानगरपालिकेची निवडणूक पार पडल्यानंतर हा होईना या रस्त्यावरील अंधाराचे साम्राज्य दूर करावे,अशी अपेक्षा नागरीकातून व्यक्त केली जात आहे.



# नवोदय विद्यालयातील विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू!

## संतप्त माता-पित्याची न्यायाची मागणी; सोमवारी लातूरच्या गांधी चौकात केला रस्ता रोको

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** लातूर शहरापासून जवळच असलेल्या चिंचोलीराव वाडी येथील जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावीमध्ये शिकणारी विद्यार्थिनी कु. अनुष्का किरण पाटोळे हिचा संशयास्पद मृत्यू झाल्याने जिल्हाभरात एकच खळबळ उडाली आहे. सदर विद्यार्थिनीने टॉवेलने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे शालेय प्रशासनांकडून सांगण्यात येत असले तरी कोणालाही न पटणारी आहे. याच कारणावरून मृत विद्यार्थिनीच्या पालकांनी या प्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कार्यवाही केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा इशारा दिला आहे. सोमवारी न्यायाच्या मागणीसाठी लातूर शहरातील महात्मा गांधी चौकात संतप्त महिलांनी रास्ता रोकोही केला.

जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावीच्या वर्गात शिकणारी कु. अनुष्का पाटोळे ही औसा तालुक्यातील




टाका या गावाची होती. अनुष्काच्या पालकांना ती आजारी असल्याचा दूरध्वनी करून शाळा प्रशासनाने लातूरला बोलावून घेतले. तिचे आई-वडील लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयात आले असता त्यांना अनुष्काचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे समजले. पालकांना नेमके काय झाले होते? हे सांगण्याचा प्रयत्नहीशाळा प्रशासनाकडून न झाल्याने घडल्या प्रकाराबद्दल संशय व्यक्त केला जात आहे. अनुष्काने टॉवेलने बाथरूममध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे सांगण्यात येत असले तरी वास्तव काहीतरी वेगळे असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

अनुष्काच्या आई-वडिलांनी अनुष्काने आत्महत्या केली नसून तिचा खून करण्यात आला असल्याचा आरोप केला असून या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन दोषींवर कठोर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी लावून धरली आहे.

हा प्रकार रविवारी सकाळच्या दरम्यान घडला असल्याचे सांगितले जात आहे. जर अनुष्काने गळफास घेऊन आत्महत्या केली होती तर त्याच ठिकाणी तात्काळ पोलीस बोलावून घेऊन तिथेच मृतदेहाचा पंचनामा का केला गेला नाही? असा प्रश्नही आता उपस्थित केला जात आहे. अभ्यासात हुशार असणाऱ्या आपल्या मुलीकडून असा आत्मघाती प्रकार होणे कदापि शक्य नसल्याचा दावा आई - वडील करत आहेत. एकंदरच हा मृत्यू संशयास्पद असून आई-वडिल व नातेवाईकांनी दोषींवर कार्यवाही होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचे सांगितल्याने सोमवारी सायंकाळपर्यंतही कु. अनुष्काच्या मृतदेहाची शव विच्छेदन प्रक्रिया पूर्ण झाली नव्हती.

सामान्य लातूरकरांमध्येही या दुर्दैवी घटनेबद्दल दुःख व्यक्त केले जात असून या प्रकरणातील दोषी असणाऱ्यांवर कठोर कार्यवाही व्हावी, अशी मागणी वाढीस लागली आहे.

## 'महात्मा बसवेश्वर'चा मतदान जनजागृती वाकेथॉनला प्रतिसाद




**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिका, लातूर रोटरी क्लब परिवार, महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, व्यक्तिमत्त्व विकास केंद्र, युवती मंच आणि कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत क्रीडा संकुल ते टाऊन हॉल पर्यन्त निघालेल्या मतदान जनजागृती वाकेथॉनमध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या रॅलीत महात्मा बसेवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, डॉ. गुणवंत बिरादार, डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. किसनाथ कुडके, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. रवी सोनोने, प्रा. के. आर. सूर्यवंशी, प्रा. के. आर. बिराजदार, प्रा. आशीष क्षीरसागर, प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. उदयकुमार धनुरे, प्रा. आशिष स्वामी, प्रा. कल्पना गिराम, प्रा. डॉ. अश्विनी रोडे, प्रा. रूपाली हलवाई, प्रा. मीनाक्षी नीला, प्रा. नीता दलगडे, प्रा. पूजा घार, प्रा. महादेवी धडे आणि संगमेश्वर मुळे यांच्यासह विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

या रॅलीत लोकशाहीमधील मतदानाचे महत्त्व सांगणाऱ्या घोषणा, कट आउट, बॅनर लावून येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीचा मतदानाचा टक्का वाढावा याकरिता जनप्रबोधन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त आणि उत्साही सहभागाबद्दल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## व्यंकटेश विद्यालयातील शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द : कांबळे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** येथील श्री व्यंकटेश शिक्षण संस्थाद्वारा संचलित श्री व्यंकटेश माध्यमिक विद्यालयातील २३ शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या बोगस वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा तसेच उच्च माध्यमिकच्या ५ शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती यांनी विभागीय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांकडे पाठवला असल्याची माहिती मराठवाडा प्रदेश निराधार संघटनेचे अध्यक्ष मिलिंद कांबळे यांनी सोमवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

श्री व्यंकटेश शिक्षण संस्थेवर सन १९९७ पासून ते आजतागायत अधिकृत कार्यकारी मंडळ अस्तित्वात नसतानाही संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र ब्रिजमोहन अग्रवाल व सचिव प्रशांत शिवप्पा पटणे यांनी तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांशी संगनमत करून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती करून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक व्यवहार करून शासनाची फसवणूक केल्याचा आरोपही मिलिंद कांबळे यांनी यावेळी केला. या शिक्षण संस्थेतील स्वयंघोषित पदाधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराविरुद्ध आपण वेळोवेळी आवाज उठवला असून सातत्याने हा विषय शिक्षण विभागाकडे लावून धरला आहे. आपल्या संपूर्ण पुराव्यानिशी दाखल केलेल्या तक्रारीची शहनिशा करून विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने या प्रकरणाची सुनावणी दि. १७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता घेतली. या सुनावणीस संस्थेचे स्वयंघोषित अध्यक्ष - सचिव यांसह ज्यांच्या नेमणुकीविषयी तक्रार करण्यात आली आहे ते सर्व कर्मचारी, शिक्षण उपसंचालक कार्यालयातील सहाय्यक शिक्षण संचालक तथा अन्य अधिकारी उपस्थित होते. या सुनावणीचा निर्णय दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी देण्यात आला.

### सुनावणीच्या निर्णयास स्थगिती : डॉ. दत्तात्रय मठपती

श्री व्यंकटेश विद्यालयातील २३ शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेतलेला निर्णय आणि उच्च माध्यमिक स्तरावरील ५ शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा प्रस्तावाविभागीय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांकडे पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, संबंधित शिक्षकांनी दि. १८ डिसेंबर रोजी तक्रारीच्या प्रतिची मागणी केली. असल्याने त्यांना दि. ३१ डिसेंबर रोजी तक्रारीची प्रत उपलब्ध करून देण्यात आली आली. प्रत दिल्यानंतर शिक्षकांना त्यावर अभिप्राय सादर करण्यास कळविण्यात आले आहे. शिक्षकांना तक्रारीच्या अनुषंगाने अभिप्राय सादर करता यावा व याचिका क्र. ५२५०/ २०२५ मधील निर्णय अद्याप प्रलंबित असल्यामुळे तूर्तास दि. २९ डिसेंबरच्या २८ शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मान्यता रद्द करण्याचा घेतलेला निर्णय पुनर्विचार करण्याबाबत शिक्षकांनी दि. ३० डिसेंबर रोजी दिलेल्या विनंती अर्जानुसार तसेच न्यायालयात शिक्षकांची याचिका प्रलंबित असल्यामुळे दि. २९ डिसेंबर २०२५ रोजीचा निर्णय तूर्तास स्थगित करण्यात येत असल्याची माहिती शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती यांनी दिली.

तर उच्च माध्यमिकच्या पाच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता

शिक्षण उपसंचालकांच्या सुनावणीत २३ शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला, तर उच्च माध्यमिकच्या पाच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव विभागीय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांकडे पाठवण्यात आला आहे.

## भारतीय सैन्यदलात तरुणांना मोफत प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना संयुक्त संरक्षण सेवा (सीडीएस) परीक्षेची तयारी करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे नवयुवक आणि नवयुवतींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध आहे. नाशिक येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड येथे १९ जानेवारी, २०२६ ते ३ एप्रिल, २०२६ या कालावधीत सीडीएस कोर्स क्र. ६६ आयोजित करण्यात येत आहे. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींनी १८ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रावर हजर रहावे. या कोर्सदरम्यान प्रशिक्षणार्थींना मोफत प्रशिक्षण, निवास आणि भोजन सुविधा पुरविल्या जाणार आहेत.

लातूर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी १३ जानेवारी, २०२६ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर येथे मुलाखतीसाठी हजर रहावे. मुलाखतीस येताना उमेदवारांनी सैनिक कल्याण पुणे यांच्या संकेतस्थळावरून सीडीएस-६६ कोर्सचे प्रवेशपत्र आणि त्यासोबत असलेल्या परिशिष्टांची प्रिंट भरून सोबत आणावी. प्रवेशासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा आणि त्याने लोकसेवा आयोग, नवी दिल्ली यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या सीडीएस परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज केलेला असावा. यासोबतच संबंधित पात्रता प्रमाणपत्रही आणणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

## ज्ञान हे माणसच्या व्यक्तिमत्व विकासाचे साधन आहे : भिक्खु पय्यानंद थेरो

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** जगामध्ये शालेय शिक्षण आणि आध्यात्मिक शिक्षण असे ज्ञानाचे प्रकार आहेत. शालेय ज्ञान हे भौतिक साधनांची परिपुर्तता करते तर आध्यात्मिक ज्ञान हे मनुष्याचे वैचारिक आणि व्यक्तिमत्व उंचावते. ज्ञान हे माणसच्या व्यक्तिमत्व विकासाचे साधन असल्याचे प्रतिपादन भिक्खु पय्यानंद थेरो यांनी केले आहे. पौष पौर्णिमेनिमित्त महाविहार, सातकर्णी नगर येथे आयोजित धम्मदेशना व सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.

भिक्खू पय्यानंद थेरो पुढे म्हणाले की, ज्ञान हे केवळ उपजीविकेचे साधन नसून ते माणसाच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रक्रिया आहे. आजचे शालेय शिक्षण माणसाला कौशल्ये, रोजगार व भौतिक प्रगतीकडे घेऊन जाते; मात्र त्याला पूरक म्हणून आध्यात्मिक शिक्षणाची नितांत गरज आहे. आध्यात्मिक ज्ञानाशिवाय शालेय शिक्षण अपूर्ण ठरते, आध्यात्मिक शिक्षणामुळे मनुष्याला स्वतःकडे पाहण्याची दृष्टी मिळते. विचारांची शुद्धता, आचारातील संयम, करुणा, मैत्री आणि समत्व या मूल्यांची जोपासना आध्यात्मिक ज्ञानातूनच होते असेही ते म्हणाले.

याप्रसंगी कार्यक्रमास प्रा. शिवशरण हावळे, इंजि. एम. एन. गायकवाड, चेअरमन



विठ्ठल जाधव, माजी सरपंच सुनील बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब कांबळे, पोलीस निरीक्षक इंद्रजीत वर्धन आदि मान्यवर, आठवी अ. भा. बौद्ध धम्मपरिषद यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल महाविहार धम्मसेवक ग्रुप सदस्य आणि डॉ. जितेंद्र वाघमारे यांची पशुसंवर्धन विभागाच्या सहाय्यक आयुक्तपदी पदोन्नती झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्रशांत जानराव, सत्यप्रकाश कांबळे, आम्रपाल बनसोडे, जयंत कांबळे, त्र्यंबक कवठेकर, मारोती सरवदे, अंतेश्र्वर थोटे, संतोष कसबे, आकाश सरवदे, राहुल शाक्यमुनी, निलेश बनसोडे, विशाल वाहुळे, उत्तम गायकवाड, विलास अवशंख, गौतम चिकाटे, वसंत वाघमारे, कृष्णा सुरवसे, गोविंद जोगदंड, शामल कांबळे, उज्वला सिरसाट, शोभा सोनकांबळे, निर्मला मधाळे, सुरेखा दंडे, निर्मला थोटे, कविता कदम, सरिता बनसोडे, निर्मला गौरकर, कांता सरवदे, पंचशीला बनसोडे, स्वाती सूर्यवंशी, पंचशीला बनसोडे, माया धावारे, यांच्या सह विविध नगरातील महिला मंडळी यांच्यासह मोठ्या संख्येने बौद्ध उपासक उपासिकांची उपस्थिती होती.

## पाथरवाडीच्या अध्यात्मिक पीठात मोफत कर्करोग निदान शिबिराचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन, विवेकानंद कॅंसर अँड सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल व शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटल अँड ए.व्ही. देसाई आय इस्क्टिट्यूट, श्री महादेव आणि हनुमान मंदिर अध्यात्मिक पीठ ,पाथरवाडीच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. १० जानेवारी २०२६ रोजी मोफत कर्करोग निदान, मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबीर अध्यात्मिक पीठात सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत पार पडणार आहे. या शिबिराचा परिसरातील गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा,असे आवाहन रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष अमोल दाडगे , सचिव पवन मालपाणी, मोतीराम वर्मा, प्रकल्प प्रमुख किशोर दाताळ , समन्वयक नवनाथ मद्दे मामा आदी मान्यवरांनी केले आहे.

## जिल्ह्यात युरियाचा पुरेसा साठा उपलब्ध

### तक्रारींसाठी तालुका, जिल्हास्तरीय कृषी कार्यालयाकडे संपर्क साधावा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ५ जानेवारी :** जिल्ह्यामध्ये रब्बी हंगामाच्या पेरण्या पूर्ण होवून पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. जिल्ह्यात रासायनिक खतांच्या संतुलित वापरासाठी विविध प्रकारच्या खतांचे ग्रेड आवश्यक त्या प्रमाणामध्ये उपलब्ध आहेत. जिल्ह्यामध्ये खतांची टंचाई परिस्थिती नाही, तरीही काही भागांमधून युरिया या खताच्या संदर्भामध्ये कृषी निविष्ठा विक्री केंद्रामध्ये युरिया खत उपलब्ध असताना शेतकऱ्यांना नाही म्हणणे, वाढीव दराने विक्री करणे व युरिया या खतासोबत इतर कृषी निविष्ठांची खरेदी करण्याची सक्ती करणे अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. शेतकऱ्यांना युरिया संदर्भामध्ये काही तक्रारी असतील त्यांनी तात्काळ तालुकास्तराव कृषी अधिकारी, गुण नियंत्रण यांच्याकडे किंवा जिल्हास्तरावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी लातूर किंवा लातूर जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी यांच्याकडे संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी यांनी केले आहे.

युरिया खत बॅगमध्ये अहमदपूर - १३ हजार २३६ बॅग, औसा - १२ हजार ३३५ बॅग, चाकूर- १ हजार ९४६, देवणी-४ हजार ८०८ बॅग, जळकोट -३ हजार ८५३ बॅग, लातूर -३२ हजार ४९६ बॅग, निलंगा -१४ हजार ८०९ बॅग, रेणापूर -६ हजार ४५७ बॅग, शिरुर अनंतपाळ -५ हजार १३० बॅग, उदगीर -११ हजार ५० बॅग.

तसेच जिल्ह्यामध्ये डीएपी-४१ हजार ४२० बॅग, एनपीकेएस-२ लाख ३२ हजार २९० बॅग, एसएसपी १ लाख ९० हजार ४२३ बॅग उपलब्ध असून रासायनिक खतांची कोणतीही कमतरता नाही. जिल्ह्यामध्ये कृषि निविष्ठा विक्रेत्यांनी युरिया उपलब्ध असूनही शेतकऱ्यांना न दिल्यास, जादा दराने विक्री केल्यास व युरिया सोबत लिंकिंगद्वारे इतर निविष्ठा दिल्यास संबंधित विक्रेत्यांवर खत नियंत्रण आदेश १९८५ नुसार कायदेशीर कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित तालुक्यातील निरीक्षकांना लातूर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी दिल्या आहेत. जिल्हास्तरीय भरारी पथकामार्फत लातूर जिल्ह्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांची वेळोवेळी तपासणी सुरु असून यापुढेही तपासणी मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती लातूर जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी दिपक सुपेकर यांनी दिली आहे.